# DAMAGE BOOK



# हेलेन केलर

## एक व्यक्तिरेखा

१९२११९

UNIVERSAL LIBRARY
OU_192119
UNIVERSAL LIBRARY

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M923/B87H Accession No. M4858

Author ब्रूक्स, व्हान विक.

Title हेलेन केलर : एक व्यक्तिरेखा

This book should be returned on or before the date last marked below

Checked 1965

Marathi Translation of
HELEN KELLER *Sketch for a Portrait*
by Van Wyck Brooks
*Copyright 1951 1956 by Van Wyck Brooks*

Checked 1969

प्रकाशक : ग. पा. परचुरे, ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर,
गोरेगावकर चाळ क्र. २, मुंबई ४. मुद्रक : वि. पु. भागवत,
मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| १ | ॲलाबामांतील एक बालिका | १ |
| २ | 'आश्चर्यकारक बुद्धिमत्तेची मुलगी' | १२ |
| ३ | 'रेन्थॅम' | २४ |
| ४ | अंधारांतून प्रकाशाकडे | ३६ |
| ५ | प्रगतीचें मुक्तद्वार | ४१ |
| ६ | अंधांसाठीं सेवाकार्य | ४७ |
| ७ | माझा धर्म | ५२ |
| ८ | इंग्लंड आणि जपान | ५७ |
| ९ | शिल्पाच्या शोधांत | ६१ |
| १० | कांहीं टिपणें | ६५ |
| ११ | जगप्रवास | ७६ |
| १२ | आणखीं कांहीं टिपणें | ८१ |
| १३ | व्यक्ति आणि विचार | ८५ |

## इतर कांहीं विश्वसाहित्य

| | रु. न. पै. |
|---|---|
| धडधडते काळीज | २—२५ |
| आरोपी | २—५० |
| एकटा | २—५० |
| अमेरिकन संस्कृति | २ |
| असा आहे रशिया | २ |
| ध्रुवाचा अस्त | ५ |
| मी विजयी आहें | २ |
| अखेरचा रामराम | २—५० |
| आशियांतील धर्म संग्राम | १—५० |
| बेन फ्रँकलिन | १—५० |
| जॉर्ज वॉशिंग्टन | १—५० |
| अखेरचें पान | २—५० |
| अब्राहम लिंकन | १—५० |
| स्वातंत्र्याचीं नवीं क्षितिजें | २ |
| हेलेन केलर : एक व्यक्तिरेखा | १—५० |
| बाळपणीचा काळ सुखाचा | २—५० |
| प्रेमळ घर | २—५० |
| स्वातंत्र्यवीर | २—५० |
| पांच भावांची गोष्ट | १—५० |

## : १ : ॲलाबामांतील एक बालिका

१९३२ च्या हिवाळ्यातील गोष्ट. कोणत्याहि जगप्रसिद्ध व्यक्तीबद्दल आपणांला जें कुतूहल वाटत असतें तशा कुतूहलानें भारला जाऊन मी हेलेन केलरला पाहण्यासाठीं गेलो. ऑगस्टाइनच्या चर्चमध्यें तिचें 'भाषण' होणार होतें. तिच्या वयाच्या दहाव्या वर्षी—म्हणजे १८९० सालीं—जेव्हां वृद्ध कवि व्हिटिएरनें तिला कौतुकानें आपल्या मांडीवर बसवलें आणि व्हिक्टोरिया राणीनें थोर अमेरिकन विचारवंत आणि धर्मोपदेशक फिलिप्स ब्रुक्स यांच्याजवळ तिच्याबद्दल चौकशी केली तेव्हांपासून प्रसिद्धीचा झोत हेलेनवरून कधींच बाजूला सरकलेला नव्हता. १८९० मध्येंच एका जहाजाला तिचें नांव देण्यांत आलें. ऑलिव्हर वेंडल होम्स यांनी आपल्या एका पुस्तकांत तिचें एक पत्र प्रसिद्ध केलें. डॉ. ऑलिव्हर वेंडल होम्स हे १९ व्या शतकांतील एक प्रसिद्ध अमेरिकन कवि आणि निबंधकार. अत्यंत चतुरस्र बुद्धीचे अशी त्यांची ख्याति होती. मॅसाच्युसेट्समधील एका मेडिकल कॉलेजांत ते शरीरशास्त्राचे प्राध्यापक होते. अध्यक्ष ग्रोव्हर क्लीव्हलँड यांनीं आपल्या 'व्हाइट हाऊस' या अधिकृत निवासस्थानीं तिचें स्वागत केलें आणि त्यानंतरच्या प्रत्येक अध्यक्षाकडून हेलेनला हा सन्मान मिळत आला आहे. " 'जोन ऑफ आर्क'नंतर या पृथ्वीवर अवतरलेली सर्वांत आश्चर्यकारक स्त्री म्हणजे हेलन केलर," असे उद्गार सुप्रसिद्ध लेखक मार्क ट्वेन यांनी तिच्याबद्दल काढले होते. १९३२ सालीं, बावन्न वर्षांच्या वयांतहि, हेलेनचा उत्साह अमाप होता आणि आज या गोष्टीला वीस वर्षांवर काळ लोटला असला तरी तिचा तोच उत्साह कायम आहे.

त्यावेळीं हेलेननें उच्चारलेलें —आणि तिच्या सेक्रेटरीनें स्पष्ट करून सांगितलेलें —एक वाक्य अजूनहि माझ्या स्मरणांत आहे. (बहिरी असल्यामुळें हेलेननें स्वतःच आवाज कधींच ऐकलेला नाहीं. त्यामुळें तिचे उच्चार अस्पष्ट होते.) न्यूयॉर्कच्या भुयारी रस्त्यांबद्दल बोलतांना हेलेन म्हणाली, "त्या भुयारी रस्त्यानें एखाद्या अजस्त्र पशुप्रमाणें आपला जबडा उघडला." बायबलची आठवण करून देणारा हा दृष्टान्त ऐकून मी चकित झालो. कारण हेलेनला बायबलचें किती सखोल ज्ञान आहे याची मला तेव्हां कल्पना नव्हती. पुढें जेव्हां अनेक विद्वानांबरोबर बायबलची सांगोपांग चर्चा करतांना मीं हेलेनला पाहिलें तेव्हां मला त्याची प्रचीति आली. त्याचप्रमाणें हिंस्र पशूंच्या जबड्यांशींदेखील हेलेनचा चांगला परिचय असून एकदा तिनें सिंहाच्या पिंजऱ्यांत शिरून त्याच्या तोंडावर थोपटलें आहे हे मला ठाऊक नव्हतें. या प्रसंगीं हेलेन धीटपणें पिंजऱ्यात शिरली. कारण हेलेननें स्वतः सर्व प्रकारचे अनुभव घेतले पाहिजेत असा तिची असामान्य शिक्षिका ॲन सुलिव्हान हिचा प्रथमपासून कटाक्ष होता. शेतावरील घरांत हेलेनचे बालपण गेल्यानें गायी, घोडे, खेचरे हेलेनला माहीत होतीं. कोणतीहि इजा न करतां हीं जनावरे तिनें दिलेलीं फळें खात. या पाळीव प्राण्यांप्रमाणेंच वन्य पशूंचीहि हेलेनला माहिती व्हावी म्हणून ॲन सुलिव्हाननें तिला सर्कशीच्या शिकारखान्यांत नेलें. तेथें हेलेननें अस्वलाशीं हस्तांदोलन केलें, चित्त्याची पाठ थोपटली, जिराफाचे कान चाचपण्यासाठीं तिला उंच उचलण्यात आलें. सापांनीं आणि अजगरांनीं तिला विळखे घातले! हत्तीनें आपली सोंड तिच्या गळ्याभोवतीं लपेटली. तिनें फक्त वाघाला हात लावला नाहीं. तिच्या शब्दांत सांगायचे म्हणजे वाघ हा 'व्रात्य' असतो. (हा शब्द अगदीं समर्पक आहे, पण दैनंदिन व्यवहारांतील बोलण्याऐवजीं पुस्तकें वाचून तिची भाषा विकसित झाली आहे, हे अशा शब्दांमुळे ध्यानात यायचे.) अशा प्रकारच्या अभिनव शिक्षणामुळें हेलेन शरिरानें

व मनानें निर्भय बनली आणि अजून ती तशीच आहे. या साहस-शौर्याच्या जोरावरच प्रकाश आणि ध्वनि यांचा संपूर्ण अभाव असलेले जीवनहि हेलेननें यशस्वी केलें आहे.

केलर कुटुंब उत्तर अलाबामामधील टस्कंबिया या दोन हजार लोकवस्तीच्या छोट्या गावांत राहत असे. हेलेनच्या वडिलांनीं गुलामगिरीच्या प्रश्नावरून उत्तर आणि दक्षिण अमेरिका यांच्यांत झालेल्या यादवी युद्धांत दक्षिणेच्या बाजूनें मर्दुमकी गाजवली होती. ते स्विस कुळांतले होते. योगायोग असा कीं त्याच्या एका पूर्वजानें बहिऱ्यांना कसें शिकवावें या विषयावर एक पुस्तक लिहिलें होतें. हेलेनचा जन्म झाला तेव्हां तिचे वडील एका लहानशा वृत्तपत्राचे संपादक होते. त्यांना शिकारीचा छंद होता. टस्कंबिया गाव छोटं असलं तरी विस्तीर्ण, सुपीक शेतें, फळझाडें, फुलझाडें, यांनीं समृद्ध होतें. अनेक चित्रविचित्र पक्ष्यांचे आवाज आणि फळा-फुलांचा मादक मधुर गंध यांनीं तेथलें वातावरण नेहमीं भरून राहिलेलें असे. पण हेलेनला मात्र ती सात वर्षांची होईपर्यंत भोवतालच्या कुठल्याच गोष्टीचा पत्ता नव्हता. १८८० सालीं जून महिन्यांत जन्मलेल्या या मुलीची गणना 'जीवन्मृत' या सदरांतच होती. ती संपूर्णपणें बहिरी, आंधळी आणि मुकी होती. स्पर्श आणि गंध यांखेरीज इतर कोणत्याच संवेदना तिच्या ठिकाणीं जागृत नव्हत्या. "आशा, अपेक्षा, आश्चर्य, आनंद आणि श्रद्धा यांपैकीं कोणत्याच गोष्टीला स्थान नसलेल्या 'अभावात्मक जगांत' मी राहत होतें." असें तिनें यावेळच्या स्वतःच्या आयुष्याचें वर्णन केलें आहे. एखाद्या रानटी प्राण्यासारखी ही मुलगी स्वभावानें अतिशय अवखळ, हट्टी आणि संतापी होती. तिच्या रागाचा पारा एकदां चढला कीं ती हातीं लागेल ती वस्तू मोडूनतोडून टाकी किंवा जमिनीवर गडबडा लोळण घेई. तिला कसें आवरावें हा सर्वांना मोठा प्रश्न पडे. वास्तविक जन्मतःच हेलेन अशी नव्हती. पण नंतरच्या दीड वर्षाच्या एका दुखण्यानें तिची दृष्टि आणि श्रवणशक्ति हिरावून नेली.

परंतु वरवर खुळचट व मूढ वाटणारी हेलेनसुद्धां बुद्धिमान आहे याचा हळूहळू प्रत्यय येऊं लागला. केक तयार करण्यासाठीं पीठ मळणें, पाव कापल्यावर त्यावर लोणी लावणें या गोष्टी ती बिनचुक करी. पण तिच्याशीं शब्दांत सांगायचें म्हणजे तिच्या मनांत अर्थहीन जाणिवांचें थैमान व एक प्रकारचें अराजक माजलेलें होतें. आपण एका खोल अंधारमय दरीत पडलों आहोंत आणि अन्न, निवारा, ऊब मिळविण्यासाठीं आपली एकाकी धडपड चालू आहे एवढेंच तिला कळत होतें. समुद्रावर दाट धुक्यात सांपडलेल्या जहाजाशीं ती आपल्या या कालखंडांतील आयुष्याची तुलना करते. फरक इतकाच कीं जहाजावर असणारीं होकायंत्रासारखीं साधनें तिच्याजवळ नव्हतीं किंवा आपल्याला या अंधारमय, ध्वनिहीन जीवनांत निवाऱ्याचें बंदर आहे कीं नाहीं हे तिला कळत नव्हतें.

हेलेन सहा वर्षाची असतांना बॉस्टन येथील पर्किन्स इन्स्टिट्यूशनमध्यें लॉरा ब्रिजमन नांवाच्या एका अंध-बहिऱ्या मुलीला शिक्षण देण्याचा प्रयोग यशस्वी झाल्याची हकीकत हेलेनच्या आईनें डिकन्सच्या अमेरिकेच्या प्रवासवर्णनांत वाचली. आजूबाजूच्या माणसांशीं विचारांची देवघेव करण्यास शिकलेली जगांतली पहिली आंधळी-बहिरी व्यक्ति म्हणजे लॉरा ब्रिजमन. अंध असूनहि आपापल्या क्षेत्रांत महान् कामगिरी करणाऱ्या महाकवि होमर, गणिति सॉंडरसन, मधमाश्यांवर संशोधन करणारा स्विस् शास्त्रज्ञ ह्यूबर यांचीं उद्बोधक चरित्रेहि हेलेनच्या आईच्या वाचण्यांत आलीं होतीं. अंधांना शिक्षण देण्याच्या क्षेत्रांतहि सन १७८४ पासून झपाट्यानें प्रगति होत होती. लॉरा ब्रिजमनला शिकवणाऱ्या डॉक्टर हौ यांनीं आंधळ्यांसाठीं नव्या पद्धतीनें भूगोलाचें पुस्तक लिहिलें होतें व त्याना बोटांच्या साहाय्यानें 'पाहतां' येईल असा उठावाच्या नकाशांचा संग्रहहि छापला होता. आंधळ्यांच्या सर्व अडचणी लक्षांत याव्या म्हणून डॉ. हौ स्वतः पर्किन्स इन्स्टिट्यूशनमध्यें अनेकदां डोळे बांधून वावरत.

हेलेनलाहि शिक्षण देण्याचा तिच्या आईवडिलांनीं निश्चय केला आणि त्यांनीं प्रथम वॉशिंग्टन येथें बहिऱ्याच्या शिक्षणाबाबत प्रयोग करणारा टेलिफोनचा संशोधक डॉ. अलेक्झांडर ग्रॅहम बेल याची भेट घेतली. डॉ. बेलच्या सल्ल्यावरून हेलेनच्या वडिलांनीं पर्किन्स इन्स्टिट्यूटला पत्र लिहिलें. डॉ. हौ यावेळीं हयात नव्हते. पण मायकेल अॅनॅनॉस नांवाच्या तितक्याच कर्तृत्ववान् शिक्षणतज्ज्ञाकडे इन्स्टिट्यूशनचें प्रमुखपद होतें. अॅनॅनॉसनें हेलेनच्या शिक्षणांत सर्वतोपरी साहाय्य करण्याचें ठरवलें. हेलेनची कीर्ति साऱ्या जगभर पसरण्यास कारणीभूत झालेली ही पहिली व्यक्ति. अॅनॅनॉस हा ग्रीक भाषेच्या निष्ठावंत पंडित होता. आणि हेलेनच्या ग्रीक भाषेच्या व्यासंगाला त्याच्याकडून प्रेरणा मिळाली. हेलेनला शिकवण्यासाठीं त्यानें अॅन सुलिव्हान या शिक्षिकेची निवड केली.

अॅन सुलिव्हान स्वतः कांहीं प्रमाणांत आंधळी आणि बहिरी होती. तिनें पर्किन्स इन्स्टिट्यूशनमध्यें सहा वर्षे शिक्षण घेतलें होतें. ती हेलनपेक्षां चौदा वर्षांनी मोठी होती. १८८७ च्या वसंत ऋतूंत अॅन सुलिव्हान हेलेनला शिकविण्यासाठीं टस्कंबिया येथें दाखल झाली. येतांना तिनें हेलेनला भेट म्हणून पर्किन्स इन्स्टिट्यूशनमधील अंध बालकांनीं दिलेली एक बाहुली बरोबर आणली होती. या बाहुलीचे कपडे लॉरा ब्रिजमननें शिवले होते. अॅन सुलिव्हान आली त्यावेळीं हेलेन घराच्या दारातच उभी होती कोणीतरी परकी व्यक्ति घरांत आल्याचें समजतांच हेलेनचें माथें भडकलें व ती अॅनच्या अंगावर धावून गेली. ही परकी व्यक्ति आपल्या आयुष्याला निराळें वळण लावणार आहे याची बिचारीला कल्पनाहि नव्हती! अॅन सुलिव्हानचा हेलेनच्या आयुष्यात प्रवेश झाला तो अशा नाट्यपूर्ण रीतीनें! अॅननें पुढें सतत पन्नास वर्षे अविश्रांत परिश्रम करून हेलेनचा पुनर्जन्म घडवून आणला. हेलेन तिला 'टीचर' असें संबोधत असे. 'टीचर' चा वाच्यार्थ 'शिक्षक' असला तरी हेलेनच्या

या संबोधनांत 'नवा जन्म देणारा गुरु' अशी आध्यात्मिक छटा होती.

आल्या दिवसापासूनच ॲन सुलिव्हाननें हेलेनच्या शिक्षणास प्रारंभ केला. अंधशिक्षणाबाबतचीं डॉ. हो यांचीं सर्व टांचणे ॲननें अभ्यासिलीं होतीं. पण हेलेन मुकी आणि बहिरीहि असल्यानें तिला शिकवण्याची स्वतंत्र पद्धत ॲनला शोधून काढावी लागली. 'द स्टोरी ऑफ माय लाइफ' या आपल्या आत्मचरित्रांत हेलेननें ॲनच्या भगीरथ प्रयत्नांचें हृद्य वर्णन केलें आहे.

ॲन सुलिव्हानचें स्वतःचें बालपण फारच दुःखांत व हलाखींत गेलें होतें. मानवी जीवनांतील दारिद्र्य, उपासमार, हालअपेष्टा, रोगराई यांचे भीषण दर्शन तिला फार जवळून घडले होते. तिचे आईवडील ती लहान असतांनाच वारल्यामुळें छोट्या भावाबरोबर ॲनला एका अनाथाश्रमांत दिवस काढावे लागले. पुढे दुष्काळ पडला तेव्हां क्षय, कॅन्सर यांसारख्या भयानक रोगांनीं पछाडलेल्या रोग्यांच्या एका इस्पितळांत ॲनला भावासह राहावे लागलें. ज्या खोलींत दगावलेल्या रोग्यांचीं प्रेतें ठेवीत ती खोली म्हणजे या भावंडांची खेळण्याची जागा. त्या इस्पितळांत घुशी, उंदरें यांचा सुळसुळाट होता. कोणी रोगी मरण पावला की त्याला एका खडखडाट करणाऱ्या हातगाडीवर घालून बाहेरच्या खोलींत आणून टाकीत. अखेर एक दिवस ॲनच्या भावालाहि या गाडीचा प्रवास घडला! या भेदक अनुभवामुळें ॲनला जगाच्या स्थितीची खरीखुरी जाणीव झाली. ती कोणत्याहि भ्रामक कल्पनांत गुरफटून राहिली नाहीं.

हेलेनसुद्धां अशीच निर्भय बनावी व सर्व गोष्टींचें तिला यथार्थ ज्ञान व्हावें यासाठीं ॲन तिच्याशीं अनेक विषयांवर मोकळेपणानें चर्चा करी. अंधत्वाच्या मुळाशीं खूपदा दारिद्र्य, गुप्त रोग हीं कारणें कशीं असतात याचाहि त्यांत उल्लेख येई. फक्त ही भीषणता हेलेनला फार जाणवूं नये यासाठीं आपलें स्वतःचें पूर्वायुष्य मात्र ॲननें हेलेनला वरींच वर्षे कळूं दिलें नव्हतें.

या महान् शैक्षणिक प्रयोगाला सुरवात झाल्यापासून महिन्याच्या आंतच हेलेननें जी प्रगति केली ती पाहून सर्वांना कमालीचें आश्चर्य वाटलें. तिचा हट्टीपणा, आदळ-आपट, आक्रमक वृत्ति हें सारे कुठल्या कुठे लोप पावलें आणि ती सुज्ञ, सुजाण बालिकेसारखी वागूं लागली. दोऱ्यांत मणी ओवणें, विणकाम करणें, यांसारख्या नव्या गोष्टी शिकण्यांत हेलेन मग्न झाली. तिची उन्मेषशाली बुद्धिमत्ता हळू हळू प्रकट होऊं लागली आणि या विलक्षण बुद्धिमत्तेचा विकास करणें हेंच आपलें जीवितकार्य मानून ॲननें तिला शिकविण्यास प्रारंभ केला. बहिऱ्या आणि आंधळ्या हेलेनला शिकविणें ही किती कठीण गोष्ट होती याची कल्पनाच केलेली बरी! कारण हेलेनला एक शब्दहि उच्चारतां येत नसे. शब्दांनीं एखाद्या वस्तूचा बोध होतो, एवढेच काय पण 'शब्द' म्हणून कांहीं अस्तित्वांत आहे याचेहि हेलेनला ज्ञान नव्हतें. टाइप-रायटरप्रमाणें हेलेनच्या हातावर आपलीं बोटें नाचवून ॲननें हेलेनला अक्षरओळख करून दिली व मग शब्दांचे अर्थ अभिनव पद्धतीनें तिला स्पष्ट करून सांगितले. 'वॉटर' (पाणी) या शब्दाचे स्पेलिंग तिच्या हातावर उमटवीत असतांनाच ॲननें हेलेनचा हात पाण्याच्या धारेखालीं धरला आणि ती शीतल, वाहाती धारा आणि 'पाणी' या शब्दांच्या खुणा यांचे समीकरण तिच्या जाणिवेंत कोरलें गेलें वस्तूंना नावें असतात, आणि या नांवांची गुरुकिल्ली आपल्या हातावर लिहिल्या जाणाऱ्या मुळाक्षरां-मध्यें आहे, हें तिला आयुष्यांत पहिल्यांदा कळलें. या वेळच्या आपल्या मनःस्थितीचें वर्णन करतांना हेलेननें एके ठिकाणीं लिहिले आहे, "माझ्या अंतरंगांत एक विलक्षण खळबळ माजली. मला कसलीशी अंधुक जाणीव, कसलीशी आठवण झाल्यासारखें वाटूं लागलें. जणूं कांहीं इतके दिवसांच्या मृतावस्थेंतून मी पुन्हां जिवंत होऊं लागले होते. 'टीचर'नें शिकविलेल्या स्पर्शखुणांच्या साहाय्यानें बाह्य जगाशीं मला संबंध प्रस्थापित करतां येईल, विचारांची देवघेव करतां येईल याची मला

खात्री पटली. अनेक विचार माझ्या मनांत उलट सुलट धावूं लागले व मला त्यांनीं भारून टाकलें. कसला तरी अपूर्व साक्षात्कार झाल्यासारखे मला वाटलें. माझ्या व्यंगांवर विजय मिळवून मी समर्थ, आनंदी होऊं शकेन असा मला विश्वास वाटूं लागला. अनेक सुखद संवेदना माझ्या अंगांतून लहरत गेल्या. माझ्या हृदयांत बंदिस्त झालेल्या अनेक विलक्षण आणि मधुर गोष्टी मुक्ततेचं गीत गाऊं लागल्या." सुटकेचे आटोकाट प्रयत्न केले तरी कोणते तरी प्रबळ अदृश्य हात आपल्याला जखडून ठेवीत आहेत असें तिला आजपावेतों वाटे; पण आतां तिला जीवनांत नवी आशा वाटूं लागली, नवा प्रकाश दिसला.

'वॉटर' या शब्दाचें ज्ञान होतांच ती इतकी आनंदून गेली कीं बागेतल्या नळापासून परत घराकडे येतांना वाटेंतल्या सर्व झाडांचीं, वस्तूंचीं नांवें तिनें ॲनकडून शिकून घेतलीं. एखाद्या लहान मुलाला कानांत गोष्ट सांगावी तशा कुशलतेनें ॲननें तिला सगळे शब्द शिकवले. आनंदानें बेभान होऊन हेलेन नाचूं लागली. हेलेनला वेगवेगळे खेळ खेळण्यास, कोणाच्या सोबतीशिवाय बागेत भटकण्यास शिकवणें हाहि ॲननें आंखलेल्या योजनेचा एक भाग होता. म्हणूनच ती हेलेनला घेऊन बागेंतील द्राक्षांच्या वेलींखालीं जाई आणि तेथें तिला शिक्षण देई. दुपारचे जेवण दोघीहि बागेतल्या झोपडींतच घेत. हेलेनला तिच्या कुटुंबापासून वेगळें काढणें आवश्यक आहे असें ॲनचें मत होतें. त्या अनेकदां निरनिराळ्या पाऊलवाटांनीं दूरवर चालत जात, स्मशानभूमींत हिंडत किंवा बागेत संचार करीत; एखाद्या विशाल ट्यूलिप वृक्षाखालीं उबदार गवतावर आरामशीर बसत आणि ॲन हेलेनला सूर्य, वारा, पाऊस यांचें स्वरूप काय, पक्षी घरटीं कशीं बांधतात, प्राणी निवारा कसा शोधतात हें समजावून सांगे. वेगवेगळीं झाडें, फुलपांखरें, बेडूक, डुक्कर, कोंकरें, रातकिडे यांना तर प्रत्यक्ष हात लावून हेलेन त्यांची माहिती करून घेई. याच पद्धतीनें हेलेननें कापसाचें बोंड कसें

फुटतें, निरनिराळ्या फुलांत काय फरक असतो तें अनुभवलें. एकदां तर अंडें फोडून पिलूं बाहेर पडत असतांना तें अंडें तिनें हातांत धरलें होतें. ॲनबरोबर ती कित्येकदां झाडावर चढून बसे व तेथेंच अभ्यास करी. अशा प्रकारें झाडावर बसूनच ॲननें तिला 'झाडें कशीं वाढतात' हें वनस्पतिशास्त्राचें पुस्तक 'वाचून' दाखवलें. हेलेनला शिकवतांना ॲन विविध साधनांचा उपयोग करी. मासे पकडण्याचे गळ, खिळे, बीं-बियाणें अशा सटरफटर गोष्टींचें एक छोटें भांडारच तिनें हेलेनसाठीं जमवलें होतें. गाणाऱ्या, गुणगुणणाऱ्या, उमलणाऱ्या प्रत्येक वस्तूला हेलेनच्या शिक्षणांत महत्त्वाचें स्थान होतें. अजूनसुद्धां डेझी फुलांचा गंध दरवळला कां ॲन सुलिव्हानबरोबर घालवलेल्या त्या दिवसांची हेलेनला आठवण होते.

बहुधा रोज सकाळीं त्या दोघी घरापासून थोड्या अंतरावरून वाहणाऱ्या टनेसी नदीवरील एका धक्क्यावर जात. तेथें किनाऱ्यावरील वाळूंत हेलेन किल्ले बांधी, धरणें तयार करी, शिंपल्याचे मनोरे उभारी, नद्यांचीं पात्रें खोदून काढी आणि टेकड्या, बेटें, सरोवरें निर्माण करी. वाळू व मातीच्या साहाय्यानें ॲन नकाशे तयार करी व अप्रत्यक्षपणें हेलेनला भूगोलाचे पाठ देई. अशा आकृति तयार करूनच ॲननें तिला दऱ्याखोरीं, निर्झर, ओहळ, ज्वालामुखी, हिमप्रवाह, हजारो वर्षांपूर्वी भूगर्भांत लुप्त झालेलीं शहरें यांचें ज्ञान करून दिलें. मानवपूर्व जगांत कोणत्या प्रकारच्या विक्राळ विचित्र प्राण्यांचा संचार होता तेंहि ॲननें एका स्नेह्यानीं पाठविलेल्या कांहीं प्राचीन अवशेषांवरून हेलेनला सुगम करून सांगितलें. तिनें हेलेनला हॅन्स ख्रिश्चन अँडरसनच्या परीकथा सांगितल्या आणि निसर्गवर्णनपर कविता वाचून दाखवल्या. थोड्याच दिवसांत हेलेन स्वतः बोटांना स्पर्श होईल अशा प्रकारें जाड पुठ्ठ्यांवर छापलेलीं उठावाचीं अक्षरें 'वाचण्यास' शिकली. आतां तिला समजलें कीं प्रत्येक शब्दानें कोणती तरी वस्तु, कृति किंवा गुण याचा बोध होतो.

'वर' (on) आणि 'आंत' (in) या शब्दांमधील फरक आणि अमूर्त कल्पनांचा अर्थहि तिला आतां उमगूं लागला. 'विचार करणें' म्हणजे काय? या शब्दसमुच्चयाचा बोध व्हावा म्हणून ॲननें तिला, मणी ओवीत असतां आकारानुक्रमांत कांहीं चूक झाली कीं ती बुचकळ्यांत पडत असे याची आठवण करून दिली व अशा आणखी कांहीं उदाहरणांनंतर 'विचार करणें' याचा समग्र अर्थ हेलेनच्या ध्यानीं आला.

उघड्यावर, निसर्गसान्निध्यांत हेलेननें शिक्षणाचे पहिले धडे घेतले ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. कारण त्यामुळेंच विविध गंध, नाद यांतील सूक्ष्म अर्थ व फरक तिला कळूं लागले. या दोन संवेदनांवरच हेलेनच्या जाणिवांचें विश्व आधारलेलें आहे. हेलेनची अमर्याद चिकाटी, प्रखर इच्छाशक्ति आणि कोणतीहि कृति निर्दोषपणें करण्याची तिची धडपड हे गुण ॲनच्या लवकरच लक्षांत आले. अवघी सात वर्षांची असतांनासुद्धां हेलेन एखादी गोष्ट नीट करतां यावी म्हणून तासन् तास प्रयत्न करी. हा गुण वाढीस लावण्याचें बरेच श्रेय ॲनकडे जातें. कारण इतर अव्यंग मुलें जितक्या सफाईनें कोणतीहि विशिष्ट कृति करूं शकतात तितक्या सफाईनें हेलेनकडून ती गोष्ट झाल्याशिवाय ॲन तिला शाबासकी देत नसे. 'मी तुझ्याकडून मानेवर खडा ठेवून निष्ठुरपणें प्रत्येक गोष्ट करून घेतली याचा पुढें तुला आनंदच होईल,' हे ॲनचे उद्गार हेलेनला आजसुद्धां आठवतात. निसर्गांतील आणि जगांतील सर्व प्रतिकूल शक्तींविरुद्ध स्वतःचें संरक्षण करतां येईल असें शिक्षण हेलेनला देण्याचा ॲनचा निर्धार होता. हेलेनची तिनें स्वतः कधीं कींव केली नाहीं किंवा कोणाला करूं दिली नाहीं. इतर सर्वसामान्य मुलांप्रमाणेंच हेलेनलासुद्धां पाहण्याची, ऐकण्याची शक्ति आहे असें समजून ॲन तिच्याशीं वागत असे. कारण आंधळ्यांची कींव करण्यानें किंवा त्यांना फार जपल्यानें किती विघातक परिणाम घडून येतात हें ॲनला माहीत होतें. "स्वतःच्या दुर्दैवाबद्दल खेद करीत बसण्याची प्रवृत्ति अंधांच्या

प्रगतीच्या मार्गांतला सर्वांत मोठा अडथळा आहे," असें मत हेलेननें एका ठिकाणीं व्यक्त केलें आहे. ती पुढे म्हणते, "अत्यंत दारुण अपंगावस्था ओढवलेल्या व्यक्तीला इतर सर्वसामान्य माणसांप्रमाणें स्वतःचा विकास करण्यास प्रोत्साहन दिलें नाहीं तर आपल्यांतल्या सुप्त सामर्थ्याची तिला कधीच जाणीव होणार नाहीं." एखादी गोष्ट केवळ हेलेननें केली आहे म्हणून तिची स्तुति ॲन कोणाला करूं देत नसे. ती गोष्ट हेलेननें उत्तम रीतीनें केली असेल तरच तिची प्रशंसा होई. अंधि-बहिऱ्या व्यक्तींना-सुद्धां इतरांइतकेच कर्तृत्वक्षम बनविणे ही ॲनची आकांक्षा होती.

पुढें अनेक वर्षांनीं हेलेननें काढलेले उद्गार या दृष्टीनें मननीय आहेत. हेलेन म्हणते, "मलाहि पंचेंद्रियांमार्फत ज्ञान होतें असें मला नेहमीं वाटत आलें आहे. त्यामुळेंच मला माझ्या आयुष्यांत कोणतीहि उणीव आहे असें वाटत नाहीं." 'बघतें', 'ऐकतें' या क्रियापदाचा हेलेन लहानपणा-पासूनच अशा सहजपणें उपयोग करते कीं एखाद्याला वाटावें, हिलाहि इतरांप्रमाणें कान-डोळे आहेत. ॲननें हेलेनला अंधशाळेत न डांबतां इतर मुलांमुलींत वावरूं दिले याचें हें सारे श्रेय. मुलांना शक्य तितकें मोकळें राहूं द्यावें, त्यांच्यावर फारसे निर्बंध घालूं नयेत, त्यांना प्रत्यक्ष अनुभवानें ज्ञान मिळविण्याची संधि द्यावी, आयता घास त्यांना भरवूं नये अशी ॲनची विचारसरणी होती. "त्यांच्याभोवतीं योग्य वातावरण ठेवलें तर मुलें आपण होऊन शिकतील. त्यांना प्रत्यक्ष शिकवण्यापेक्षां मार्गदर्शनाची आणि सहानुभूतीची अधिक गरज असते," असें ॲनचे मत होतें.

मादाम मॉटेसोरी यांना शिशुशिक्षणशास्त्राची आद्य पुरस्कर्ती मानण्यांत येतें. पण सान फ्रान्सिस्को येथें एका जाहीर सभेत भाषण करतांना व्यासपीठावर हेलेनजवळ बसलेल्या ॲन सुलिव्हानकडे बोट दाखवून मादाम मॉटेसोरी म्हणाल्या, "तुम्ही मला बालशिक्षणाची आद्य पुरस्कर्ती म्हणून गौरवतां, पण खरी आद्य पुरस्कर्ती ही आहे." कारण 'मॉटेसोरी

पद्धत' सुरू होण्याआधीं वीस वर्षे ॲननें या तत्त्वांच्या अनुरोधानें अध्यापनाचे प्रयोग केले होते. पुष्कळशी मुलें हट्टी बनतात तीं त्यांच्या पालकांनी त्यांना समजूतदारपणें न वागवल्यामुळेच, हें ॲन सुलिव्हान व मादाम मॉटेसोरी यांना अनुभवानें पटलें होतें. वडिलधाऱ्या मंडळींना न जुमानणारीं हेलेनसारखीं मुलें ख़पदां स्वभावानें फार उमदीं व प्रामाणिक असतात असें त्यांना निरीक्षणांतीं आढळून आलें होतें. सर्व मुलें मूलतः सत्प्रवृत्त व सुस्वभावी असतात असा त्यांनीं दीर्घ संशोधनानंतर निष्कर्ष काढला होता. मॉटेसोरीबाईंना अभिप्रेत असणाऱ्या बालकाचें हेलेन ही जणूं प्रतीक होती. दुसऱ्याच्या उपयोगी पडतांना हेलेनला नेहमी आनंद वाटे. सर्व अडचणींवर मात करून कोणतीहि गोष्ट साध्य करतांना आणि दुसऱ्याचें साहाय्य न घेतां कामें करून दाखवतांना हेलेनचा चेहरा आनंदानें फुलून येई. 'प्रात्यक्षिक' शिक्षण-पद्धतीवर मॉटेसोरीप्रमाणेच ॲनचाहि भर होता. मॉटेसोरी शाळेंतल्या बालकांप्रमाणेच हेलेनला तिनें केर काढणें, फर्निचर साफ करणें, कपडे धुणें, कपबशा विसळणें, स्वतःचे कपडे स्वतः घालणें, स्वयंपाक करणें याचें शिक्षण दिलें होतें या शिक्षणाद्वारें ॲननें हेलेनच्या कर्तृत्वाला, निरीक्षणशक्तीला, औत्सुक्याला, ज्ञानलालसेला, आणि निर्णयशक्तीला चालना दिली व त्यांचा विकास केला. खुद्द माटेसोरी पद्धतींत सुद्धां बालकांची स्पर्शसंवेदना अधिक जागृत व उपयुक्त व्हावी म्हणून कांहीं कामें डोळ्यांवर फडके बांधून त्याचेकडून करून घेण्यांत येतात. या पद्धतीनें लहान मुलें हातानीं 'पाहण्यास' शिकतात.

"हेलेन केलर आणि ॲन सुलिव्हान याना मी माझ्या शिक्षिका मानतें" असें मादाम मॉटेसोरी एका प्रसंगी म्हणाल्या होत्या. त्यांनीं आपलें एक पुस्तकहि हेलेनला अर्पण केलें आहे. पण या सर्व गोष्टी फार फार नतरच्या आहेत! ॲलाबामांतील त्या अंध-मूक-बहिऱ्या बालिकेचें भवितव्य एवढें उज्ज्वल असेल अशी त्यावेळीं कोणाला पुसट कल्पना तरी होती काय?

# : २ : ‘आश्चर्यजनक बुद्धिमत्तेची मुलगी’

आपण हेलेनला काय शिकवलें आहे याची पर्किन्स इन्स्टिट्यूशनचा प्रमुख मायकेल अनॅनॉस याला कल्पना यावी म्हणून हेलेनला घेऊन अॅन सुलिव्हान १८८८ मध्ये बॉस्टनला गेली. बॉस्टनपर्यंतच्या रेल्वे-प्रवासांतहि हेलेनचें प्रबोधन चालू होतें. अॅन खिडकीजवळ बसली होती आणि टेनेसी नदीचे रम्य पात्र, लांबवर पसरलेलीं कापसाचीं शेतें, दऱ्या, टेकड्या, फळबागा, कुरणांत चरणारे मेंढ्यांचे कळप, गुरें या साऱ्यांची प्रतिकृति हेलेनच्या अंतश्चक्षूंसमोर उभी रहावी अशा तन्मयतेनें आपल्या बोटांनी हेलेनच्या हातावर झरझर धावणाऱ्या निसर्गाचें शब्दचित्र रेखीत होतीं. स्टेशनवरील निग्रोंचे मनमोकळें हास्य, आपल्या कामांत गढून गेलेले शेतकरी हे बारीकसारीक तपशील देखील हेलेनला कळावे इतक्या जलद अॅनचीं बोटं तिच्या हातावर नाचत होतीं. जीवनाबद्दल हेलेनला दुर्दम्य उत्साह वाटतो याचें कारण अॅननें तिला त्यांतील सूक्ष्मतम आनंदाचाहि बोध होईल याबद्दल दाखवलेली तत्परता हें होय.

आपल्याला समजणाऱ्या भाषेत पर्किन्स संस्थेंतले सर्व अंध विद्यार्थी आपल्याशीं ‘बोलूं’ शकतात याचा हेलेनला फार आनंद झाला. (स्पर्शखुणाची ही भाषा स्पेनमधील मौनव्रतधारी भिक्षूंनीं प्रथम शोधून काढली.) बाह्य मानवी जग आणि हेलेन यांची परस्परांशीं ओळख होण्यास जिचें उदाहरण कारणीभूत झालें ती लॉरा ब्रिजमन अजून ‘पर्किन्स’मध्येंच होती. लॉरा आतां साठ वर्षांची असली तरी तिची बौद्धिक वाढ मात्र लहानपणींच खुंटली होती. हेलेन आणि लॉरांतला हा सर्वांत महत्त्वाचा फरक. अॅन व हेलेन तिच्या खोलींत गेल्या तेव्हां

लॉरा बिणीत बसली होती. ॲनला तिनें नुसतें हातांच्या स्पर्शानें ओळखलें. हेलेनचेंहि तिनें प्रेमानें स्वागत केलें. पण आपली लेस मात्र हेलेनच्या हातांत देण्यास ती नाखूष दिसली. ती हेलेनला तुटकपणें म्हणाली, "तुझे हात स्वच्छ नाहींत." हेलेनच्या 'उत्साहपूर्ण खेळकर हालचालीहि तिला आवडल्या नाहींत. "मोठ्या माणसांशीं वागतांना जरा अदबीनें वागलें पाहिजे" असा तिनें हेलेनला उपदेश केला.

हेलेननें पर्किन्स संस्थेंत विद्यार्थिनी म्हणून नांव कधींच दाखल केलें नाहीं. पण अधूनमधून ॲनेनॉसबरोबर ती तेथें कांहीं दिवस जाऊन राही. बॉस्टनच्या आजूबाजूचीं ऐतिहासिक स्थळेंहि हेलेननें 'पाहिलीं.' इंग्लंडमधील धार्मिक जुलुमाला कंटाळल्यामुळें 'मे-फ्लॉवर' जहाजातून अमेरिकेचा किनारा गांठणाऱ्या आद्य वसाहतवाल्यांनी ज्या खडकावर प्रथम पाय टेकले त्या खडकाला तिनें स्पर्श केला. 'लिटल् लॉर्ड फॉटलिरॉय', 'अरेबियन नाइट्स', 'पिलग्रिम्स प्रोग्रेस', लॅबनें लिहिलेल्या शेक्सपीयरच्या नाटकांच्या गोष्टी इत्यादि अनेक पुस्तकेंहि हेलेननें पर्किन्स संस्थेंत वाचून काढलीं. इमर्सन, हॉथॉर्न व लुइझा ॲलकॉट यांचीं घरें तिनें पाहिलीं. लुइझा ॲलकॉटची 'लिटल् वुइमेन' कादंबरी हेलेननें पूर्वीच वाचली होती. हेलेन पट्टीची पोहणारी होती. सरोवराच्या बर्फमय पृष्ठभागावरून घसरत जाणें हा तिचा फार आवडता खेळ होता. मायकेल ॲनेनॉसला तर हेलेन म्हणजे 'जगांतलें आठवें आश्चर्य' वाटे. तो युरोपच्या दौऱ्यावर गेला तेव्हां त्यानें प्रत्येक देशांत या 'अद्भुत' मुलीच्या कर्तृत्वाची मुक्तकंठानें स्तुति केली. स्वतःला आलेलें हेलेनचें एक पत्र मायकेल ॲनेनॉसनें ग्रीसच्या राणीला वाचून दाखविलें. इंग्लंडची सम्राज्ञी व्हिक्टोरिया हिच्या कानावरहि हेलेनची कीर्ति गेली होती. 'आश्चर्यजनक बुद्धिमत्तेची मुलगी', 'बॉस्टनमधील चमत्कार', अशा शब्दांत ॲनेनॉस हेलेनचा उल्लेख करी. हेलेन बारा वर्षांचीहि झाली नव्हती तेव्हांपासूनच तिच्या शिक्षणांतील प्रत्येक बारीकसारीक

प्रयोगाकडे यूरोप आणि अमेरिकेचे डोळे लागून राहिले होते.

ॲनेनॉसच्या वर्णनांत ग्पुष्पदां अतिशयोक्तीहि असे, त्यामुळें अनेकांना ती सारी कपोलकल्पित कथा वाटे. या बारेमाप प्रसिद्धीमुळें हेलेनचा तोटा होईल अशी ॲनला काळजी वाटू लागली. पुष्कळांना तर हेलेन हें एक मोठे ढोंग आहे असें वाटे. हेलेन अस्खलित बोलूं शकते, ती पियानो उत्तम वाजवते आणि लांकडी ठोकळ्यांच्या साहाय्याने भूमितीचे प्रश्न सोडवून दाखवते अशा अतिरंजित अफवाहि ॲनेनॉसच्या भाषणांमुळें सर्वत्र पसरल्या. तसें पाहिलें तर अंध व वाचाहीन हेलेननें जी प्रगति केली होती ती इतकी आश्चर्यकारक होती कीं तिची अतिशयोक्ति करणेंहि अशक्य ठरलें असतें. सात वर्षांची असल्यापासून तिला जर्मन भाषा येत होती. पुढें ती लॅटिन आणि ग्रीक शिकली. ग्रीसच्या प्रवासावर असलेल्या मायलेक ॲनेनॉसला तिनें फ्रेंच भाषेत एक सुंदर शैलीदार पत्र लिहिलें. यावेळीं ती फक्त दहा वर्षांची होती. इतर लोक बोलतांना त्यांच्या गळ्याच्या शिरा व ओठ यांची कशा प्रकारे हालचाल होते यांचा स्पर्शद्वारा अभ्यास करून ती बोलण्याचा प्रयत्न करूं लागली. पण अहर्निश प्रयत्न करूनसुद्धां अद्याप तिचा शुद्ध-स्पष्ट बोलण्याचा प्रयत्न यशस्वी झालेला नाहीं आणि याची तिला फार खंत वाटते.

'लांबवरच्या रेल्वेप्रवासांत कोणतें पुस्तक बरोबर घ्यायला तुला आवडेल?' असा प्रश्न एकदां कोणींतरी विचारला असतां बारा वर्षांच्या हेलननें लगेच उत्तर दिलें, "मिल्टनचें पॅरेडाइज लॉस्ट" इंग्लिशवरील तिचें प्रभुत्व पाहून ऑलिव्हर वेंडेल होम्स चकित झाले. ब्रेल लिपींत छापलेलीं फ्रेंच व लॅटिन भाषांतलीं पुस्तकें हेलेननें भराभर वाचून संपवलीं. मोलियेरचीं प्रहसनें वाचतांना ती पोट धरधरून हसत असे. जीवनाविषयींची आत्मीयता आणि कधींहि न कोमेजणारी टवटवीत वृत्ति यांनीं तिचा चेहरा सदैव उजळलेला असे.

अशा प्रकारें केवळ ज्ञानग्रहण करण्यावरच हेलेनची प्रगति थांबली

नाहीं. स्वतंत्र विचारशक्तीहि तिच्या ठिकाणीं होती. ती दहा वर्षांची असतांना एकदां तिचे वडील आपल्या मित्रांबरोबर आयातनिर्यात जकातीसंबंधीं बोलत होते. त्यांचें बोलणें तुला समजणार नाहीं असें ॲननें सूचित केलें तेव्हां हेलेननें तिला विरोध दर्शवला. हेलेन म्हणाली, "मला समजेल कीं नाहीं हें तुला कसें समजलें? माझें मन विकासप्रवण आहे. पुरातन काळीं ग्रीस देशांत थोरा-मोठ्यांची चर्चा ऐकण्यास लहान मुलांना प्रोत्साहन दिलें जात असे हे तूं विसरलीस काय? आणि त्या चर्चेपैकीं कांही भाग तरी त्या मुलांना निश्चित समजत असला पाहिजे असें मला वाटतें."

हेलेनची स्मरणशक्तीहि असामान्य आहे याचा ॲनेनॉसला अनेकदा प्रत्यय आला. एकदां म्युनिक शहरासंबंधीं बोलणें चाललें असतां तेथील ऐजर नदीवर पांच पूल आहेत असें विधान त्यानें केलें. हेलेननें त्याला अडवलें व सांगितलें कीं त्या नदीवर चारच पूल आहेत. आणि हेलेनचें म्हणणें बरोबर होतें. आपल्या विधानाला आधार म्हणून तिने ॲनेनॉसनेंच व्हिएन्नाहून तिला लिहिलेलें एक पत्र काढून दाखवलें. त्यांत चार पुलांचा उल्लेख होता! त्याच वेळीं ॲनेनॉसच्या बोलण्यांत सेंट पीटर चर्चवरील 'क्रॉस'ची उंची ४६० फूट आहे असा उल्लेख आला. त्यावर हेलेनने त्याचें रोममधून आलेलें एक पत्र त्याच्यासमोर ठेवलें; या पत्रांत त्या क्रॉसची उंची ४३५ फूट आहे असें लिहिलें होतें. या उदाहरणांवरून हेलेन फार शिष्ट किंवा गर्विष्ठ होती अशी कोणीं कल्पना केल्यास ती एक मोठी चूक ठरेल. कारण हेलेनच्या मनाच्या सरळपणाच्याच वरील गोष्टी द्योतक होत. तिनें विनय कधीहि सोडला नाहीं. आपल्या मानसिक शक्तींबद्दल प्रौढी मिरविण्यापेक्षां त्यांचा प्रत्यक्षांत उपयोग करण्याकडेच तिचा कल असे. 'जगांतल्या सर्व देशांत मला फ्रान्स अधिक आवडतो. कारण फ्रेंच लोक फारच आनंदी मनोवृत्तीचे आहेत', असें तिनें एका संभाषणात व्यक्त केलेलें मत तिच्या स्वतःच्या निर्व्याज आनंदी वृत्तीचें द्योतक आहे.

स्वभावानें अत्यंत निर्व्याज आणि प्रेमळ असल्यामुळेंच एवढ्या प्रचंड कौतुकानें देखील ती चढून गेली नाहीं. दुसऱ्यांसाठीं कांहीं तरी करतां यावें अशी तिची सदैव धडपड असे. जें इतरांना मिळूं शकत नाहीं तें मलाहि नको अशीच आफ्रिकेच्या जंगलांत जाऊन हॉस्पिटल चालवणाऱ्या डॉ. श्विट्झरप्रमाणें तिचीहि भावना होती. वयाच्या बाराव्या वर्षी तिनें अंधांच्या एका शिक्षणसंस्थेला दोन हजार डॉलर निधि जमवून दिला. पुढल्याच वर्षी तिनें आपले खाऊचे पैसे सांठवून अॅलाबामामधील आपल्या जन्मगांवीं असलेल्या ग्रंथालयासाठीं पुस्तकें विकत घेतलीं. टॉमी स्टिंजर नांवाचा पेनसिल्वेनियांतील एक अंध-बहिरा मुलगा अनाथाश्रमांत अत्यंत हलाखींत दिवस कंठीत होता, त्याला शिक्षण मिळावें म्हणून तिनें अनेक वृत्तपत्रांना व आपल्या ओळखींतल्या प्रत्येकाला विनंतिपत्रें लिहून फंड उभारला. अनेक नामवंत व्यक्तींनीं तिला या कामांत सक्रिय मदत केली. त्यावेळचा विख्यात इंग्लिश चित्रकार मिले यानेंसुद्धां या फंडाला देणगी पाठवली व त्याबद्दल हेलेननें अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत त्याचे पत्रानें आभार मानले.

थोडक्यांत म्हणाजे अवघ्या बाराव्या वर्षी हेलेननें अडचणींचे जे डोंगर यशस्वीपणें ओलांडले ते पार करतांना जीभ, कान आणि डोळे शाबूत असलेलीं माणसें सुद्धां गांगरून गेलीं असतीं. हेलेनच्या करारीपणाची चुणुक तिच्या घरच्या लोकांना पूर्वीच पाहावयास मिळाली होती. ती आठ वर्षांची होती तेव्हां कोणीं तरी तिच्या कामांत कांहीं ढवळाढवळ केली. हेलेनला हें खपलें नाहीं. ती अस्वस्थ झाली. ‘तूं कसल्या विचारांत एवढी गर्क आहेस ?’, या अॅनच्या प्रश्नाला उत्तर देतांना हेलेन म्हणाली, “ माझें स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्रस्थापित करण्याची तयारी करतें आहें मी.” हेलेनजवळ मनाची एकाग्रता इतरांपेक्षां कितीतरी पटींनीं अधिक आहे याची अॅनला वारंवार साक्ष पटे. कोणतीहि गोष्ट आत्मसात् करण्यास जितकी म्हणून अवघड तितका त्या गोष्टीवर प्रभुत्व मिळविण्याचा

हेलेनचा हुरूपहि मोठा! अंध व्यक्तींत सामान्यत: आढळून येणारी दुर्बलता, भित्रेपणा यांचा मागमूसमुद्धां हेलेनमध्यें नव्हता. ती सुदृढ आणि साहसप्रिय होती. दृष्टि आणि ध्वनि यांना जगीं ती कायमची पारखी झाली होती तरी त्यामुळे ती अधिकच निश्चयी बनली. पण तिचें खास स्वत:चें असें वैशिष्ट्य म्हणजे तिचें तत्त्वज्ञ मन. एक दिवस ती ॲनला म्हणाली, "काय आश्चर्याची गोष्ट! या खोलीच्या बाहेरसुद्धां न पडतां मी अथेन्सला जाऊन आलें." अंधत्वामुळे तिच्या हालचालींना मर्यादा पडल्या असल्या तरी देह आणि स्थलकाल यांच्या बंधनांपलीकडे असलेल्या एका अस्तित्वाचा अनुभव आपलें मन घेऊं शकतें हें तिला जाणवलें. "अपंग शरिराचें जोखड न जुमानतां माझें मन महासागर आणि भूप्रदेश ओलांडून ग्रीससारख्या दूर देशांत भ्रमण करून येऊं शकतें याचा प्रत्यक्ष अनुभव येतांच मी आनंदानें धुंद झालें. माझ्या शारीरिक व्यंगांचा माझ्या अंतर्मनावर कोणताच अनिष्ट परिणाम होणें शक्य नाहीं हें मला समजलं," असें हेलेननें आपल्या आत्मचरित्रांत लिहिलें आहे.

पुढें कॉलेजमध्यें गेल्यावर तिला आपल्या आयुष्याला अर्थ देणारें महद्वाक्य सांपडलें, तें म्हणजे देकार्त या तत्त्ववेत्त्याचें 'माझी प्रज्ञा हेंच माझें अस्तित्व' (I think therefore I am) हें वचन. हेलेनचें जीवन ॲनेनॉसला एखाद्या अद्भुतरम्य परीकथेसारखें वाटलें यांत नवल नाहीं. हेलेनच्या कर्तृत्वाचें वर्णन नाहीं असें एकहि मासिक त्यावेळीं सांपडलें नसतें. हेलेनच्या हिताच्या दृष्टीनें एवढी प्रसिद्धि चांगली नाहीं असें ॲनला वाटे. "अत्यंत दु:सह आपत्ती कोसळल्या तरी आनंदानें राहता येणें शक्य आहे हें हेलेननें आपल्या उदाहरणानें दाखवून दिलें आहे आणि म्हणूनच अनेकांना तिच्यापासून स्फूर्ति मिळेल," हे ॲनचे शब्द आज खरे ठरले आहेत.

हेलेनबद्दल ॲन पुढें म्हणते, "हसतमुख हेलेनला प्रत्येक व्यक्तीबद्दल, घटनेबद्दल आत्मीयता आहे आणि त्यामुळें सर्वांना ती हवीहवीशी वाटते."

फिलिप्स ब्रुक्स तिला युरोपमधून वरचेवर सविस्तर पत्रें लिहीत. त्या-वेळच्या आणखी अनेक प्रसिद्ध विभूतींना तिनें आपलेंसें केलें होतें. ॲलेक्झँडर ग्रॅहॅम बेलनें तिला वाशिंग्टनमधील 'प्राणिसंग्रहालय' दाखवलें आणि १८९३ सालीं त्यानें तिला व ॲनला शिकागो येथें भरलेल्या जागतिक प्रदर्शनांत नेलें. भोंवतालच्या जगाबद्दलचें अथांग कुतूहल तर हेलेनच्या प्रत्येक कणांतून ओसंडत असतें. अरबी भाषेतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टींमधली अजब दुनियाच या प्रदर्शनाच्या रूपानें आपल्या-पुढें मूर्तिमंत साकार झाली आहे असें हेलेनला वाटलें. तेथील वस्तूंना स्पर्श केल्यानें ज्या संवेदना तिच्या मनांत उमलत त्या संवेदनांच्या पंखांवर बसून तिचें मन हिंदुस्थान, जपान, इटली, इजिप्त या देशांत संचार करून आलें. आपण जणूं कांहीं जगप्रवास करीत आहोत असें तिला या प्रदर्शनांत फिरतांना वाटले. पुढें तर तिला खऱ्याखुऱ्या जगप्रवासाचीहि संधि मिळाली!

फिलिप्स ब्रुक्स यांनीं तिला धर्मशास्त्र विशद करून सांगितलें तर ॲलेक्झँडर ग्रॅहॅम बेलनें तिला मानवाची विज्ञानक्षेत्रांत किती प्रगति झाली आहे याची समग्र माहिती दिली. प्राण्यांच्या उत्क्रांतीविषयींचा डार्विनचा सिद्धान्त त्यानें तिला समजावून सांगितला. हेलेनला प्रिय असलेल्या ग्रीक महाकाव्यांतल्या चित्तथरारक गोष्टींतल्या इतक्या महान् अशा आधुनिक साहसाच्या कथा डॉ. बेलनें तिला सांगितल्या. अटलांटिक महासागरांतून टेलिफोन केबल टाकतांना प्राणास मुकलेल्यांच्या उदात्त त्यागाची आणि धैर्याची हकीकत ऐकतांना हेलेन सद्गदित झाली. महा-सागराच्या तळांतल्या त्या खोल अंधारांतून मानवी शब्द भरारी घेत आहेत या कल्पनेनेंहि ती थरारून गेली. डॉ. बेलनें तिला एक राघू भेट म्हणून दिला. त्या पोपटाची व तिची इतकी गट्टी जमली कीं ती वाचीत असतांना तो तिच्या पायावर, खांद्यावर चढून बसे आणि लाडानें आपली चोंच तिच्या ओठांवर घाशीत असे.

डॉ. बेलनें तिला नायगारा धबधबा 'दाखवला'. प्रचंड आवाज

करीन, खळखळत खालीं कोसळणाऱ्या पाण्याचा आवेग किती आहे याचा अंदाज घेण्यासाठीं हॉटेलच्या ज्या खिडकींतून ती हा देखावा पाहत होती त्या खिडकीच्या दारांवर हेलेननें हात टेकले होते. त्या माध्यमाद्वारा धबधब्यामुळें निर्माण होणाऱ्या ध्वनिलहरी तिच्या हातांना जाणवत व तिला नायगाराच्या उग्र स्वरूपाची कल्पना येई. न्यूयॉर्कला परत आल्यावर तिनें दोन वर्षं बहिऱ्यांच्या शाळेंत शिक्षण घेतलें. आधुनिक कुबेर अ‍ॅन्ड्र्यू कार्नेगी आणि जॉन डी. रॉकफेलर, 'लीग ऑफ नेशन्स'चा जनक वुड्रो विल्सन, त्या काळची अभिनयसम्राज्ञी एलेन टेरी व असामान्य अभिनेता हेन्री आयर्व्हिंग अशा विविध क्षेत्रांतील अग्रेसर व्यक्तींच्या भेटी हेलेननें घेतल्या. तिनें अमेरिकेच्या स्वातंत्र्यदेवीचा पुतळाहि 'पाहिला' डॉ. बेलप्रमाणेंच मार्क ट्वेनशींहि तिची गट्टी जमली. एका मेजवानीच्या प्रसंगीं मार्क ट्वेनशीं तिचा प्रथम परिचय झाला. उपस्थित असणाऱ्या सर्वांशीं सुरवातीस हेलेनची ओळख करून देण्यांत आली. प्रत्येकाशीं तिनें हस्तांदोलन केलें. आणि मेजवानी संपल्यावर निरोप घेतांना जेव्हां पुन्हा त्यांच्याशीं हस्तांदोलन करण्याचा प्रसंग आला त्यावेळीं तिनें नुसत्या हातांच्या स्पर्शावरून सर्वांचीं नांवें बिनचुक सांगितलीं. मार्क ट्वेननें तिचें मस्तक हातांनीं हलकेच थोपटलें तेव्हां क्षणाचाहि विलंब न लावतां हेलेन आश्चर्यानें म्हणाली, "अरे! हे तर मार्क ट्वेन!"

हेलेन त्यावेळीं अवघी चौदा वर्षांची होती. मार्क ट्वेनला हेलेनबद्दल जिव्हाळा वाटूं लागला. मानवी आत्मतत्त्वाला एक नवी उज्ज्वलता प्राप्त झाल्याचा प्रत्यय हेलेनला भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला येतो, असें मार्क ट्वेन म्हणत असे. हेलेन म्हणजे मानवी जगांतला सर्वांत नवा 'चमत्कार' होय असें त्याचे मत होतें. त्याच्या गळ्यावर व ओठांवर आपलीं बोटें ठेवून त्याचें बोलणें हेलेन 'ऐकत' असे. बोलतांना पुष्कळदां त्याला कांहींतरी अवाच्य बोलण्याची इच्छा अनावर होई आणि असले शब्द

हेलेननें 'ऐकणें' इष्ट नाहीं असें वाटे तेव्हां मार्क ट्वेन अलगद तिचा हात आपल्या गळ्यावरून दूर करी व ते शब्द बोलून टाकी.

कोणाचा त्याला राग आला की मार्क ट्वेन ताड्कन् संतापानें उठून उभा राहत असे. 'अशा वेळीं तो क्रुद्ध गरुडासारखा दिसतो', असें हेलेननें त्याच्यासंबंधीं लिहिलें आहे. हेलेनच्या बाबतींत घडलेल्या एका प्रसंगीं तो असाच संतप्त झाला होता. मायकेल ॲनेनॉसला वाढ-दिवसाची भेट म्हणून हेलेननें 'द फ्रॉस्ट किंग' नांवाची एक गोष्ट स्वतः लिहून पाठवली. आणि या गोष्टींतूनच एक मोठे वादळ निर्माण झालें. ही गोष्ट हेलेनची नसून तिनें ती जशीच्या तशी नुसती लिहून काढली आहे असें सिद्ध झालें. मायकेल ॲनेनॉसनें तिच्यावर वाङ्मय-चौर्याचा आरोप केला, आणि या 'प्रकरणा'ची चौकशी करण्यासाठीं आठ जणांची एक समिति नेमली. वस्तुस्थिति अशी होती कीं हेलेननें अजाणतां ही चूक केली होती. पुढें असें निष्पन्न झालें कीं हेलेननें ती गोष्ट खूप दिवसांपूर्वी वाचली होती. आणि तिच्या मनाच्या आश्चर्यकारक एकाग्रतेमुळें तीच गोष्ट पुन्हा तिच्या हातून स्वतःची म्हणून टाईप केली गेली. हें असें कसें घडलें याविषयीं खुद्द हेलेनहि बुचकळ्यांत पडली. तिला फार मनस्तापहि झाला या प्रकरणाचा. पण ती निर्दोष होती हेंहि तितकेंच खरें. तिच्या 'गुन्ह्या'ची चौकशी करण्यासाठीं ॲनेनॉसनें कमिशन नेमलेलें पाहून मार्क ट्वेनला संताप आला. 'शाल-शिष्ट गाढवें' अशा शब्दांत त्यानें कमिशनमधील सदस्यांची संभावना केली. गुन्हेगार ठरलेल्या निष्पाप हेलेनला पाहून मार्क ट्वेनला न्यायाधीशांसमोर सांखळ-दंडांत जखडलेल्या अवस्थेंत उभ्या असलेल्या एकाकी, निराधार 'जोन ऑफ आर्क' ची आठवण झाली.

पण ॲनेनॉसची समजूत पटणें शक्य नव्हतें. संतापानें त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. हेलेनशीं असलेले आपले जिव्हाळ्याचे संबंध त्यानें तोडून टाकले. हेलेनला पर्किन्स संस्थेंतून काढण्याच्या

'कृतघ्न'पणाबद्दल तो ॲनला जन्मभर दूषण देत राहिला. बाह्य जगाच्या मोकळ्या वातावरणांत हेलेनचा अनिर्बंध विकास व्हावा अशी ॲनची इच्छा होती, तर आपण स्वतः प्रकाशांत आणलेली एक तेजस्वी तारका म्हणजे हेलेन अशी ॲनेनॉसची तिच्याबद्दल भूमिका होती. 'आम्हां दोघींना मायकेल ॲनेनॉसनें आपल्या अंतःकरणांतून हद्दपार केले,' असें हेलेननें या घटनेसंबंधीं म्हटलें आहे. या 'फ्रॉस्ट किंग' प्रकरणानें हेलेनच्या मनांतहि भीति, शंका आणि अनिश्चितता यांचा कल्लोळ उडवून दिला व पुढें कित्येक वर्षे हेलेनला त्यापासून अमर्याद मनस्ताप झाला. कांहींहि लिहितांना आपण पूर्वी ऐकलेलें किंवा वाचलेलेंच तर पुन्हा कागदावर उतरवीत नाहीं ना अशी तिला धास्ती वाटत असे.

दरम्यानच्या काळांत हेलेनचे वडील वारले. तिच्या शिक्षणासाठीं पुरेसे पैसे ते मागें ठेवूं शकले नव्हते, म्हणून मार्क ट्वेननें एक फंड उभारून तिच्या शिक्षणाची तरतूद केली. केंब्रिज येथील रॅडक्लिफ कॉलेजच्या प्रवेशपरीक्षेचा अभ्यास अल्पावधींत पुरा करून हेलेन ती परीक्षा चांगल्या रीतीनें पास झाली. आपल्या मार्गांतल्या अडचणींचें हेलेनला कधीं दडपण वाटत नसे. उलट त्या पार पाडतांना तिला अधिकाधिक आनंद होई. तिला किती प्रकारच्या अडथळ्यांना तोंड द्यावें लागलें हें पाहिलें म्हणजे आपली मति कुंठित झाल्यावांचून राहत नाहीं. महाग पाठ्यपुस्तकें तिला ब्रेल लिपींत टाइप करून घ्यावीं लागलीं. ग्रीकमध्यें टाइप करतां येईल अशीहि सोय तिच्या टाईपरायटर यंत्रांत मुद्दाम केलेली होती. बीजगणितांतलीं चिन्हें आणि भूमितींतल्या आकृत्या कागदावर उठवण्याचें एक यंत्रहि तिनें बनवून घेतलें. आंधळ्यांसाठीं अमेरिकेंत सर्व विषयांवरील ग्रंथ उपलब्ध नसल्यानें तिला इंग्लंड-जर्मनींतून, कांहीं दिवसांत वाचून परत करण्याच्या अटींवर, पुस्तकें मागवावीं लागत. ॲनची तिला या कामांत खूप मदत होई. कॉलेजांतील तासांना ॲन हेलेनजवळ बसे आणि प्राध्यापकांचें भाषण चालू

असतांनाच तें भापण ती एकीकडे हेलेनच्या हातावर आपल्या बोटांनीं टाइप करी. याच पद्धतीनें ॲन तिला ब्रेलमध्यें उपलब्ध नसलेलीं इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान या विपयांचीं पुस्तकें वाचून दाखवी. स्वत: हेलेननें ग्रीक शब्दकोशाची शक्य तेवढी कमी मदत घेऊन ‘एनिड’, ‘इलियड’ हीं महाकाव्यें वाचून काढलीं. १९०४ मध्यें तिनें रॅडक्लिफ येथील अभ्यासक्रम पूर्ण केला तेव्हां ग्रीक, लॅटिन, फ्रेंच व जर्मन या भापांत ती पारंगत झाली होती. ‘इतकें ज्ञान मिळवूनहि हेलेन ‘अभ्यासजड’ झाली नाहीं ती केवळ आपल्या वृत्तीमधील ओसंडत्या जीवनोत्साहामुळें!’, असें तिची मुलाखत घेणाऱ्या एका फ्रेंच गृहस्थानें म्हटलें आहे.

“स्मिथ, वेलस्ली किंवा ब्रायन मॉर या जवळच्या विद्यापीठांत न जाता लांबचें रॅडक्लिफ आपण कां निवडलेत?” असा प्रश्न पुढें बऱ्याच वर्षांनी एका भेटींत त्यावेळचे अमेरिकेचे अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनीं तिला विचारला तेव्हां हेलेननें उत्तर दिलें, “कारण मला प्रवेश देण्यास रॅडक्लिफचे चालक तयार नव्हते. माझा स्वभाव हट्टी आहे. मी त्यांच्या सर्व आक्षेपांना तोंड द्यायचा निर्धार केला.” तिला रॅडक्लिफच्या शिक्षणक्रमांत कोणतीहि सवलत देण्यांत आली नव्हती. आणि आपला लौकिक म्हणजे निव्वळ जाहिरातबाजीच्या जोरावर निर्माण करण्यांत आलेलें अमेरिकन ढोंग नाहीं हें हेलेनला सिद्ध करायचें होतें.

‘जोन ऑफ आर्क’, युलिसेस, सॉक्रेटिस, कोलंबस यांना हेलेन आपले आदर्श मानते. त्यांच्या जीवनचरित्रांतूनच आपल्याला बिकट परिस्थितीशीं धैर्यानें व हंसऱ्या चेहऱ्यानें झगडण्याची प्रेरणा मिळाली असें ती विनम्रपणें सांगते.

## : ३ : 'रेन्थॅम'

रॅडक्लिफचा पदवीदान समारंभ झाल्यावर त्याच दिवशीं हेलेन आणि ॲन बॉस्टनपासून २६ मैलांवर असलेल्या 'रेन्थॅम' या निसर्गरम्य गांवीं आल्या. तेथें त्यांनीं एक जुनें घर विकत घेतलें होतें. रॅडक्लिफमध्यें शिकत असतांना याच गांवीं एका कुटुंबांत हेलेन राहिली होती, त्यामुळें हें गांव तिला आवडूं लागलें होतें. शिवाय ॲलाबामांतल्याप्रमाणें सभोवार शेतें, बागा असलेल्या घरांत राहण्याची हेलेनची इच्छा होती. रेन्थॅम येथें ती कांठावरील गवताच्या वासाच्या अनुरोधानें नदींत होडी चालविण्यास शिकली होती. रेन्थॅम येथें राहणारे त्यावेळचे एक प्रसिद्ध पत्रकार आणि वनस्पतिशास्त्रज्ञ जोसेफ ई. चेंबरलेन हेलेनला घेऊन रानावनांत हिंडत आणि निरनिराळीं झाडें, फुलें, पक्षी यांची माहिती देत. अशा वनसंचारांतच चेंबरलेननीं हेलेनला 'न्यूज फ्रॉम नोव्हेअर' या विल्यम मॉरिसच्या पुस्तकाची आणि समाजवादाची ओळख करून दिली. समाजवादी विचारांचे हें बीज हेलेनच्या मनांत चांगलेंच रुजलें.

हेलेनसाठीं घेतलेलें घर चांगलें ऐसपैस होतें आणि थोड्या डागडुजी-नंतर तें नवें दिसूं लागलें. सर्व खोल्यांत भरपूर सूर्यप्रकाश येई. खिडक्यांत कुंड्या मांडून हेलेननें त्यांत विविध प्रकारचे वेल व फुलझाडें लावलीं. घराभोंवतीं अनेक पाइन वृक्ष दाटीनें उभे होते. या वृक्षांच्या पानांची सळसळ ऐकत हेलेन किती तरी वेळां विचारमग्न स्थितींत, अनेक स्वप्नें मनांत फुलविण्यांत रंगून जाई. माडीवरच्या तिच्या खोलीला जोडून एक सज्जा होता. त्यांत येऊन उभें राहिलें कीं तिला वाऱ्याच्या विशिष्ट कंपनावरून पानांची सळसळ ऐकूं येत असे. एकदां

सज्जाचा कठडा नेहमींपेक्षां विचित्रपणें कंप पावला आणि हेलेनला समजलें कीं थोड्या अंतरावर कोपऱ्यांतल्या खांबावर बसून 'व्हिपूरविल' पक्षी गात आहे ! अंध महाकवि होमर याचा एक पुतळा तिनें आपल्या खोलींत ठेवला होता. त्या पुतळयाच्या चेहऱ्यावरून ती बोटें फिरवी. अनेक दुःखें सहन केलेला हा महाकवि प्रीति, जीवन, संघर्ष या विषयांवरील आपल्या काव्यपंक्ति गुणगुणत आहे असा तिला भास होई. ग्रीक ही तिची सर्वांत आवडती भाषा. "ग्रीक भाषा म्हणजे मानवी विचारांचें तंतवाद्य (व्हायोलिन) आहे," असें ती म्हणे. ब्रेल लिपींत छापलेलीं ग्रीक भाषेतलीं पुस्तकें वाचतांना कित्येकदां तिच्या बोटांचा पुढील भाग सोलून निघे व त्यांतून रक्त येऊं लागे पण ती वाचायची थांबत नसे. प्लेटो आणि ईस्किलस यांचे ग्रीक भाषेतील ग्रंथ आणि लॅटिनमधलीं टॅसिटस, प्लॉटस, होरेस यांचीं पुस्तकें तिच्या संग्रहीं होतीं. तिच्या ग्रंथालयांत निवडक फ्रेंच आणि जर्मन पुस्तकेंहि होतीं. शेक्सपियर, पोप, ड्रायडन, कीट्स, शेली, आणि ब्राउनिंग हे तिचे आवडते कवि. अमेरिकन लेखकांपैकीं इमर्सन, थोरो व व्हिटमन तिला विशेष आवडत.

दररोज सकाळीं सहाला उठून हेलेन वेणीफणी, खोलीची साफसफाई, प्रत्येक खोलींतील फुलदाण्यांत ठेवण्यासाठीं फुलें निवडणें, न्याहारीची तयारी, न्याहारीनंतर कपबशा विसळणें, पाण्याची टाकी भरावी म्हणून पवनचक्की सुरू करणें हीं कामें झटपट उरकून टाकी. तिच्या मदतीला ॲन असेच. धोब्यांकडे टाकायच्या कपड्यांची ती आठवड्यांतून एकदां ब्रेल लिपींत यादी तयार करी आणि त्या यादीबरहुकूम धोब्यानें आणलेले कपडे मोजून घेई. रॅडक्लिफमध्यें शिकत असतांना ती इतर विद्यार्थिनींबरोबर दहा दहा मैलांचा फेरफटका करी, सायकलवरून चाळीस मैलांची रपेट करण्यासहि ती तयार असे आणि हिंवाळ्यांत रात्रीं लाकडी खोक्यांत बसून बर्फावरून घसरत जाण्यास ती नेहमीं उत्सुक असे. ॲनबरोबर ती घोडदौडहि करी. बहुतेक वेळीं ॲन लगाम धरीत असे, पण जनावर गरीब

असेल तर ती हेलेनला एकटीनेंसुद्धां रपेटीला पाठवी फिरायला गेल्यावर आजूबाजूच्या झाडाझुडपांमध्यें घुसायचें, त्यांत कुठें खरचटलें, ओरखडे उठले तरी मागे यायचें नाहीं असा हेलेनचा खाक्या. आपल्याला दुखापत झाल्याचें तर ती कधींच कबूल करीत नसे. एकंदरींत तिला वेगाची आवड होती. कुत्र्यांचीहि तिला हौस होती. कितीहि मोठ्या भयानक कुत्र्याला हात लावतांना ती भीत नसे. ॲननें स्वतः एक छोटें शेतहि पेरलें होतें. हेलेन सफरचंदाच्या झाडावर चढे आणि फांद्या हलवून सफरचंदें पाडी. पण पुढेंपुढें फळबागांची मशागत करण्याचा नाद दोघींनीं सोडून दिला. कारण हरणांनीं बहुतेक झाडांच्या साली फस्त करून टाकल्या.

जीवनांत कोणत्या विशिष्ट कार्यासाठीं आपला जन्म झाला असावा हा प्रश्न तिच्या मनांत सदैव जागृत असे. इतका पैसा खर्च करून आपल्याला आपल्या हितचिंतकांनीं जें शिक्षण दिलें त्याचा सदुपयोग कसा करतां येईल याचें उत्तर ती कॉलेजांत असतांना स्वतःला नेहमीं विचारी. असा कोणता तरी मार्ग असलाच पाहिजे आणि तो आपल्याला सांपडला तर आपण जीवनाचें ऋण अंशतः तरी फेडूं शकूं अशी तिची श्रद्धा होती. हेलेनच्या जीविताची दिशा ॲनपेक्षां आपणच अधिक चांगली ठरवूं शकूं असें वाटणाऱ्या अनेक व्यक्ति त्यावेळीं होत्या. आपल्या देशांतल्या एका अंधशाळेचें संचालकत्व तिला रुमानियाची राणी कारमेन सिल्वा हिनें देऊं केलें. हेलननें ही नोकरी नाकारली तेव्हां तिच्यावर आप्पलपोटेपणाचा व अंधांबद्दल मनांत खरी कळकळ नसल्याचा आरोप करून राणीसाहेबांनीं आपला पत्रव्यवहार बंद केला. अंध बालकांना इतरांपासून वेगळीं काढून शिक्षण देण्यानें तीं जगापासून दुरावतात, त्यांना जगाचें यथार्थ ज्ञान होत नाहीं, असें हेलेनचें मत असल्यानें तिला कारमेन सिल्वाची योजना स्वीकारार्ह वाटली नाहीं. आणि या एका राणीनें तिच्यावर चिडून टीका केली तरी पुढें इंग्लंड, हॉलंड,

स्पेन आणि ग्रीस या चार देशांच्या राण्यांनीं हेलेनचा सन्मान केला !

कारमेन सिल्वासारख्या इतर कांहीं व्यक्तींना विरोध करण्याचा प्रसंग हेलेनवर आला तेव्हां मार्क ट्वेनचा तिला सतत पाठिंबा मिळाला. अंधांच्या सेवेंत जीवन व्यतीत करणें हेंच आपलें कार्यक्षेत्र असल्याचें हेलेनला उमगलें होतें—पण भरीव कार्य हातून व्हावें म्हणून नेमकें काय केलें पाहिजे याची स्पष्टशी कल्पना तिच्या मनांत अद्याप नव्हती. बाह्य जगाला अंधांच्या हलाखीची जाणीव करून देतां यावी म्हणून आपल्याला प्रथम शुद्ध-स्पष्ट बोलतां आलें पाहिजे हें तिला पटलें व म्हणून तिनें आपले उच्चार सुधारण्याचे प्रयत्न सुरू केले. अंधांच्या उन्नतीसाठीं स्थापन झालेल्या बॉस्टनच्या एका संस्थेची ती सभासद झाली आणि अंधांच्या स्थितीची चौकशी करण्यासाठीं एक समिति नेमावी अशी तिनें या संस्थेतर्फे कायदेमंडळाकडे मागणी केली. जीवनांत कोणतीहि भूमिका करायची ठरवली तरी आपण निष्क्रिय मात्र कधींच राहायचें नाहीं असा तिचा निर्धार होता. पण या सुरवातीच्या काळांत मात्र ‘आपण अगदीं एकाकी आहोंत, आपण कांहींच करूं शकणार नाहीं,’ अशा प्रकारचे निराशामय विचार तिच्या मनाचा गोंधळ उडवीत. आपल्या मन:स्थितीचें वर्णन करतांना हेलेन लिहिते, “दाट धुक्यांत मी गुरफटून गेलें आहें, अवतींभवतीं चिटपांखरूंहि नाहीं, आणि माझ्यासाठीं कायमचें बंद असलेलें जीवनाचे कवाड उघडण्याची मी वाट पाहत आहें असें मला वाटे.” पण वॉल्ट व्हिटमनच्या ‘द सॉंग ऑफ द ओपन रोड’ या काव्यानें तिला तिचा आत्मविश्वास आणि धैर्य परत मिळवून दिलें. ‘मिडस्ट्रीम’ या आपल्या पुस्तकांत ती म्हणते, “व्हिटमनला भेटण्यासाठीं मी उत्सुक झालें होतें.” पुढें व्हिटमनच्या सन्मानार्थ देण्यांत आलेल्या एका मेजवानीच्या प्रसंगीं हेलेन कृतज्ञतेनें म्हणाली, “माझ्या बंद घराच्या अनेक खिडक्या त्यानें उघडल्या आणि मला प्रकाश दाखवला.”

आपल्या शिक्षणाचा आपल्याला कांहीं उपयोग करतां येईल का, याचा विचार करतां करतां निदान आपण भाषांतर करूं शकूं किंवा आंधळ्यांसाठीं ब्रेलमध्यें पुस्तकें लिहूं शकूं असा तिला विश्वास वाटूं लागला. रॅडक्लिफ कॉलेजांत असतांनाच तिनें 'द स्टोरी ऑफ माय लाइफ' नांवाचें आत्मचरित्र लिहिलें होतें. तिची लेखनशैली कल्पकतापूर्ण आणि प्रामादिक होती. तिच्या लेखनांतील प्रतिमांवर बायबलची छाप होती. हे आत्मचरित्रपर निबंध क्रमशः छापण्याचे हक्क एका मासिकानें तिच्याकडून तीन हजार डॉलरना खरेदी केले. या पुस्तकाच्या बाबतींत तिला हारवर्ड व रॅडक्लिफ येथील एक तरुण उत्साही शिक्षक जॉन मॅकी याचें बहुमोल साहाय्य मिळालें. स्पर्शभाषा मॅकीलाहि अवगत होती. या माध्यमांतून दोघे पुस्तकाबद्दल चर्चा करीत. १९३० मध्यें हस्तलिखित तयार झाल्यावर हेलेनला त्यांत आणखी कांही दुरुस्त्या, सुधारणा करतां याव्या म्हणून त्याची ब्रेल प्रतहि तयार करण्यांत आली. हाताने लिहिण्यास किंवा टाइप करण्यास हेलेनला फार श्रम पडत. ब्रेल पद्धतीनें लिहिणें तर आणखीच कठिण होतें. टाइपरायटरवर टाइप करायचें म्हटले तरी मागील पानाचा संदर्भ विसरल्यास कोणाकडून तरी तो स्पर्शानें 'वाचून' घ्यावा लागे. किंवा केसांत खोवण्याच्या क्लिपनें ती टाइप केलेल्या कागदावरील शेवटचे कांहीं शब्द ब्रेल लिपींत लिहून काढी.

पण इतकी यातायात पडत असतांनाहि तिचे पुस्तक बरेंच मोठे झालें. जॉन मॅकीनें त्यांत हेलेनच्या कांहीं पत्रांचा व ॲन सुलिव्हाननें तिला कोणत्या पद्धतीनें शिकवले याविषयींच्या माहितीपूर्ण लेखाचाहि समावेश केला. या पुस्तकाला अपूर्व यश मिळालें. त्याचे पन्नास भाषांत अनुवाद झाले. हिंदुस्थानांतील कानडी, पुश्तु, तामिळ, तेलुगु आणि उडिया या भाषांत हें पुस्तक मिळूं शकतें.

१९०५ सालीं जॉननें ॲन सुलिव्हानशीं विवाह केला, त्यामुळें हेलेनच्या जीवनांत त्याला अधिकच महत्त्वाचे आणि जवळचे स्थान

मिळालें. जॉन ॲनहून अकरा वर्षांनीं लहान होता. तो स्वतः उत्तम पत्रकार होता. तत्त्वज्ञान हा त्याचा आवडीचा विषय. एक कुशल वाङ्मयीन टीकाकार म्हणून तो ओळखला जाई. ' द नेशन ' या पत्राच्या वाङ्मय विभागाचा तो कांहीं दिवसांनीं संपादक झाला. अमेरिकन साहित्याच्या स्वरूपाची चर्चा करणारें त्याचें ' द स्पिरिट ऑफ अमेरिकन लिटरेचर ' हें पुस्तक फारच गाजलें.

हेलेनच्या आणि जॉन मॅकीच्या अनेक आवडी-निवडी मिळत्या-जुळत्या होत्या. हेलेनप्रमाणेंच त्याचे विल्यम जेम्स, वॉल्ट व्हिटमन, मार्क ट्वेन हे आवडते लेखक होते. मार्क ट्वेनचें ' प्रिन्स अँड द पॉपर ' हें हेलेननें ' पाहिलेलें ' पहिलें नाटक. ' लाईफ ऑन द मिसिसिपी ' ही साहसपूर्ण कादंबरीहि तिला फार आवडे. कारण लहानपणीं मेंफिस येथें असतांना जुन्या पद्धतीच्या वाफेवर चालणाऱ्या बोटीवर हेलेन जाऊन आली होती. विल्यम जेम्स आणि व्हिटमन ह्यांनीं मानव-प्राण्यांविषयीं भलत्या आदर्शवादी कल्पना बाळगल्या नाहींत, तरीहि मानवाच्या सुप्त कर्तृत्वाविषयीं त्यांना श्रद्धा होती, आणि या कारणा-साठींच हेलेन आणि मॅकी यांना हे लेखक आवडत. मॅकीनें तिला (तिच्या हातावर बोटांनीं टाइप करीत) रॉबर्ट लुई स्टीव्हन्सन, विल्यम जेम्स, थोरो, मार्क ट्वेन या लेखकांचीं पुस्तकें वाचून दाखविलीं. कॉलेजमध्यें असतांनाच हेलेननें शॉपेनहावर, निश्शे, बर्गसाँ, टॉलस्टॉय यांचे ग्रंथ वाचले होते. त्यामुळें समाजवादाबद्दलहि तिच्या मनांत आस्था निर्माण झाली होती. जॉन मॅकीनें तिला रोमां रोलां, हार्डी, क्रोपोट्किन, ॲनतोल फ्रान्स आणि एच. जी. वेल्स यांच्या कलाकृतींचा परिचय करून दिला व समाजवादावरील तिची श्रद्धा दृढमूल झाली. रॅडक्लिफमध्यें शिकत असतांना ती आपल्या मैत्रिणींबरोबर विश्वबंधुत्व, लोकशाहीची वाढ, यांसारख्या प्रश्नांवर चर्चा करी. जगांतील साम्राज्यशाही नष्ट करून तेथें निर्दोष लोकशाहीची निर्मिति कशी करतां येईल या विषयींच्या

अनेक योजना तिनें मनांत आंखल्या होत्या. अनेक विचारवंत आतां समाजवादाच्या बाजूला कसे झुकूं लागले आहेत हें मॅकीनें तिला पटवून दिलें. उद्योन्मुख लेखकांत तर त्यावेळीं समाजवादी मतप्रदर्शनाची फॅशनच पडली होती.

"अमेरिकेंत राजेरजवाडे नसले तरी सर्वसत्ताधारी भांडवलवाल्यांची लहरी सुलतानशाही तिथें अंमल गाजवीत आहे," असें जॉननें आपल्या 'अमेरिकेंतील समाजवाद' या निबंधांत लिहिलें आणि हेलेन अर्थातच त्याच्याशीं सहमत होती. ॲन सुलिव्हानबरोबर हेलेन शहरांतील गरिबांच्या गलिच्छ वस्त्यांत फिरली होती. तेथील कुबट, काळोखी, झोपडीवजा घरें, लक्तरें पेहरणारीं अर्धपोटी मुलें, त्यांच्या जीवनांतील दैन्य, संघर्ष, निराशा हें सारें पाहून तिला तत्कालीन समाजव्यवस्थेचा संताप येई. अंधत्वाचें मूळ अनेकदां गरिबी व अस्वच्छ राहणी यांमध्यें असतें हें तिला माहीत होतें. राजकारणांत भांडवलवाल्यांचे प्राबल्य होतें. त्यांना स्वतःच्या स्वार्थापलीकडे इतर कशाची पर्वा नव्हती. कॉलेजांतलें पुस्तकी अर्थशास्त्र आणि प्रत्यक्षांत आढळून येणारा हा विषमतेचा अनर्थ यांचा कांहींच मेळ नाहीं असें तिला आढळून आलें. एच. जी. वेल्सच्या 'न्यू वर्ल्ड्स फॉर ओल्ड' या पुस्तकानें तिच्या समाजवादी विचारांना अधिकच चालना दिली. आपलें अस्तित्व प्रस्थापित करतांना तिला स्वतःला जे कष्ट पडले होते त्यांची आठवण तिला कामगारांचा जीवनसंघर्ष पाहतांना होई. कामगारांच्या हितासाठीं आपण झटावें असें तिला वाटूं लागलें. ॲनच्या शब्दांत सांगायचें म्हणजे, 'हेलेन हाडाची सुधारक होती.' आजहि हेलेनचे विचार तितकेच प्रगतिशील आहेत.

मॅकीबद्दल हेलेनला कृतज्ञता वाटे. कारण त्याच्याकडूनच तिला साहित्यांतील नव्या प्रवाहांची, विज्ञानांतील नवनवीन शोधांची आणि वर्तमानकाळांतल्या महत्त्वाच्या घडामोडींची माहिती मिळे. कित्येकदां तो

रात्रभर जागून तिचें हस्तलिखित टाइप करी, तर केव्हां केव्हां तिच्या लेखनावर कडक टीका करून तिला उपयुक्त सुधारणा सुचवी. सुप्रसिद्ध संस्कृत पंडित आर्थर रायडर, कलावस्तुसंग्राहक कॉनरड अॅरेन्सबर्ग यांसारख्या निरनिराळ्या क्षेत्रांतील अधिकारी व्यक्तींना रेन्थॅम 'येथें आणून मॅकी त्यांच्याशीं संभाषण करण्याची हेलेनला संधि मिळवून देत असे. रेन्थॅममधील या गप्पांच्या मैफलीमध्यें नेहमींच कोणी तरी एखाद्या महत्त्वाच्या पुस्तकाविषयीं बोले, कोणी एखादी नवी कल्पना मांडी, किंवा कोणी नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या सुंदिर कविता वाचून दाखवी. अशा काव्यशास्त्रविनोदानेंच हेलेनच्या बुद्धीला विलक्षण धार आली, त्याचप्रमाणें ती साहसोत्सुक व आशावादी बनली. अॅनसुद्धां चांगली रसिक आणि संभाषणचतुर होती. नावीन्य आणि मौज यांच्याबद्दल तिला आसक्ति वाटे. पण तिची मनोवृत्ति बरीचशी अस्थिर असे. कधीं कधीं ती एकदम खिन्नमनस्क होऊन एकटीच दूरवरच्या सरोवराकांठीं असलेल्या होडीच्या आडोशाला जाऊन बसे पण थोड्या वेळानंतर आपोआप पुन्हा पूर्वीइतक्याच उल्हसित, आनंदी, हसतमुख आणि मिष्किल चेहऱ्यानें परत येई !

स्वतः दृष्टीनें अधु आणि निष्कांचन असूनसुद्धां वर्षानुवर्षे विनावेतन, अविचल निष्ठेनें परिश्रम करून हेलेनचें अंधःकारमय आयुष्य उजळून टाकणाऱ्या अॅनची महती वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतील. अॅनच्या मृत्यूनंतर हेलेननें लिहिलेलें तिचें चरित्र अत्यंत हृद्य आहे. हेलेन-सारख्या अंध-मूक-बहिऱ्या मुलीला शिक्षण देण्याचा महान् प्रयोग अॅन-पूर्वी कोणींहि केला नव्हता. त्यामुळें तिला शिकविण्याचें सगळें तंत्र आणि शास्त्र अॅननें स्वतः निर्माण केलें. रेन्थॅम येथील त्यांच्या दीर्घ वास्तव्याचा प्रत्येक क्षण आनंदांत आणि उद्बोधनांत गेला. त्यांत कधींहि निराशा किंवा नीरसपणा आला नाहीं. संध्याकाळच्या वेळीं हेलेन कधीं कधीं उठावाच्या पत्त्यांनीं 'पेशन्स'चा डाव मांडून बसे किंवा विणकाम-

भरतकामांत मग्न होई. पुष्कळदां ती ॲन किंवा जॉनबरोबर बुद्धिबळेंहि खेळत असे. हीं बुद्धिबळें आणि पट हेलेनला समजण्यासाठीं विशिष्ट प्रकारें बनवून घेतलीं होतीं. पांढरे मेन्य काळ्यापेक्षां जरा मोठ्या आकाराचें असे. त्यावरून हेलेनला आपलीं मोहरी-प्यादीं कोणतीं आणि प्रतिपक्षाचीं कोणतीं हें समजूं शके. पटावर चौकोनांच्या सीमा खोदल्या होत्या, त्यांवरून हेलेनला मोहोरीं कुठल्या घरांत हलवायचीं तें ठरवतां येई. घराबाहेरच्या प्रदेशांत झाडांझाडांना मॅसीनें एक तार बांधून ठेवली होती. त्या तारेचा आधार घेऊन हेलेन घरासमोरील बागेत, शेजारच्या दफनभूमींत, टेकड्यांवर, कुरणांत मनमोक्त भटकत असे. पाऊस, हिम आणि वारा यांच्या वर्षावांत ती न्हाऊन जाई. त्यावेळीं मॅकी तिच्या बरोबर असे.

मॅकीच्या मदतीनें हेलेननें 'माझे जग' (The World I Live In) आणि 'अंधारांतून प्रकाशाकडे' (Out of the Dark) हीं आणखीं दोन पुस्तकें लिहिलीं. रॅडक्लिफला कॉलेजांत शेवटच्या वर्षाला असतांना तिनें 'आशावाद' (Optimism) या नांवाचें एक छोटें पुस्तक लिहिलें होतें. "आनंदी वृत्तीची व्यक्ति जाईल तिथें आनंद निर्माण करते," असें तिनें त्यांत प्रतिपादन केलें आहे. पण हेलेनचा हा आशावाद उथळ किंवा निव्वळ चैनविलासावर आधारलेला नव्हता. डोळे नसल्यानें जगांतील अनेक उद्वेगजनक, दुर्दैवी दृश्यें तिच्या दृष्टिआड राहिलीं होतीं, त्याचप्रमाणें तिला ममतेनें मदत करणारीं माणसें मिळत गेलीं, आर्थिक विवंचनेची झळ तिला सहन करावी लागली नाहीं हें सारें खरें आहे. पण तेवढ्यावरून तिचें आयुष्य आरामाचे होतें असा निष्कर्ष काढणें चुकीचें ठरेल. जगांतल्या अन्यायाची, विषमतेची, दुःखांची तिला पूर्ण जाणीव होती. स्वतःच्या वैगुण्यांना हसण्याइतकें खंबीर मन व खिलाडू वृत्ति तिच्या अंगीं होती. "आंधळ्यावहिऱ्या व्यक्तीच्या आयुष्यांतला अंधार आणि शांतता हीं त्याला सुखद नसतात; दोन्हींचें

स्वरूप इतकें अमानुप असतें कीं त्यामुळें ती व्यक्ति अस्वस्थ होऊन जाते. पांखरांची मधुर किलबिल, वायूलहरीचा निःश्वास, प्रसन्न हास्याची लकेर यांना त्याच्या आयुष्यांत स्थानच नसतें," असें अंतःकरण हलवून सोडणारें वर्णन हेलेनच्या एका पुस्तकांत आपणांस आढळतें. पण असें असूनहि इमर्सनप्रमाणेंच हेलेनचा आशावादहि कणखर आहे. तिच्याच शब्दांत सांगायचें म्हणजे 'आयुष्य म्हणजे प्रतिकूल परिस्थितीविरुद्ध चालणारी एक प्रदीर्घ लढाई आहे'. शाळेंत तिला शेक्सपियर शिकविणाऱ्या एका शिक्षिकेच्या आठवणीप्रमाणें 'ॲज यू लाईक इट' या शेक्सपियरच्या विनोदी नाटकांतील गमतीदार प्रसंग आणि 'किंग हेन्री द फिफ्थ' मधील गंभीर भाग हेलेनला विशेष आवडत असत, हें तिच्या मनःप्रवृत्तींच्या संदर्भांत ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. कोणत्याहि शारीर उणीवा आपल्या मनाच्या आणि विचारांच्या प्रगतीला बांध घालूं शकणार नाहींत याची तिला मनोमन खात्री आहे. आणि हेंच तिच्या कणखर, प्रांजल आशावादाचें रहस्य होय. तत्त्वज्ञानाच्या सखोल वाचनाचाहि तिच्या मनावर विधायक परिणाम झाला. ज्यू आणि ख्रिश्चन या दोघांनीं वाळींत टाकून अमर्याद अवहेलना केली, अत्यंत दारिद्र्यांत दिवस कंठावे लागले, तरी या आपत्तींची क्षिति न बाळगतां आनंदी वृत्तीनें जगणारा महान् तत्त्वज्ञ स्पिनोझा याच्याशींच हेलेनची तुलना होऊ शकेल. स्पिनोझावर आलीं तींच सगळीं संकटें तिच्यावर कोसळलीं नाहींत, तरी दोघेहि सारखींच दुर्दैवी होतीं. हेलेनच्या कल्पनेची, आकलनशक्तीची झेप अमर्याद होती. त्यामुळें परिस्थितिजन्य अडचणींचा तिच्या मानसिक विकासाला अडथळा झाला नाहीं.

प्रतिकूल परिस्थितीशीं सतत झगडून विजय संपादन केल्यानें जो आशावाद निर्माण होतो तोच खरा आशावाद असें हेलन मानते. अज्ञानावर किंवा बेफिकिरीवर आधारलेला आशावाद घातक ठरतो. अन्यायांकडे दुर्लक्ष करण्यानें त्याचें उच्चाटन तर होत नाहींच, उलट

माणसें बेपर्वा बनतात, असें हेलेनचें मत आहे. त्याचप्रमाणें केवळ सुस्वभाव किंवा सदिच्छा यांना ती फारसें महत्त्व देत नाहीं. निरलस प्रयत्न करण्याची तयारी हीच तिच्या दृष्टीनें सर्वांत महत्त्वाची गोष्ट. वैफल्यवादी, निराशावादी विचारसरणीविषयीं हेलेन लिहिते, "अज्ञान, दारिद्र्य, गुन्हेगारी यांविरुद्ध झगडण्याची प्रेरणाच निराशावादामुळें माणसाच्या मनांतून नष्ट होते आणि जीवनांतील आनंद लुप्त होतो. वैफल्यवादामुळें प्रतिकूल परिस्थितीशीं झुंज देण्याची हिंमत त्याच्यांत उरत नाहीं. धैर्यशाली मनोवृत्तीचे लोकच विजयी होतात. स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास नसणें हें भित्रेपणाचें लक्षण आहे."

'आयुष्य हें एक साहसाचें आव्हान आहे, तें तसें नसेल तर त्यांत कांहींच अर्थ नाहीं,' या हेलेनच्या उद्गारांत आणि तिच्या जीवनक्रमांत अनेक विचारवंतांना गांधीजीप्रणीत 'सत्याग्रहा'च्या तत्त्वज्ञानाचे पडसाद ऐकूं येतात. या असीम धैर्यामुळेंच तिची चालू युगांतील लोकोत्तर विभूतींत गणना होते.

'हेलेनचें आयुष्य उदास आणि कंटाळवाणें असलें पाहिजे,' असा अभिप्राय कोणीं तरी एकदां व्यक्त केला तेव्हां मार्क ट्वेननें त्यांना ताबडतोब उत्तर दिलें, "असें मानण्यांत तुम्ही फार मोठी चूक करीत आहांत. आंधळेपण नेहमींच रोमांचकारी असतें. घरानें मध्यरात्रीं अचानक पेट घेतला आहे आणि दिशांसंबंधींची सगळी जाणीव हरपून गेल्यामुळें आपल्या खोलींतल्या मिट्ट अंधारांत दार सांपडवण्यासाठीं आपण धडपड करीत आहोंत, असें चित्र मनांत उभें करा, म्हणजे समजेल तुम्हांला मी काय म्हणतों तें." हेलेनच्या अंधःकारमय जीवनांत मार्क ट्वेननें चैतन्य निर्माण केलें. हेलेन म्हणते, "मार्क ट्वेननें मला आनंदी बनविलें व या जगांत मलाहि कांहीं विशिष्ट स्थान आहे याची जाणीव करून दिली." मार्क ट्वेन स्वतः समाजवादी नव्हता, पण त्याला हुकूमशाहीचा तिटकारा असे. त्याच्या मृत्यूपूर्वींचे तीन दिवस हेलेन व ॲन यांनीं त्याच्या

सांनिध्यांत त्याच्या स्टॉर्मफील्ड येथील निवासस्थानीं घालविले. हेलेनचें तो नेहमीं कौतुक करी व तिला उत्तेजन देई. पण हेलेनला अधिक आनंद होई तो ॲनच्या कार्याचें खरें मोल त्याला उमगलें आहे याचा! तो स्वतःला अश्रद्ध आणि तुच्छतावादी म्हणवी, पण जगांतील क्रौर्य, ढोंगीपणा, क्षुद्रता यांवर कडाडून हल्ला चढवितांना त्याचें मन निस्संदेह असे. त्याच्या उदार व मनमोकळ्या स्वभावानें हेलेन प्रभावित झाली. "हेलेन, डोळे असून ज्यांना कांही दिसत नाहीं अशा भकास व्यक्तींनी हें जग भरलेलें आहे," असें तो नेहमीं म्हणे. त्याच्या खोलींत कोणालाहि सहज दिसेल अशी एक पाटी होती. कोणी चोरी करायला म्हणून खोलींत शिरला तर त्याच्या सोयीसाठीं म्हणून कोणत्या मौल्यवान वस्तु कुठे ठेवल्या आहेत याची यादी त्या पाटीवर लिहिलेली असे!

हेलेनचें जीवन प्रतिक्षणीं नव्या अनुभवांनीं समृद्ध होत होतें. डॉ. अलेक्झांडर ग्रॅहम बेलनें तिला पदार्थविज्ञानांतले अनेक सिद्धांत समजावून सांगितले. विजेसंबंधीं माहिती करून देतांना त्यानें तिला एक उंच टेकडीवर नेलें व हवेंत उडणाऱ्या पतंगाची सूक्ष्म तार तिच्या हातीं दिली. पतंगाला विलक्षण ओढ होती व हेलेननें तार तर हातांत घट्ट धरली होती, त्यामुळें ती बरेंच अंतर फरपटली गेली! तिला बोलायला शिकवण्याचेहि त्यानें आटोकाट प्रयत्न केले. हेलेन ही एक असामान्य स्त्री आहे हें त्यानें जाणलें होतें. तिचें अंधत्व आनुवंशिक नव्हतें, त्यामुळें, 'संधि आली तर लग्न करण्यास कचरूं नको,' असा त्यानें हेलेनला उपदेश केला. पण हेलेनला विवाह ही एक अशक्य गोष्ट वाटली.

संसाराचा गाडा यशस्वीपणें चालण्यासाठीं त्याचीं दोन्ही चाकें सारखींच मजबूत हवींत असें तिचें मत होतें. आणि तिचीं व्यंगें तर उघड होतीं. आपल्याशीं कोणीहि लग्न करण्यास तयार होणार नाहीं असेंच तिला नेहमीं वाटे! तथापि भवितव्यता अगम्य असते. तिच्याहि आयुष्यांत एक दिवस प्रीतीनें प्रवेश केला. पण—!

# : ४ : अंधारांतून प्रकाशाकडे

हेलेन उंचनिंच आणि सशक्त होती. तिचा चेहरा रेखीव आणि नाक सरळ होतें. आपले तांबूस रंगाचे दाट केस उलटे फिरवून ती कपाळावर बिंदीप्रमाणें शोभणारी काळी मखमलीची रिबन बांधी. शिक्षणाचा प्रत्येक कण आत्मसात् करण्यासाठीं तिला कराव्या लागलेल्या भगीरथ यत्नांचा लेशहि तिच्या हसऱ्या चेहऱ्यावर दिसत नसे. नवीन गोष्टींबद्दलचें तिचे कुतूहल कधींच कमी झालें नाहीं. आपले विचारहि ती मोजक्या पण परिणामकारक शब्दांत व्यक्त करी. एकदां प्रेमाविषयीं बोलणें निघालें असतां ती म्हणाली, "आपल्यावर कुणीं तरी प्रेम करावं असं कधींच न वाटलेली एक तरी स्त्री सांपडेल काय? पण मला वाटतं कीं संगीत आणि प्रकाश यांप्रमाणेंच प्रीतीचाहि माझ्या जीवनांत प्रवेश होणार नाहीं." याच प्रसंगीं ती पुढें म्हणाली, "आनंद हा पर्वतशिखरासारखा आहे. कधीं कधीं भोवतालीं ढग जमल्यानें शिखर दिसेनासें होतें, पण तरीहि तें तिथें आहे हें आपल्याला ठाऊक असतें. आनंदाचेंहि तसेंच आहे."

हेलेन नुसती विचारांनीं आशावादी नाहीं. ती सदैव आनंदांत असते हें तिचें वैशिष्ट्य होय. "मनांत प्रतिबिंबित होणाऱ्या मौलिक जाणिवांचाच विचार केला तर हेलेनचें अंतर्विश्व आपल्यापेक्षां कितीतरी पटींनीं अधिक समृद्ध आहे," असें गौरवपर मत डॉ. रिचर्ड कॅबट यांनीं एका समारंभाचे प्रसंगीं व्यक्त केलें. तिच्याइतक्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचीं माणसें क्वचितच आढळतात. तिच्याकडे पाहून इतरांनाहि आनंद होतो. खऱ्याखुऱ्या मानसिक प्रसन्नतेशिवाय असा हसरा भाव चेहऱ्यावर उमलणार

नाहीं. यामुळेंच तिच्या मानसिक प्रक्रियांचें गूढ जाणून घेण्याची मानसशास्त्रज्ञांना आणि डॉक्टरांना जिज्ञासा वाटते. त्यांच्या या जिज्ञासेमुळे हेलेनचे कांहीं वेळां हाल होतात. प्रयोगासाठीं निवडलेल्या प्राण्यासारखी तिची अवस्था होते. पण त्यांतून इतर अंधांनाहि उपयुक्त ठरणारे शोध निघूं शकतील या एका जाणिवेनें ती डॉक्टरांना त्यांच्या पद्धतीनें स्वतःवर प्रयोग करूं देण्यास तयार असते.

तिच्या स्पर्शसंवेदना व गंधसंवेदना इतक्या कार्यक्षम बनल्या आहेत कीं शास्त्रज्ञांना त्यांचें नवल वाटतें. तिला माहीत नसलेल्या रस्त्यावरून एकदां तिला मोटारींतून नेण्यांत आलें, तरी 'भोंवतालीं विस्तीर्ण शेतें आहेत, आतां रस्त्याच्या दुतर्फा झाडें आहेत, या क्षणीं मोटार एका घराजवळून चालली असून त्या घरांतील शेगडींत कोळशाऐवजीं लाकडें जळत आहेत. सध्यां आपण जात आहोत त्या भागांत अनेक इमारती आहेत....इथें छपाईच्या शाईचा वास येतो यावरून ही इमारत छापखान्याची असली पाहिजे.' हें तिचें तंतोतंत बरोबर असलेलें धावतें वृत्तनिवेदन ऐकून मोटारींत बसलेले शास्त्रज्ञ थक्क झाले. कान–डोळे असणाऱ्यांना स्पर्श आणि गंध या दोन संवेदनांची फारशी गरज भासत नाहीं त्यामुळे त्या संवेदनांचा पूर्ण विकास होत नाहीं. पण हेलेनला सर्वस्वीं या दोन संवेदनांवर अवलंबून राहावें लागल्यानें त्या प्रखर बनल्या.

हेलेनला कोणत्या प्रकारचीं स्वप्नें पडतात याचेंहि शास्त्रज्ञांना मोठें कुतूहल होतें. भोंवतालची सृष्टि जिनें कधींच पाहिली नाहीं अशा हेलेनची स्वप्नसृष्टि कोणत्या स्वरूपाची असेल? हेलेननें त्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरें दिलीं. ती म्हणाली, "मला स्वप्नें अगदीं क्वचित् वेळां पडतात. स्वप्नांत मी स्वयंपूर्ण असतें. स्वप्नांतसुद्धां मला वेगवेगळे गंध, चवी जाणवतात आणि जागृत मनांत कधींहि न येणाऱ्या कल्पना स्पर्श करतात. वाचनांत आलेल्या गोष्टी कधीं कधीं स्वप्नांत माझ्यापुढें साकार होतात. उदाहरणार्थ: १८५७ सालचें हिंदुस्थानांतलें लष्करी बंड, फ्रेंच

राज्यक्रांति, रशियांतलें ज्यूंचें हत्याकांड." तिला स्वप्नांत उभीं शहरें जळतांना दिसत आणि ती त्या ज्वाळा विझवण्याचा प्रयत्न करीत असे. एकदां तर तिच्या हातांत एक मूल होतें आणि 'त्याला मारूं नका' असें ती शिपायांना विनवत होती. कधीं कधीं आग ओकणारी एक आकृति तिला स्वप्नांत दिसे. (लहानपणीं एकदां हेलेन चुकून विस्तवा-जवळ गेली असतां तिच्या कपड्यांनी पेट घेतला. जवळच्या मोलकरणीनें तिला ब्लँकेटमध्यें गुंडाळल्यानें ती वांचली. या प्रसंगाची सुप्त भीति किंवा आठवण तिच्या मनांत खोलवर रुजली असावी व त्यामुळें तिला असें स्वप्न पडत असावें, अशी या स्वप्नाची कांहीं मानसशास्त्रज्ञांनीं उपपत्ति लावली आहे.)

हातांचीं बोटें हेच हेलेनचे कान आणि डोळे! कोणत्याहि वस्तूवरून हात फिरवून हेलेन ती वस्तु 'पाहूं' शकते. त्याचप्रमाणें बोलणाऱ्याच्या गळ्यावर व ओठांवर बोटें टेकून ती त्याचें बोलणें स्पष्ट 'ऐकते'. इतकेंच नव्हे तर एकाच भाषेंतील प्रादेशिक वेगळेपणाहि तिला अचूक जाणवतो. नुसत्या हातांच्या ठेवणीवरून ती त्या व्यक्तीचा व्यवसाय व स्वभाव ओळखते. पाकळ्यांना स्पर्श करून हेलेन फुलांचीं नांवें अचूक सांगते, इतकेंच नव्हे तर पांढरा गुलाब आणि पिवळा गुलाब यांतला फरकहि पाकळीला स्पर्श करतांच तिला जाणवतो. कारण रंगाबरहुकूम पाक-ळ्यांचा पोत (Texture) व जाडीहि बदलत असते. ऑर्केस्ट्रा वाजत असला तर त्या ध्वनिलहरी फरशींतून तिच्या पायांपर्यंत पोंचतात आणि ती गाण्याला योग्य ठेका धरते. नुसत्या स्वरलहरींवरून वेगवेगळीं वाद्येंहि ती ओळखून दाखवते! प्राणिसंग्रहालयांत गेल्यावर ती पिंजऱ्यांचे गज हातांत धरते आणि त्यांमधून ज्या ध्वनिलहरींचा तिला बोध होतो त्यावरून ती आंत कोणतें जनावर आहे हें सांगते. मधमाशांचा गुंजारव, झऱ्यांची झुळझुळ, पक्ष्यांच्या पंखांची फडफड तिला कळूं शकते. एकदां ती हॉटेलांत बसली असतां भोवतालीं वावरणाऱ्या माणसांच्या

पावलें टाकण्याच्या पद्धतीवरून तिनें कोणता मनुष्य घाईंत आहे, कोण गोंधळला आहे, कोण अतिशय दमलेला आहे, कोण भित्रा, कोण शूर, कोण दुःखी, कोण आनंदी, कोण रागावलेला आहे हें अचूक ओळखून सगळ्यांना चकित केलें.

स्पर्शसंवेदनेइतकीच तीव्र अशी गंधसंवेदना हेलेनच्या ठिकाणीं जागृत असल्यानें तिच्या जाणिवांचें क्षेत्र अधिक व्यापक झालें आहे. चंदन, देवदार, दालचिनी या वृक्षांप्रमाणेंच प्रत्येक वृक्षांतून व वनस्पतींतून एक विशिष्ट गंध येत असतो. आणखी विशेष म्हणजे एकाच वृक्षाच्या खोडांतून, पानांतून, मुळांतून आणि फळांतून येणाऱ्या गंधांत फरक असतो. हे अतिसूक्ष्म फरक आपल्याला कळत नसले तरी हेलेनच्या घ्राणेंद्रियाला जाणवतातच. 'इथून थोड्या अंतरावर पेट्रोलची विहीर आहे, अमुक दिशेला दारू गाळण्याचा कारखाना आहे' हें ती सांगूं शकते याचें गुपित हेंच! चर्चेच्या विशिष्ट बांधणीमुळें चर्चमध्यें घुमणाऱ्या किंवा परावर्तित होणाऱ्या आवाजाचा कंप एका विशिष्ट प्रकारचा असतो. त्यामुळें हेलेन चर्चची इमारत कोणती हें सांगूं शकते व याहिपुढें जाऊन ती तें प्रॉटेस्टंट पंथाचें चर्च आहे कीं कॅथॉलिक पंथाचें याचाहि खुलासा करते.

'तुम्हांला अवघ्या तीन दिवसांसाटीं दृष्टि आली तर तुम्ही काय कराल?' असा प्रश्न हेलेनला एकदां विचारण्यांत आला होता. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'थ्री डेज़ टु सी' या लेखांत तिनें या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. ती म्हणते, "पहिल्या दिवशीं मी माझ्या सर्व मित्रांचे चेहरे पाहून घेईन. चित्रें, पुस्तकें, लोकरीचीं पांघरुणें यांचे रंग न्याहाळीन. निरागस बालकाच्या चेहऱ्यावरील भाव निरखीन. रानांत भटकेन व संध्याकाळीं वीजदिव्यांच्या कृत्रिम प्रकाशाची शोभा पाहीन. दुसऱ्या दिवशीं मी उगवत्या सूर्याचें स्वागत करीन, म्यूझियम पाहीन, आर्ट गॅलरीमध्यें जाऊन जुन्या इटालियन धर्तीच्या चित्रांमध्यें व

मॉडर्न आर्टमध्यें काय फरक आहे तें समजून घेण्याचा प्रयत्न करीन. संध्याकाळीं मी प्रेक्षागृहांत जाऊन पॅव्हलोव्हाचें नृत्य किंवा हॅम्लेट नाटक पाहीन. तिसऱ्या दिवशीं गगनचुंबी 'एम्पायर स्टेट बिल्डिंग' मधून व 'ईस्ट रिव्हर ब्रिज' या अजस्र पुलावरून न्यूयॉर्क कसें दिसतें तें पाहीन. उरलेल्या वेळांत शहरांत भटकेन!"

'मानवाच्या सुप्त शक्तींचा अद्यापहि पूर्ण विकास झालेला नाहीं. आपल्याला आज कल्पनाहि येणार नाहीं इतकें मानवाचें कर्तृत्व भावी काळांत वाढूं शकेल,' या हेलेनच्या विधानांत अतिशयोक्ति नाहीं हें तिच्या स्वतःच्या उदाहरणावरूनच पटण्यासारखें आहे!

## : ५ : प्रगतीचें मुक्तद्वार

'सतत कार्यमग्न रहा' या कार्लाईलच्या सूत्राचा हेलेनच्या समकालीन तरुण पिढीवर प्रभाव पडला होता. कोणत्या तरी उदात्त ध्येयासाठीं जन्मभर प्रयत्न करीत राहण्याचा हेलेनचा निर्धार होता. त्यासाठीं आधीं तिला स्वावलंबी व्हायचें होतें. तिच्या घरची इस्टेट वगैरे कांहीं नव्हती आणि कॉलेज शिक्षणासाठीं मदत करणाऱ्या धनिकांवरहि विसंबून चालण्यासारखें नव्हतें. कारण त्यांची मदत जितकी उदार तितकीच लहरी होती. कोणत्या वेळीं ती बंद होईल याचा नेम नसे. जॉन मॅकीनें ॲनशीं लग्न केलें तेव्हां आतां जॉनच सगळा खर्च भागवील अशी कल्पना करून घेऊन हेलेनला चालू असलेली मदत अनेकांनीं बंद केली. हेलेन स्वाभिमानी आणि स्वतःच्या प्रयत्नांवर विश्वास बाळगणारी असल्यानें ती डगमगली नाहीं. पैशांअभावीं ॲनचें कसें होईल याची मात्र तिला फार काळजी वाटे. कारण ॲन तिला संपूर्णपणें विनावेतन शिकवीत असे. जॉनलाहि पुरेसे पैसे मिळण्याची खात्री नव्हती. त्यांतच भरींत भर म्हणून कीं काय, मुळांत अधू असलेली ॲनची दृष्टि आतां पुन्हा अंधत्वाकडे झुकूं लागली. शिवाय ॲन आणि हेलेन—दोघी कोणत्याहि उपयुक्त कार्याला मदत देण्याचे कामीं नेहमींच मुक्तहस्त असत. अंधबहिऱ्यांच्या संस्थांप्रमाणेंच संपावर गेलेल्या न्यू जर्सी प्रांतांतल्या कामगारांनाहि त्या आर्थिक मदत देत. हेलेनला एकदां एका मासिकानें लावलेल्या चढाओढींत पांच हजार डॉलरचें बक्षिस मिळालें तेव्हां तिनें ती सर्व रक्कम आंधळ्यांसाठीं असलेल्या एका निधीला देऊन टाकली. याहून अधिक संस्थांना आपण मदत देऊं शकत नाहीं याबद्दल तिला

रुखरुख वाटत होती. सबंध जगांतून तिला मदतीसाठीं पत्रें येत व त्यांना आपण कांहीं देऊं शकत नाहीं याची हेलेनला खंत वाटे.

आपलें पुढें कसें होईल याबद्दल ती पूर्ण बेफिकीर होती; पण ॲनच्या सुरक्षिततेची तिला फार काळजी लागून राहिली होती. 'जीवन्मृत' समजल्या जाणाऱ्या हेलेनला नवसंजीवन देण्यासाठीं ॲनने आपलें जीवन वाहिलें होतें. आणि अशा चमत्कारिक परिस्थितींत आपण मरण पावलो तर ॲनला चरितार्थाचें कांहींच साधन नाहीं याची हेलेनला भीति वाटे. लेखनावर आपल्याला पुरेसे पैसे मिळवतां येतील का, याचा हेलेन विचार करूं लागली. भाषांतराचें काम तिला जमलें असतें. आतां तर फ्रेंच-जर्मन-ग्रीक यांच्या जोडीला ती इटालियन भाषाहि शिकली होती. पण या मार्गानें कितीसे पैसे मिळूं शकणार? आणि अंधांचा प्रश्न व स्वतःचें जीवन या दोन विषयांखेरीज हेलेन लिहिणार तरी कशा-विषयीं? राष्ट्राच्या नैसर्गिक संपत्तीची जोपासना, आयात-निर्यातीवरील कर, शिक्षणपद्धतींत आवश्यक असणाऱ्या सुधारणा अशा सार्वजनिक हिताच्या प्रश्नांवर हेलेननें लेख लिहावे असा डॉ. बेलचा तिला आग्रह होता, पण या विषयांवर आपणाला फारसें कांहीं लिहितां येणार नाहीं असें हेलेनला वाटे. शिवाय अंधशिक्षण व तिचें स्वतःचें जीवन यांहून वेगळ्या विषयांवर तिचीं मतें काय आहेत याविषयीं बाह्य जगाला विशेष उत्सुकता नव्हती. निदान हेलेनला तरी तसें वाटे आणि वरील दोन्ही विषयांवर लिहिण्यासारखे हेलेनजवळ कांहीं शिल्लक नव्हतें.

व्याख्यानांचा दौरा काढणें हा एक चांगला मार्ग होता पण, हेलेन मुकी होती. बोलायला शिकण्याचेहि तिनें अविश्रांत प्रयत्न केले. सतत पंचवीस वर्षें चिकाटीनें तिनें हे प्रयत्न चालू ठेवले. इतकें करूनहि तिचें भाषण अद्याप अस्पष्ट चीत्कारांसारखे वाटतें. कांहीं ठराविक व्यक्तींना मात्र तें समजतें. बोलण्याचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाल्यानें हेलेन खट्टू झाली.

तरीहि जाहीर सभांमध्यें अॅन आपल्या शिक्षणपद्धतीचीं प्रात्यक्षिकें दाखवी त्यावेळीं हेलेन श्रोत्यांच्या प्रश्नांना उत्तरें देऊं लागली. (हीं उत्तरें तिची सेक्रेटरी श्रोत्यांना स्पष्ट करून सांगते. कारण हेलेनचे उच्चार सगळ्यांना कळत नाहींत). पुष्कळदां हे प्रश्न अगदीं निर्बुद्धपणाचे असतात. पण हेलेन त्यानें विचकून जात नाहीं. ती हजरजबाबी आहे. "झोपतांना तुम्ही डोळे मिटतां का?" या प्रश्नाला तिनें उत्तर दिलें, "तें पाहण्यासाठीं मी जागीच नसतें." जगांतील सर्वांत कठीण गोष्ट कोणती, या प्रश्नाला तिनें उत्तर दिलें, "(अमेरिकन) कॉंग्रेसकडून कोणतीहि गोष्ट करवून घेणें!" हेलेनला लहानपणापासून सुंदर सुंदर कपडे घालण्याची हौस होती. तिनें आपले केस कुरळे करून घेतले होते. स्त्रियांपेक्षां तिची पुरुषांशीं लवकर मैत्री जमत असे.

१९२० ते १९२४ या कालखंडांत दर वर्षी कांहीं दिवस हेलेन एका सर्कशींत सामील होत असे. कुत्रीं, माकडें, डोंबारी यांच्याप्रमाणेंच हेलेननेंहि लोकांचें मनोरंजन करून पैसे मिळवावे ही गोष्ट अनेकांना रुचली नाहीं. पण हेलेनला त्यांत कांहींच वावगे दिसलें नाहीं. कारण तिनें स्वेच्छेनें या सर्कशींत प्रवेश केला होता. तिथें तिला पैसेहि चांगले मिळत. अॅनची तरतूद करण्यासाठीं निव्वळ लेखनावर मिळणारे पैसे पुरेसे नव्हते. सर्कशीच्या नावीन्यपूर्ण व वेगवान् वातावरणांत हेलेनचा उत्साह द्विगुणित होई. ती प्रथमपासून स्वतंत्र विचारांची होती. पूर्वग्रहांचें किंवा लोक काय म्हणतील याचें भय तिला कधींच वाटलें नाहीं. तसें पाहिलें तर तिच्या कॉलेजांत जाण्यालाहि अनेकांनीं विरोध केला होता. तिच्या कॉलेज-शिक्षणासाठीं केलेला सगळा खर्च वायां जाईल असें या हितचिंतकांचें मत होतें. जगांतील अति श्रीमान् व्यक्तींत गणना होणाऱ्या अँड्र्यू कार्नेगी यांनीं तिला आयुष्यभर पुरेल एवढें पेन्शन देऊं केलें पण हेलेननें ती मदत सविनय नाकारली. अशी मदत स्वीकारणें आपल्या समाजवादी विचारसरणीशीं विसंगत आहे असें तिनें निश्चयपूर्वक कार्नेगींना सांगितलें.

तिच्या समाजवादाबद्दल तिला शिक्षा केली पाहिजे, असें कार्नेगी विनोदानें म्हणाले, तेव्हां हेलेननें उत्तर दिलें, "आपणासारख्या थोर व्यक्तींनीं आपल्या मनांत सुसंगति राखली पाहिजे. विश्वबंधुत्वावर आणि राष्ट्रा-राष्ट्रांत शांतता नांदली पाहिजे या तत्त्वावर तुमची श्रद्धा आहे. या दोन्ही श्रद्धा म्हणजे समाजवादाच्या श्रद्धा आहेत."

हेलेननें अमेरिकेच्या सर्व अठ्ठेचाळीस संस्थानांत व्याख्यानांचा दौरा काढला. प्रत्येक ठिकाणच्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीचा तिने प्रत्यक्ष परिचय करून घेतला. दिवसभर निरनिराळ्या सार्वजनिक संस्थांना भेटी-व्याख्याने आणि रात्रीं पुढल्या मुक्कामासाठीं रेल्वे-प्रवास असा या तुफानी दौऱ्याचा कार्यक्रम होता. तिच्या प्रत्येक भेटीचे, व्याख्यानाचे वर्णन देशांतल्या आणि देशाबाहेरील वृत्तपत्रांत रकानेच्या रकाने भरून प्रसिद्ध होई. तिला बघण्यासाठीं प्रत्येक ठिकाणीं हजारो लोक जमत. या दौऱ्यांत अनेक नामवंत व्यक्तींच्या भेटीचा तिला लाभ मिळाला. तिचा दुर्दम्य जीवनोत्साह पाहून सुप्रसिद्ध कवि कार्ल सँडबर्ग थक्क झाला. जीवन कशा प्रकारें जगावें याचा हेलेन म्हणजे सर्वोत्तम आदर्श आहे असे उद्गार त्याचे तोंडून बाहेर पडले!

चार्ली चॅप्लिननें हेलेनला आपल्या स्टुडिओंत नेलें आणि त्रिखंड कीर्ति मिळविणारी आपली हॅट व फाटके बूट त्यानें तिला 'दाखवले'. "स्वतःची कला आणि व्हायोलिन यांच्याबद्दल गाढ आत्मीयता बाळगणारा सरळ मनाचा विचारशील युवक" असें चार्ली चॅप्लिनबद्दल तिचें मत बनलें. १९१८ सालीं हॉलिवुडमध्यें तिच्या आयुष्यावर 'उद्धार' (Deliverance) या नांवाचा एक चित्रपट काढण्याचा बूट निघाला. त्यांत हेलेनला काम देण्याचेहि ठरलें. पण हेलेनच्या जीवनांत न घडलेले अचाट प्रसंग निर्मात्यानें पैसे मिळविण्या-साठीं पटकथेंत कोंबण्याचे ठरविलें व त्यामुळें हा चित्रपट निघालाच नाहीं. या निर्मात्याच्या कल्पनांची भरारी न्याहाळणें मनोरंजक ठरेल.

हेलेनच्या सन्मानार्थ दिलेल्या एका मेजवानीचे प्रसंगीं डॉ. होम्स, फिलिप्स ब्रूक्स, जोसेफ जेफर्सन, डॉ. ॲलेक्झांडर ग्रॅहॅम बेल इत्यादि थोर व्यक्तींचा ताफाच्या ताफा हजर आहे असें दृश्य या चित्रपटांत घालायचें त्यानें योजलें होतें. बड्या चार राष्ट्रांच्या प्रमुखांची फ्रान्समध्यें परिषद भरली असतां हेलेन त्यांची भेट घेऊन त्यांना युद्ध लवकर संपवण्याची विनंती करते असें त्याला दाखवायचें होतें. कामगारांचें नेतृत्व स्वीकारून ती 'जोन ऑफ आर्क' च्या आवेशानें लढयांत भाग घेतांना या चित्रपटांत दिसली असती. युलिसेसप्रमाणें ती खवळलेल्या समुद्राशीं झुंज घेत आहे असाहि एक प्रसंग त्या चित्रपटांत यायचा होता !

हेलेनला गौरविण्यास अशा कल्पित प्रसंगाची मुळींच जरुरी नव्हती. कारण प्रत्यक्षांत तिला हेवा वाटण्यासारखें बहुमान मिळाले. त्यावेळच्या सत्तर नामवंत कवींनीं तिच्यावर कविता लिहिल्या आणि या कवितांचा संग्रह प्रसिद्ध करण्यांत आला. रवीन्द्रनाथ टागोर तिच्या भेटीला गेले होते. त्यांनीं तिच्याशीं अनेक विषयांवर चर्चा केली. 'इन् माय गार्डन्' या आपल्या काव्यांतील कांहीं भाग रवीन्द्रनाथांनीं तिला वाचून दाखवला. रविबाबूंच्या गळ्यावर, ओठांवर बोटें टेकून हेलेननें हें काव्यवाचन 'ऐकलें'.

साहित्याइतकीच विज्ञानाचीहि हेलेनला आवड होती खाणींतून कोळसा कसा काढतात, लोखंड कसें शुद्ध करतात, मोठमोठे पूल कसे बांधतात, विमानविद्येचें तंत्र काय आहे, फळबागा कशा लावाव्या, होकायंत्रामागील तत्त्व कोणतें हें सारें ती कुतूहलानें शिकली. हेन्री फोर्डनें तिला आपला डेट्रॉइट येथील मोटार-कारखाना दाखवला, एडिसननें तिला आपल्या प्रयोगशाळेची माहिती दिली. ब्रुकलिन येथील अजस्र पूल निर्मिणारा कर्नल रोएब्लिंग व वनस्पतींचा जादूगार ल्यूथर बरबँक यांनीं आपापल्या शास्त्रांची तिला आस्थेनें माहिती दिली. हेलेनला भेटल्यानंतर सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ आइन्स्टाइन हे ॲन सुलिव्हानला म्हणाले,

"आधुनिक शिक्षणशास्त्रांतल्या इतर कोणत्याहि कर्तृत्वापेक्षां तुमचें यश मला अधिक मोलाचें वाटतें. तुम्हीं हेलेनला नुसतें लिहावाचायला शिकविलें नसून तिच्या व्यक्तित्वाचा विकास घडवून आणला आहे. जवळजवळ अशक्य कोटींतली गोष्ट तुम्हीं शक्य करून दाखविली आहे." आइन्स्टाइन यांच्या सांनिध्यांत हेलेनला वाटलें कीं पृथ्वीवरचे सगळे विरोधी सूर सुसंवादी बनले आहेत; आणि दुगाळलेल्या आभाळा-खालच्या झालेल्या जुन्या जगांत सूर्यकिरण फांकावेत तसें नवें जग अवतरत आहे.

# : ६ : अंधांसाठीं सेवाकार्य

रेन्थॅम येथील तेरा वर्षांच्या वास्तव्यानंतर १९१७ मध्यें ॲन व हेलेन न्यूयॉर्कजवळ 'फॉरेस्ट हिल्स' येथें राहण्यास गेल्या. जॉन मॅकी यावेळीं युरोपांत होता. पण १९१४ पासूनच हेलेन कुटुंबांत राहूं लागलेल्या पॉली थॉम्सन हिची हेलेनला मॅकीइतकीच मदत होई. पॉली थॉम्सन ग्लासगोहून आपल्या काकांना भेटण्यासाठीं म्हणून अमेरिकेस आली होती. पहिल्या भेटींतच तिला हेलेननें आपली स्पर्शखुणांची भाषा शिकवली आणि ॲनप्रमाणेंच आपणहि हेलेनच्या सांनिध्यांत राहायचें असें पॉलीनें ठरवलें. हा निर्णय हेलेनला फारच उपकारक ठरला. कारण पॉली नसती तर ॲनच्या मृत्यूनंतर हेलेनचे फार हाल झाले असते. आजहि पॉली सतत हेलेनबरोबर असते, व ॲनची उणीव भासणार नाहीं अशा प्रकारें तिची काळजी घेते. पॉली अत्यंत मनमिळाऊ आणि व्यवहारदक्ष आहे. तिला बँकांचे व्यवहार, जमाखर्च यांची चांगली माहिती असल्यानें हेलेन व ॲनला तिचा फार उपयोग झाला. रेल्वेचीं वेळापत्रकें पाहणें, हेलेनच्या प्रवासाची सर्व सिद्धता करणें हीं कामें पॉलीमुळें सुकर झालीं.

यावेळीं हेलेन इटालियन शिकत होती. राजकीय घडामोडींबद्दलहि ती जागरूक असे. प्रत्येक निवडणुकीनंतर नव्या अध्यक्षानें राष्ट्राला दिलेला संदेश ती काळजीपूर्वक वाची. ती बारा वर्षांची होती तेव्हां मायकेल ॲनेनॉसला एकदां म्हणाली, "मी रिपब्लिकनहि नाहीं किंवा डेमोक्रॅटहि नाहीं. नागरी शासनशास्त्र, राजकारण, तत्त्वज्ञान यांचा नीट अभ्यास केल्यावरच मी माझें मत देईन." आणि पुढें तिनें या विषयांचा

सखोल अभ्यास केल्यावर तिला समाजवादी विचारसरणी अधिकाधिक पटूं लागली. लोककल्याण हेंच शासनसंस्थेचें आद्य कर्तव्य आहे असें तिचें ठाम मत बनलें. आजहि ती याच मताची आहे. ॲनबरोबर आणि ग्रॅहॅम बेलबरोबर ती अनेकदां मजूर वस्त्यांतून हिंडली होती. त्या आठवणी तिच्या मनांतून अद्याप गेल्या नव्हत्या. अनुकंपेनें प्रेरित होऊन तिनें वॉशिंग्टन आणि पिट्सबर्ग या शहरांतील गरिबांच्या वस्त्यांचें निरीक्षण केलें. याच सुमारास लॉरेन्स शहरांत कामगारांचा मोठा संप झाला. उत्पादनाचीं साधनें जनतेच्या मालकीचीं झालीं पाहिजेत व समाजवादी सरकार प्रस्थापित झाल्याखेरीज हें स्थित्यंतर घडून येणार नाहीं असें हेलेनचे मत होतें. खलाशांच्या हक्कांसाठीं झगडणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटनेचा विजय झाला तेव्हां तिला मनापासून आनंद झाला आणि तिनें या संघटनेचा नेता जॉन लेविस याचें त्याच्या कुशल मार्गदर्शनाबद्दल अभिनंदन केलें.

हेलेन दैववादी नव्हती. माणूस निश्चयाच्या आणि परिश्रमाच्या बळावर भोवतालची परिस्थिति बदलूं शकतो अशी तिची दृढ श्रद्धा होती. महापूर, वादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळें नुकसान झालेल्यांबद्दलहि तिला सहानुभूति वाटे. कामगारांचें जीवनमान सुधारण्यासाठीं त्यांना कांहीं किमान सुखसोयी मिळाल्या पाहिजेत व त्या मिळवण्यासाठीं त्यांनीं लढा करणें अपरिहार्य आहे, या जॉर्ज ऑर्वेलच्या 'भौतिकवादा'शीं हेलेन सहमत होती. हीं मतें तिनें 'आउट ऑफ द डार्क' या आपल्या निबंधांत लोकांसमोर मांडलीं तेव्हां तिच्याविरुद्ध मोठा गहजब माजला आणि तिला लोकांनीं जवळजवळ वाळींत टाकल्यासारखें केलें. 'कामगार लढ्याचें निदर्शक लाल निशाण मीं माझ्या अभ्यासिकेंत लावलें आहे,' असें तिनें लिहिलें होतें. स्त्रियांना मताधिकार मिळावे म्हणून निघालेल्या मोर्च्यांत ती अग्रभागीं असल्यानें सर्व वृत्तपत्रांत पहिल्या पानावर तिचें नांव झळकलें. वृत्तपत्रांनीं केलेली टवाळी आणि निंदा

समाजवादी चळवळीकडे तीमुळें लोकांचें लक्ष वेधत आहे या विचारानें आनंदानें सहन केली. हेलेन ही बोल्शेव्हिकांच्या (कम्युनिस्टांच्या) हातांतलें बाहुलें आहे असाहि प्रचार सुरू झाला. जणुं टेनिसनच्या एखाद्या कवितेंतूनच जन्मलेली ही 'गोड, निरागस बालिका' बोल्शेव्हिझमसारख्या 'राक्षसी' कार्यांत आपण होऊन पडेलच कशी? वजनदार वृत्तपत्रांनीं हा प्रचार चालविला असला तरी वस्तुस्थिति मात्र तशी नव्हती. हेलेननें स्वतंत्र बुद्धीनें अभ्यास करूनच आपलीं मतें पक्कीं केलीं होतीं.

'गिरणीमजूर आणि खाणकामगारांच्या प्रश्नांचा अभ्यास करा, औद्योगिक शहरांत मजूर किती हलाखीचें जीवन जगतात, याचें अवलोकन करा,' असें ती कॉलेजांत जाणाऱ्या मुलींना आवाहन करी. 'समाजवादाचें बीज आतां सर्वत्र रुजलें आहे. जुनें जग आणि त्यांतील दुष्ट, अन्यायी रूढींविरुद्ध हा झगडा आहे. जगांतील कोणत्याहि शक्तीला आतां समाजवादाची वाढ थोपवून धरतां येणार नाहीं,' या तिच्या मतामुळें चाळीस हजार विद्यार्थ्यांच्या समुदायानें तिच्या पुस्तकांची १९३३ सालीं बर्लिनमध्यें जाहीर होळी केली. या विद्यार्थ्यांचें नेतृत्व डॉ. गोबेल्सकडे होतें!

अज्ञान आणि दारिद्र्य यांमुळें पुष्कळांना बालपणीं अंधत्व येतें आणि या मूल कारणांवर आघात करतील अशा सामाजिक सुधारणा घडवून आणल्यानें आपोआपच आंधळ्यांचा प्रश्न सुटण्यास मदत होईल या जाणिवेनें हेलेननें या चळवळींत भाग घेतला होता. बहिऱ्यांसाठीहि कांहीं कार्य करावें अशी तिची इच्छा होती पण दोन्ही कामें हातीं घेण्याइतका पुरेसा वेळ तिच्याजवळ नव्हता. पुढील कार्याच्या पूर्वतयारीसाठीं या प्रश्नांचा अभ्यास मात्र तिनें १९०८ पासून सुरू केला होता. अमेरिकेंत त्यावेळीं पांच निरनिराळ्या लिप्यांतून अंधांसाठीं पुस्तकें छापलीं जात. त्यामुळें अनेकदां ती विशिष्ट लिपि न येणाऱ्या अंध

विद्यार्थ्यांना त्या पुस्तकांचा उपयोग होत नसे. म्हणून त्या सर्वांना सोयीची अशी जी 'युरोपियन ब्रेल' त्या लिपींतच सर्व पुस्तकें छापलीं जावीं म्हणून हेलेननें चळवळ सुरू केली. ग्रीक भाषाहि छापतां येण्याची या लिपींत सोय होती. परावलंबी, असहाय, दुर्दैवी जीव या दृष्टीनें अंधांकडे पाहणें चुकीचें आहे, प्रत्येक अंध व्यक्ति कांहींतरी उपयुक्त व्यवसाय शिकून स्वावलंबी होऊं शकते हें तिला लोकांना पटवून द्यायचें होतें. लैंगिक रोग हें पुष्कळदां अंधत्वाचें कारण असतें. पण या विषयाची चर्चा करणें शिष्टसंमत नव्हतें. योग्य काळजी घेतल्यास व उपचार केल्यास अंधांची संख्या चाळीस टक्क्यांनीं कमी होईल असें तज्ज्ञांचें मत होतें. म्हणूनच हेलेननें या मुद्दयाला वाचा फोडली. १९०७ सालींच तिनें स्त्रियांच्या एका मासिकांत या विषयावर निर्भीड लेख लिहिला होता.

मॅसाच्युसेट्स् संस्थानानें आंधळ्यांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठीं जें कमिशन नेमलें त्याची हेलेन कांहीं वर्षे सभासद होती. पुढें इतर तीस संस्थानांनींहि अशीं कमिशनें नेमलीं. अमेरिकेंतील सर्व अंध बालकांच्या विकासासाठीं निधि जमवण्यांत हेलेननें पुढाकार घेतला. १९२१ ते १९२३ या तीन वर्षांत तिनें सर्व अमेरिकाभर प्रवास करून अडीचशें सभांत भाषणें दिलीं. कित्येकदां या सभांत ती स्वतः हातांत भिक्षापात्र घेऊन निधीसाठीं मदत जमवी. त्याशिवाय तिनें अनेक वृत्तपत्रांत लेख लिहिले आणि हजारों व्यक्तींना स्वतः पत्रें पाठविलीं. इंग्लंड, जर्मनी, इटली आणि फ्रान्स या देशांतहि हेलेननें सुरू केलेल्या चळवळीचा प्रसार झाला. या देशांतले आणि खुद्द अमेरिकेंतले डॉक्टर, शिक्षक, अंधबालकांचे पालक यांच्याकडून हेलेनला असंख्य पत्रें येत. अमेरिकन कॉंग्रेसच्या एखाद्या सभासदाचा आपल्या कार्यांत पाठिंबा मिळावा यासाठींसुद्धां हेलेननें खूप प्रयत्न केले.

आपल्या बांधवांच्या उन्नतीसाठीं सदैव कार्यमग्न राहिल्यानें त्यांच्या जीवनांत तर आनंद निर्माण होतोच शिवाय आपलें स्वतःचें

जीवनहि अधिक विशाल बनतें, आपल्या दुःखांचा आपल्याला विसर पडतो, हें हेलेननें अनुभवलें होतें. त्यामुळेंच अंधांच्या बारीकसारीक अडचणीसुद्धां आस्थेनें दूर करण्याचा ती प्रयत्न करी. अंध असूनहि ज्यांनीं मोठें यश मिळैवलें अशा अनेक व्यक्ति जगांत आढळतात. पहिल्या महायुद्धांत डोळे गमावलेला फ्रेंच सैनिक जे. जॉर्जेस सापिनि फ्रान्सच्या 'चेंबर ऑफ डेप्युटीज्'चा सभासद झाला. 'अंधाराला आव्हान' या नांवाचें या गृहस्थाचें चरित्र प्रसिद्ध झालें, त्याला हेलेननें प्रस्तावना लिहिली. त्यांत महत्पदाला पोंचलेल्या अंधांचे उल्लेख तिनें केले आहेत. अमेरिकन कॉंग्रेसचा एक सभासद सिनेटर गोअर अंध होता. अंध एफ. जी. कॅंपबेल यानें लंडनमध्यें एक संगीत अकादमी स्थापन केली होती. तो स्वतः उत्कृष्ट गिर्यारोहकहि होता. या साऱ्यांचा उल्लेख हेलेननें त्या प्रस्तावनेंत केला आहे. होमर, मिल्टन यांचीं उदाहरणें तर सर्वांच्या परिचयाचीं आहेत.

हेलेन महत्त्वाकांक्षी असली तरी वस्तुस्थितीकडे तिचें केव्हांहि दुर्लक्ष होत नसे. सर्वच अंधव्यक्ति कांहीं पत्रकार, प्राध्यापक, लेखक, गणिती, संपादक, अर्थशास्त्रज्ञ होऊं शकणार नाहींत हें ती मान्य करी. पण प्रत्येकाला सुतारकाम, विणकाम, खुर्च्या करणें, मसाज करणें, चहाची चव घेऊन त्याची वर्गवारी करणें, वाद्यवादन, यांसारखे अनेक उपयुक्त व्यवसाय खुले आहेत आणि त्यांद्वारें प्रत्येक अंध स्वावलंबी होऊं शकेल अशी तिची खात्री होती.

# : ७ : माझा धर्म

इमॅन्युएल स्वेडनबॉर्ग (१६८८–१७७२) नांवाचा एक थोर शास्त्रज्ञ संशोधक आणि धर्मसुधारक स्वीडनमध्यें होऊन गेला. गणित, खगोल-शास्त्र, शरीरविज्ञान आणि भूस्तरशास्त्र यांत तो पारंगत होता. धर्माबाबतहि स्वतंत्र बुद्धीनें विचार करून 'ख्रिस्ताचें पुनरुत्थान झालेलेंच आहे' अशी विचारसरणी पुढें मांडणारा 'न्यू चर्च' हा धर्मपंथ त्याच्या मत-प्रणालींतूनच निर्माण झाला.

अगदीं लहान असल्यापासून स्वेडनबॉर्गच्या धर्मविषयक मतांनीं हेलेन प्रभावित झाली. वस्तुतः जॉन मॅकी तर बुद्धिप्रामाण्यवादी होता आणि ॲन सुलिव्हान पक्की नास्तिक होती. दोघेहि स्वेडनबॉर्गची थोरवी मान्य करीत पण 'त्याचीं धर्मविषयक मतें म्हणजे निव्वळ थोतांड आहे' असें ॲन नेहमीं म्हणे. तरीहि त्यामुळें हेलेनची श्रद्धा मात्र कधीं ढळली नाहीं.

फिलिप्स ब्रूक्ससारख्या स्वतंत्र विचारांच्या व्यक्तींचें हेलेनला लहान-पणापासून मार्गदर्शन झालें हें आपण पाहिलेंच आहे. पण देवाचें अस्तित्व आणि आत्म्याचें अमरत्व यांबाबत मात्र हेलेन कधींहि साशंक झाली नाहीं. देवदैत्यांच्या लढाया, अत्यंत कनवाळू अशा देवानें शिक्षा म्हणून पापी लोकांना अग्निप्रलयांत ढकलून दिलें असें सांगणाऱ्या त्यांतील दंतकथा हेलेनला कधींच पटूं शकल्या नाहींत. कर्मठ आणि असहिष्णु अशा कॅथॉलिक पंथाचें तिला केव्हांहि आकर्षण वाटलें नाहीं, आणि न्यूमनचें 'ॲपॉलॉजिया' पुस्तक वाचल्यावर तर 'प्रॉटेस्टंट' पंथाबद्दलहि ती साशंक बनली. असे वेगवेगळे पंथ आणि धार्मिक व्रतें यांमुळें खऱ्या

धर्माचें व खऱ्या श्रद्धेचें कोठेंच दर्शन होत नाहीं असें हेलेनचें मत होतें. ज्यांपासून मानवजातीचा कांहींहि फायदा नाहीं असल्या धार्मिक समारंभांवर हेलेनचा मुळींच विश्वास नव्हता. धार्मिकपणा आणि खरा चांगुलपणा यांत खूप फरक आहे या पास्कलच्या विचारांशीं हेलेन सहमत होती. म्हणूनच तत्त्वज्ञान आणि भौतिक विज्ञान यांच्या सिद्धांतांशीं सुसंगत असा बायबलचा अर्थ लावणारीं स्वेडनबॉर्गचीं मतें तिला पटत.

जॉन हित्झ या अॅलेक्झँडर ग्रॅहॅम बेलच्या चिटणिसानें हेलेनला प्रथम स्वेडनबॉर्गच्या तत्त्वांची ओळख करून दिली. तिच्या चौदाव्या वाढदिवशीं हित्झनें तिला नुसतें बोटांनीं चाचपलें असतां वेळ समजणारें, विशिष्ट पद्धतीचें उठावाचें घड्याळ भेट म्हणून दिलें. हेलेनला या घड्याळाचा इतका उपयोग झाला कीं पुढें 'अमेरिकन फाउंडेशन फॉर द ब्लाइंड' या संस्थेनें युद्धांत अंध होऊन परत येणाऱ्या प्रत्येकाला असें घड्याळ देण्याची प्रथा सुरू केली. आणि त्याचा असा अनुभव आला कीं वेळेचें ज्ञान होतांच आपल्या प्रकाशहीन जीवनांतहि सुसूत्रता आणणें अंधांना शक्य होतें.

जॉन हित्झनें स्वेडनबॉर्गच्या 'हेवन अँड हेल' या पुस्तकाची ब्रेल लिपींतली एक प्रत हेलेनला दिली होती. विविध क्षेत्रांतलें स्वेडनबॉर्गचें कर्तृत्व हेलेनला समजून देतां यावें यासाठीं हित्झ स्वतः ब्रेल शिकला व शेकडों तास खर्च करून त्यानें तिला स्वेडनबॉर्गच्या कार्याची ओळख करून दिली. तिच्या ध्यानांत न आलेलीं बायबलमधलीं कित्येक मौलिक सत्यें हित्झनें तिला समजावून दिलीं. त्यामुळें हेलेनला बायबल वाचण्याची इतकी गोडी लागली कीं तिचें ब्रेलमधलें उठावाचें बायबल अनेक ठिकाणीं, वरून सारखीं बोटें फिरल्यानें गुळगुळीत झालें. खरा ख्रिश्चन धर्म लोकांच्या आचरणांत उतरावा अशीच स्वेडनबॉर्गप्रमाणें हित्झचीहि मनीषा होती. बायबलमधल्या दंतकथा शब्दशः खऱ्या न मानतां मानवी

मनाच्या उत्क्रांतीचा इतिहास म्हणून त्याकडे पाहिलें पाहिजे असें स्वेडन-बॉर्गचें मत होतें.

ज्याच्या मनांत सर्वांबद्दल प्रेमभाव नाहीं तो मनुष्य जिवंत असूनहि मेल्यासारखाच होय, हें स्वेडनबॉर्गच्या विचारसरणीचें सार होतें.

प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाला एक प्रकारचा दरवळ असतो असें स्वेडन-बॉर्गचें मत होतें. 'शिसारी आणणारे उग्र दर्प दुष्ट प्रवृत्तीच्या लोकांना आवडतात. फळें, फुलें यांचा मंद सुवास, नुकत्याच भट्टींतून काढलेल्या ब्रेडचा खमंग वास त्यांना सहन होत नाहीं.' असें तो म्हणे. कारण फळें, फुलें, ताजा पाव यांच्या गंधलहरी दातृत्व आणि श्रद्धा यांच्या स्वरू-पाशीं मिळत्या-जुळत्या असतात, एवढेंच काय पण ताज्या ब्रेडचा वास हा एक स्वर्गीय अनुभव आहे असें तो म्हणे. अत्यंत हावऱ्या, कृपण लोकांच्या व्यक्तित्वाला उंदरासारखा, निष्पाप लोकांची छळणूक करणाऱ्यांच्या व्यक्ति-त्वाला पिसवांसारखा, दीर्घद्वेपी आणि क्रूर लोकांच्या व्यक्तित्वाला प्रेताच्या वासासारखा आणि संभाषणचतुर पण अहंमन्य लोकांच्या व्यक्तित्वाला जळलेल्या पावासारखा दर्प येतो असें स्वेडनबॉर्गनें एके ठिकाणीं प्रतिपादन केलें आहे. स्वेडनबॉर्गला बागबगीच्यांची अत्यंत आवड कां होती हें यावरून हेलेनला उमगलें. कारण त्याच्या दृष्टीनें गुलाब म्हणजे केवळ एक विशिष्ट प्रकारचें फूल नव्हतें; एका उदात्त भावनेचा तो ऐहिक आविष्कार आहे असें तो मानीत असे. हा दृष्टिकोन मनावर ठसल्यामुळेंच हेलेन एके ठिकाणीं लिहिते,: "माझे अंतर्विश्व प्रकाश, संगीत आणि विविध रंगांच्या शलका यांनीं भरून गेलें आहे."

## वा द ळ

ॲन सुलिव्हान मॅकीची प्रकृति दिवसेंदिवस खालावत चालली होती. इन्फ्ल्युएन्झानें तिला हैराण केलें होतें. त्यांतच क्षयाची भावना होण्याचा

धोका निर्माण झाला. आधींच क्षीण असलेली दृष्टि अजिबात जाण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. मृत्यूपूर्वी कांहीं दिवस ॲन पूर्ण आंधळी झाली होती. यापूर्वी दोनदां ॲनच्या आजारपणानें हेलेनला दुःखांत बुडवून टाकलें होतें व तिच्यां मनानें भावी दुर्घटनांची धास्ती घेतली होती.

एकदां त्या दोघी दौऱ्यावर असतांना हॉटेलमधील खोलींत ॲनला एकाएकीं सडसडून ताप भरला. काय करावें तें हेलेनला सुचेना. खोलींत टेलिफोन होता. पण हेलेन त्याचा कसा उपयोग करणार ? तिचें बोलणें समजणार तरी कुणाला ? तिला बाहेर पडून खालच्या मजल्यावर जाणेंहि शक्य नव्हतें. आपण ॲनजवळ असून तिच्यासाठीं कांहीं करूं शकत नाहीं याचें तिला फार दुःख झालें. आणि या अनुभवामुळेंच पूर्वी एकदां नाकारलेली ॲन्ड्रयू कार्नेगींची मदत—केवळ ॲनच्या स्वास्थ्यासाठीं—तिनें स्वीकारली. दोघींचा सर्व खर्च भागेल एवढी ही रक्कम मोठी नव्हती. पण बराचसा भार हलका झाला.

या संकटांतून थोडी उसंत मिळते न मिळते तोंच हेलेनच्या जीवनांत आणखी एक शोककारक घटना घडली. हवा बदलण्यासाठीं ॲनला परगांवीं धाडण्यांत आलें. पॉली थॉम्सनहि तिची शुश्रूषा करण्यासाठीं बरोबर गेली. त्या दोघींच्या गैरहजेरींत एक तरुण पत्रकार हेलेनला मदत करण्यासाठीं 'फॉरेस्ट हिल्स' मधील तिच्या निवासस्थानीं वास्तव्यास आला. हेलेनची आईहि तिथेंच होती. नुकत्याच संपलेल्या दौऱ्यांत या पत्रकारानें हेलेनची भाषा शिकून घेतली होती व तिच्या दुभाष्याचें काम केलें होतें. त्यानें व हेलेननें विवाहबद्ध होण्याचें ठरवलें होतें. त्यांनीं कुणाला न सांगतां विवाहाची नोटीसहि सरकारी कचेरींत नोंदवली होती. ॲनला आणि आपल्या आईला ही बातमी एकदोन दिवसांत सांगण्याचें हेलेननें योजलें होतें. पण वृत्तपत्रांना कुठून सुगावा लागला कुणास ठाऊक ! दुसऱ्या दिवशीं ठळक अक्षरांत ती बातमी जगजाहीर झाली. हेलेनच्या आईला या प्रकाराचा संताप

आला आणि या लग्नाला परवानगी देण्याचें नाकारून हेलेनला घेऊन ती ॲलाबामा येथील आपल्या घरीं निघून गेली !

या प्रेमभंगाविषयीं 'मिडस्ट्रीम' मध्यें हेलेन लिहिते, "ज्या प्रीतीनें इतक्या हळुवार, अनपेक्षित, नकळत माझ्या आयुष्यांत प्रवेश केला तिचें निर्गमन मात्र वादळाच्या थैमानांत झालें."

त्यानंतरचें एक वर्ष हेलेननें ॲनबरोबर युरोपांत घालवलें. ॲनची प्रकृति सुधारली नव्हती पण या प्रवासांत दोघींना विश्रांति मिळाली आणि मुख्य म्हणजे अमेरिकेंतला वार्ताहरांचा ससेमिरा चुकला. या दौऱ्यांतहि हेलेनचें अंधांसाठीं निधि जमवण्याचें कार्य सुरूच होतें. इंग्लंडमध्यें वृत्तपत्रांनीं आणि जनतेनें तिचें सहर्ष स्वागत केलें. "अंधांच्या उन्नती-करितां 'हेलेन केलर निधि' उभारण्यासाठीं आपण युगोस्लावियांत या," अशी तेथील सरकारनें तिला विनंती केली व त्यानुसार हेलेन युगोस्लाव्हियांत गेली. तेथील राजानें तिला बहुमानदर्शक पदक बहाल केलें. लंडनमध्यें तिला राजा-राणीनें तिच्या सन्मानार्थ मेजवानी दिली. 'हाउस ऑफ कॉमन्स'मध्यें ती क्लेमंट ॲटलींना भेटली. लेडी ॲस्टर आणि बर्नार्ड शॉ यांच्याशींहि तिचा परिचय झाला. तेथून ती स्कॉटलंडमध्यें गेली. तेथें एका विश्वविद्यालयानें हेलेनला सन्मानपूर्वक पदवी दिली आणि रेडिओवरून तिचा जीवनवृत्तान्त सांगण्यांत आला. ती गोल्फ खेळण्यास शिकली. खाणी कामगारांच्या घरांना तिनें भेटी दिल्या. नऊशें फूट खोल उतरून तिनें खाण आंतून कशी असते तें 'पाहिलें'. या दौऱ्यावर असतांनाच जॉन मॅकीच्या दुःखद निधनाची बातमी त्यांना समजली. त्यानंतर थोड्याच दिवसांत ॲननेंहि या जगाचा निरोप घेतला आणि हेलेन पोरकी झाली !

## : ८ : इंग्लंड आणि जपान

३ नोव्हेंबर १९३६ ला ॲन सुलिव्हान मॅकी हिच्या देहाची रक्षा वॉशिंग्टन येथील नॅशनल कॅथेड्रलमध्यें पुरण्यांत आली. या प्रसंगीं भाषण करतांना वॉशिंग्टनच्या बिशपनें तिचा 'आजपर्यंत निर्माण झालेल्या अत्यंत थोर शिक्षिकांपैकीं एक' असा उल्लेख केला.

कांहीं दिवस लोटल्यावर पॉली थॉम्सनबरोबर हेलेन पुन्हा एकदां स्कॉटलंडमध्यें आली. एके काळीं हर्षानें डोलणाऱ्या हिरवळीवरून हिमप्रवाह वाहत जावा, तसे दिवसामागून दिवस जात होते. सतत पन्नास वर्षांच्या सहवासानंतर ॲनचा तिला वियोग घडला होता. आपल्या सगळ्या आयुष्याचाच विध्वंस झाला आहे असें हेलेनला वाटलें. पण आपल्या उद्ध्वस्त जीवनाची पुन्हा एकदां जुळणी करण्यासाठीं हेलेननें कंबर कसली. आपत्ती कितीहि घोर असल्या तरी त्यांना धैर्याच्या साहाय्यानें तोंड देतां येतें असा तिचा विश्वास होता. तिनें ॲनचें चरित्र लिहिण्याचा संकल्प केला व पुढें एकोणीस वर्षांनीं तें पुस्तक पूर्ण झालें. प्रवासांत बोटीच्या डेकवरून हिंडतांना पॉली तिला अंतराळांत विहार करणाऱ्या, किनाऱ्यापासून कित्येक मैल दूर उडत आलेल्या व बोटी-भोंवतीं गिरक्या घेणाऱ्या छोट्या, निर्भय स्वालो पक्ष्यांची माहिती सांगे. या पक्ष्यांपासून हेलेनला स्फूर्ति मिळे. तिच्या मनांतील निराशेचे विचार हळूहळू विरून गेले आणि पुन्हा नव्या उल्हासानें हेलेन काव्य, तत्त्वज्ञान, प्रवासांतील गमतीजमती यांत रस घेऊं लागली.

अगदीं लहानपणींच स्वतःचे विचार दैनंदिनींत ग्रथित करून ठेवण्याची संवय हेलेनला तिच्या 'शिक्षिके'नें लावली होती. त्या

मैत्रयीचा आतां तिला कार्यमग्न राहण्याकडे फार उपयोग झाला. ही दैनंदिनी पुढें पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यांत आली. ॲनच्या वियोगाचें दुःख विसरण्यांत तिला पॉली थॉम्सनची फार मोलाची मदत झाली. पॉलीनेंहि हेलेनला तेवीस वर्षे सावलीसारखी सोबत केली होती. तिच्या-पाशीं अभिनयगुणहि होते. त्यामुळें प्रत्येक प्रसंगांतलें कारुण्य, सौंदर्य व विनोद ती हेलेनच्या हातावर रेखाटू शकत असे. चित्रपट पाहतांना नुसते संवादच नव्हे तर पात्रांच्या चेहऱ्यांवरील सूक्ष्म भावदेखील ती हेलेनच्या हातावर टाइप करी.

आपल्या व्यक्तिगत दुर्दैवाबद्दल हेलेननें केव्हांहि शोक केला नाहीं. १९३६-३७ च्या सुमारास जगाच्या क्षितिजावर महायुद्धाचे काळे ढग जमूं लागले तेव्हां मात्र हेलेन चिंतातुर झाली. नुसत्या ब्रिटनसाठीं चार कोटी गॅसप्रतिबंधक मुखवटे तयार करण्यांत येत असल्याचें तिला कळलें. दैनंदिन उपयोगाच्या वस्तूंची चणचण असतांना अशा कामीं उत्पादन-शक्ति राबवली जाणार होती. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यास जगाला कित्येक शतकांचा उशीर झाला होता हेंच या गोष्टीवरून सिद्ध होत नव्हतें काय? "स्फोटक दारूगोळ्यानें ठासून भरलेल्या व भरवेगांत निघालेल्या आगगाडीसारखी त्या वेळची जगाची स्थिति होती," अशा चपखल शब्दांत तिनें त्या युद्धपूर्व काळाचें चित्र रेखाटलें आहे. रोज सकाळीं न्याहारीच्या वेळीं पॉली तिला ताज्या बातम्या स्पर्शखुणांनीं सांगत असे. रशियांतील 'शुद्धीकरण' मोहिमा, नाझी जर्मनींतले अमानुष अत्याचार, आइन्स्टाइनची ससेहोलपट या साऱ्या बातम्या वाचून तिला मनस्वी दुःख होई. रशियांत चाललेल्या क्रूर प्रकारांची तिला घृणा होती पण नाझी हत्याकांडहि तिला तितकेंच गर्हणीय वाटे. त्यामुळेंच 'मिडस्ट्रीम' या आपल्या पुस्तकांतील रशियाच्या स्तुतिपर असलेलीं वाक्यें गाळून टाकण्याची तिच्या जर्मन प्रकाशकाची विनंती तिनें मान्य केली नाहीं. रशियांतील हत्यासत्र ही झारकालीन अन्यायांची

प्रतिक्रिया आहे असें तिचें मत होतें. नव्या रशियाच्या निरीश्वरवादी पाखंडी तत्त्वज्ञानाला तिचा तीव्र विरोध होता. पण पूर्वी धर्माच्या नांवावर लोकांचा नानाप्रकारें असह्य छळ करण्यांत आला त्यामुळेंच या नव्या तत्त्वज्ञानाला एवढी लोकप्रियता लाभली या कार्यकारणसंबंधाकडे तिचें दुर्लक्ष झालें नाहीं; यांतच तिच्या तौलनिक दृष्टीची साक्ष पटते. आणि रशियाचीं हीं दोषस्थळें मान्य करूनसुद्धां तो देश सर्वांगीण प्रगतीच्या मार्गावर झपाट्यानें वाटचाल करीत होता ही गोष्ट निर्विवाद होती. त्यामुळेंच तिने त्या जर्मन प्रकाशकाला एक चांगलें खरमरीत पत्र लिहून आपल्या मूळ पुस्तकांत कोणताहि फेरबदल करण्याची किंवा आपलें पुस्तक छापण्याची त्याला बंदी केली.

हेलेनच्या मनांत सर्व राष्ट्रांबद्दल समभाव होता. 'हें विश्वचि माझे घर' अशी तिची भावना होती. त्यामुळें कुटुंबांतल्या भांडणांविषयीं वाटावी तशी व्यक्तिगत चिंता तिला जागतिक युद्धाविषयीं वाटे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितींतहि नग धरून राहणाऱ्या ब्रिटिशांचें तिला कौतुक वाटे. ब्रिटनचें साम्राज्य जाऊन तेथें परस्परांबद्दल सद्भावना बाळगणाऱ्या स्वतंत्र राष्ट्रांची एक राष्ट्रकुल संघटना निर्माण व्हावी असें हेलेनला वाटे. त्यामुळेंच वसाहतवादाचा विख्यात उच्छेदक आणि प्रत्येक राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता टॉमस पेन याच्या पुतळ्याचें पॅरिसमध्यें तिच्या हस्तें अनावरण झालें, तेव्हां तिला आनंद आणि अभिमान वाटला. टॉमस पेनच्या थोरवीविषयीं हेलेननें आपल्या दैनंदिनींत मोठे मार्मिक गौरवोद्गार काढले आहेत.

या काळांतहि सर्व विषयांवरील नवीं पुस्तकें वाचून आपलें ज्ञान अद्ययावत् ठेवण्याची हेलेन काळजी घेई. नेपोलियन, ग्लॅडस्टन, डिझ्राएली यांचीं चरित्रें तिनें वाचलीं. 'जीवन हें इतकें दुर्मिळ आहे कीं त्याला क्षुद्र लेखण्यासारखी दुसरी मोठी चूक नाहीं' हें डिझरेलीचें ब्रीद हेलेनच्या आयुष्यालाहि लागू पडण्यासारखें होतें. काव्याची तिला

फार आवड होती. विला केथर, नुट हॅमसन, टर्जेनॉव्ह यांचें ललित वाङ्मयहि तिनें वाचलें. निरनिराळ्या देशांत प्रवास करण्याची तिला हौस होती. म्हणून इंग्लंडमध्यें असतांनाच तिला जपानच्या दौऱ्याचें आमंत्रण आलें, त्याचा तिनें स्वीकार केला. जगांतील एक कोटी चाळीस लक्ष अंधांपैकीं पुष्कळसे पौर्वात्य देशांत असल्यानें त्या देशांत यावाबत जागृति निर्माण करणें हेहि तिच्या दृष्टीनें तिचें महत्त्वाचें कर्तव्य होतें.

जपानला जातांना वाटेंत होनोलुलु बेटावर ती थांबली व हवाई द्वीपसमूहांतील अंधांच्या जीवनविकासाकडे लक्ष पुरविण्याची तिनें तेथील विधानसभेस विनंति केली. जपानी सरकारच्या आमंत्रणावरून हेलेन जपानला निघाली होती. त्यामुळें आपल्यावर फार मोठी जबाबदारी आहे आणि ती आपण नीट पार पाडली पाहिजे असें तिला सारखें वाटे. शिवाय जपानी सरकारनें तिच्यासाठीं अत्यंत भरगच्च कार्यक्रम आंखला होता. बोटीवर ती जपानमध्यें द्यावयाच्या १०–१२ व्याख्यानांची तयारी करण्यांत पहांटे पांचपासून रात्रीं दहापर्यंत गढून गेलेली असे. वास्तविक डॉक्टरांनीं तिला विश्रांति घेण्याचा सल्ला दिला होता. पण विश्रांतीस तिला अवसर नव्हता. याच प्रवासांत तिनें 'गॉन विथ द विंड' या अविस्मरणीय कादंबरीचे ब्रेल लिपींतले बाराहि खंड वाचून संपवले! त्यांतलीं दक्षिण अमेरिकेंतल्या कापसाच्या विस्तीर्ण शेतांचीं वर्णनें वाचतांना हेलेनला आपल्या बालपणींच्या घराची आठवण होई.

जपानमध्यें तिनें अंधांच्या उन्नतीसाठीं साडेतीन कोटी येनचा निधि जमवला. जपानमधील नव्या–जुन्यांचा संघर्ष तिला सर्वत्र जाणवला. या दौऱ्यांत ती जपानी सरकारची पाहुणी असल्यानें तिच्या प्रत्येक सुखसोयीकडे लक्ष पुरवण्यांत आलें होतें. रेल्वे प्रवासांत कांहीं वेळ जपानच्या राजाची बहीण स्वतः हेलेनबरोबर होती. हेलेनच्या तैनातीला आणखी दोन मदतनीस स्त्रिया देण्यांत आल्या होत्या. शिवाय

एक आचारीहि होता. जपानमध्यें हेलेनचें सर्व ठिकाणीं अभूतपूर्व स्वागत झालें.

तिथल्या अंध–अपंगांसाठीं तिनें मोठा निधि जमवला. या कामीं तिला टेकिओ इवाहाशी यांची फार मदत झाली. इंजिनियरिंग कॉलेजात शिकत असतांना—वयाच्या तिसाव्या वर्षी—इवाहाशी आकस्मिकपणें आंधळे झाले. त्यांनीं आत्महत्येचा प्रयत्न केला, पण त्यांना वांचवण्यांत आलें आणि शिक्षणासाठीं त्यांना इंग्लंडला पाठविण्याची व्यवस्था करण्यांत आली. कांहीं वर्षांनंतर ते इंग्लंडमधल्या एका अंध–विद्यालयाचें प्रिन्सिपॉल झाले. हेलेनच्या जपान–दौऱ्याचे वेळीं ते जपानी भाषेशीं 'ब्रेल' लिपीची सांगड कशी घालतां येईल याबाबत संशोधन करीत होते.

पुढें कांहीं वर्षांनीं जगप्रवास करतांना हेलेनला पुन्हां एकदा जपानची सफर घडली.

## : ९ : शिल्पाच्या शोधांत

ॲनच्या मृत्यूनंतर फॉरेस्ट हिल्समधल्या घरांत हेलेनचें मन रमेना. म्हणून पॉली आणि ती कनेक्टिकटमधील वेस्टपोर्ट या गांवीं राहण्यास आल्या. त्यांच्या या नव्या निवासस्थानाचें नांव 'आर्कन रिज'.

'आर्कन रिज' च्या सभोंवतीं विस्तीर्ण बाग होती. सोबतीला एक शिकवलेला जर्मन कुत्रा घेऊन हेलेन या बागेत सर्वत्र फेरफटका करी. दिवसाचा बहुतेक वेळ हेलेन घराच्या दुसऱ्या मजल्यावरील आपल्या अभ्यासिकेंत वाचन–लेखनांत मग्न असे. या खोलींत एक विजेची घंटा बसविण्यांत आली होती. ही घंटा वाजतांच ज्या ध्वनिलहरी उमटत त्या हेलेनच्या अभ्यासाच्या डेस्कद्वारें हेलेनपर्यंत पोंचत. मग हेलेन आपले पाय खालच्या फळ्यांवर टकटक वाजवी आणि निरोप समजला असल्याचें पॉलीला कळवी. नेमके कोणत्या कामासाठीं आपल्याला बोलावलें आहे हेंहि हेलेनला घंटा कशी वाजली यावरून कळे. कारण जेवण्यासाठीं हांका मारतांना, कोणी भेटायला आलें असल्याचें कळवितांना, कशा प्रकारें घंटा वाजवायची यासंबंधींचें संकेत हेलेन आणि पॉली यांनीं ठरवले होते. शहरांतल्या गडबड गोंधळापेक्षां, रेल्वेच्या कर्णकटु खड-खडाटापेक्षां खेड्यांतलें शांत वातावरण स्पर्शद्वारें अनुभवतांना हेलेनला अधिक आनंद होई. शहरांतल्या मोठ्या रस्त्यांवरील रहदारीची वर्दळ; मोटारींचे भोंगे, कारखान्यांतील यंत्रांचे कर्कश आवाज यांतून उद्‌भवणाऱ्या ध्वनिलहरी समुद्रांत उसळणाऱ्या वादळी लाटांप्रमाणें हेलेनला वेढून टाकीत. पण तेंच शहरापासून दूर गेल्यावर मात्र तृणपर्णांची सळसळ, मधमाशांचा मंजुळ गुंजारव, गुलाबाच्या ताटव्यावरून येणारी सुगंधी

वाऱ्याची झुळुक, निर्झरांचा झुळझुळ आवाज हे सारे ध्वनी आपल्या रेशमी स्पर्शानें तिला पुलकित करीत.

विख्यात शिल्पकार 'जो डेव्हिडसन' यांची व हेलेनची चांगली गट्टी जमली होती. शिल्पकलेचें शिक्षण घेत असतांना आपल्या एका बहिऱ्या-मुक्या वर्गमित्राकडून डेव्हिडसन यांनीं स्पर्शखुणांची भाषा शिकून घेतली होती त्यामुळें हेलेनशीं संभाषण करतांना त्यांना कांहींच अडचण पडत नसे. (जो डेव्हिडसन यांनींच हेलेनशीं माझा प्रथम परिचय करून दिला.) हेलेन आणि पॉली यांना पेनसिल्वेनियांतील आपल्या घरीं नेऊन डेव्हिडसन यांनीं स्वतः त्या दोघींचे पुतळे घडवले. आपल्या स्टुडिओंतील सर्व शिल्पकृति त्यांनीं हेलेनला 'दाखवल्या'. "डोळस माणसापेक्षांहि जास्त रसिकतेनें आणि आत्मियतेनें हेलेन आपल्या हातांनीं हे पुतळे 'पाहत' होती," असें डेव्हिडसन यानीं मला लिहिलेल्या एका पत्रांत म्हटलें आहे. याच पत्रांत ते पुढें म्हणतात, "हेलेननें आमच्या घरांत पाऊल टाकतांक्षणींच एक प्रकारच्या अवर्णनीय आनंदानें आणि उत्साहानें आमचें घर उजळून निघालें." आइन्स्टाईन यांच्या पुतळ्याला स्पर्श करतांना हेलेन हर्षित झाली आणि म्हणाली, "आइन्स्टाईन हे सूर्यफुलासारखे आहेत!" जो डेव्हिडसन यांच्याबद्दल आपल्या आत्मचरित्रांत हेलेननें लिहिलें आहे, "माझ्या जाणिवांचें आणि प्रज्ञेचें क्षेत्र तुम्हीं कितीतरी पटींनीं विशाल केलेंत. माझें जगच तुम्हीं बदलून टाकलेंत. तुमच्या आदर्श, आनंदी जीवनाचा माझ्यावर खोल परिणाम झाला आहे. नुसते उच्च विचार मनांत बाळगून चालणार नाहीं, आपलें वर्तनहि निर्मळ आणि उदार हवें, आपलीं क्षितिजें तोकडीं असतां कामा नयेत हें तुम्हीं मला शिकवलेंत."

शिल्पकलेबद्दल हेलेनच्या मनांत विलक्षण आवड निर्माण झाली. ती प्रथम मेणाच्या व नंतर मातीच्या मूर्ति घडविण्यास शिकली. जिनोआ, फ्लॉरेन्स, रोम, कॅले येथील जगप्रसिद्ध शिल्पें हेलेननें पाहिलीं.

"ओबडधोबड कळाहीन खडकांतून सुबक मूर्ति खोदून काढावी त्या प्रमाणें माझ्या शिक्षिकेनें माझें जीवन घडविलें," अशा शिल्पाच्या भाषेत हेलेननें ॲन सुलिव्हानबद्दलची आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे.

## : १० : कांहीं टिपणें

हेलेन वेस्टपोर्टला आल्यानंतर तिच्या सांनिध्यांत राहण्याची मला अनेकदां संधि मिळाली. या कालखंडांतील कांहीं प्रसंगांचीं, हेलेनच्या विविध विषयांवरील मतांचीं टिपणें मीं एका वहींत लिहिलीं. हीं टिपणें नियमित लिहिलेलीं नसल्यानें विस्कळित वाटण्याचा संभव आहे. त्यांतील कांहीं मी वाचकांपुढें सादर करीत आहें :

### जुलै १९४४

हेलेन आज ब्ल्यूबेरीचीं फळें तोडीत होती. नुसत्या स्पर्शानें फळें पिकलीं आहेत कीं नाहींत हें ती ओळखत होती.

'आर्कन रिज'ची बाग आणि त्यांतल्या पाऊलवाटा इतक्या व्यवस्थित राखल्या आहेत कीं मी तर आश्चर्यचकित झालो. ही सगळी हेलेनची कर्तबगारी. उन्हाळ्यांत हेलेन दररोज पहाटे पांचला उठते आणि बागेची, आंतल्या रस्त्यांची साफसफाई करते. फुलांच्या ताटव्यांतील तणें ती उपटून टाकते. हर्बर्ट हास याचें तिला या कामांत मार्गदर्शक म्हणून साहाय्य होतें. हासला 'आर्कन रिज'मध्यें महत्त्वाचें स्थान आहे. तो मोटार चालवतो, हेलेनला सकाळीं हिंडतांना सोपे पडेल असें कुंपण त्यानें बांधलें आहे. त्याला हेलेनची स्पर्शखुणांची भाषा येते, आणि हेलेनला वाचतां यावें म्हणून तो कित्येक लेख व कागदपत्रे यांच्या नकला ब्रेलमध्यें तयार करतो.

हेलेन आज जेवायला आली होती आणि तिनें बरोबर सोंगट्यां-सारख्या खेळाचा पट आणला होता. वेळ मिळाल्यास एखादा डाव खेळण्याची तिची नेहमींच तयारी असते.

१८८८ सालीं—म्हणजे सत्तावन वर्षांपूर्वी !—प्रसिद्ध झालेली क्लॅरेन्स स्टेडमन या कवीची हेलेन केलरवरील कविता माझ्या वाचनांत आली आहे. या कवीनें १८६५ सालीं लिंकनच्या मृत्यूच्या प्रसंगीं त्याचा गुणगौरव करणारी कविता लिहिली होती. हेलेननें तर आतां विसाव्या शतकांतलींहि पन्नासांहून अधिक वर्षे मागे टाकलीं आहेत, पण अजून कित्येकदां ती अवखळ तरुण मुलीसारखी भासते. कित्येक वर्षांपूर्वी—काव्य लोकाभिमुख होतें त्या काळांत रॉबर्ट फ्रॉस्टसारख्या कवींनीं हेलेनवर किती तरी कविता केल्या होत्या !

## ऑगस्ट १९४४

हेलेन आणि गेतॅनो साल्वेमिनी यांच्याबरोबर आम्ही प्रो. रॉबर्ट पिफर यांच्या घरीं जेवण्यास गेलो होतो. मिसेस् पिफर अत्यंत चांगल्या रसिक आणि कलावंत आहेत. त्यांनीं एक इटालियन गाणें म्हणून दाखविलें. हेलेनने त्या वेळीं डावा हात पियानोवर ठेवला होता व उजवा हात हवेंतच हलवीत तिनें गाण्याला बिनचूक ताल धरला होता. फरशी आणि पियानो यांमधून तिला संगीत लहरींचें आकलन होतें. या पद्धतीनें ती अनेक गाणीं ओळखूं शकते.

आपल्याला दिवस व रात्र कशी ओळखतां येते हें सांगतांना हेलेन म्हणाली, "दिवसा हवा हलकी असते. गंधहि अधिक तरल असतात. वातावरण गतिमान् व म्हणूनच कंपलहरींनीं भरलेलें वाटतें. संध्याकाळच्या शांत वातावरणांत कंपलहरी कमी असतात. हवा अधिक जड वाटते आणि भोंवतालीं गडबड सुरू नसते."

रंगांसंबंधीं हेलेनच्या काय कल्पना आहेत? तांबडा रंग तिला उबदार वाटतो. तिनें आपल्या मनांत गुलाबी रंगाची गुलाबकळ्यांशीं, व हिरव्या रंगाची कोवळ्या उगवत्या रोपांशीं सांगड घातली आहे. जांभळ्या रंगानें तिला प्रगाढ भावना सूचित होतात. पिवळा रंग तिच्या

अंतर्विश्वांत आनंद, प्रसन्नता, सूर्यप्रकाश यांचें प्रतीक आहे, तर निळ्या रंगानें तिला अंतर, अवकाश आणि आकाश यांचा बोध होतो.

अर्थात् वाचनाचे तिच्या मनावर जे संस्कार झाले त्यांतूनच रंगांसंबंधींच्या वरील कल्पना तिच्या मनांत निश्चित झाल्या हें उघड आहे. पण मला आश्चर्यकारक वाटलेली गोष्ट म्हणजे काळ्या रंगाशिवाय इतर कोणत्याहि रंगाचा मेळ तिनें दुःख, नकारात्मकता, अभाव, पाप यांच्याशीं घातलेला नाहीं. काळा रंग तिला एकान्त, शांति यांचाहि निदर्शक वाटतो.—"आंधळ्याला अंधाराची भीति वाटण्याऐवजीं कनवाळू सोबतच होते. अंधार हेंच त्याचें चिरपरिचित विश्व असतें." असें तिनें एके ठिकाणीं लिहिलें आहे. आणि त्यामुळेंच रंगांविषयींच्या हेलेनच्या कल्पना नेहमीं आनंदमय असतात.

## सप्टेंबर १९४४

ॲस्टर हॉटेलांत भरणाऱ्या एका राजकीय सभेला हजर राहण्यासाठीं हेलेन आणि पॉली न्यूयॉर्कला आल्या आहेत. उपाध्यक्ष ट्रुमन यांचें या सभेत भाषण झालें आणि नंतर हेलेनशीं त्यांचा परिचय करून देण्यांत आला. हेलेनच्या भेटीनें ट्रुमन सद्गदित झाले. हेलेननें त्यांच्याशीं बोलण्याचा प्रयत्न केला तेव्हां तर त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. या भेटीनंतर हेलेन म्हणाली, "ट्रुमन यांच्या हातावरूनच मला त्यांच्या निष्कपट सरळ मनाची कल्पना आली."

## जानेवारी १९४५

व्हाईट हाऊसमध्यें प्रेसिडेंट फ्रँकलिन रूझवेल्ट यांची भेट घेतल्याचें हेलेननें पत्रांत लिहिलें आहे. या भेटीच्या वेळीं रूझवेल्ट कुटुंबियांखेरीज इतर कोणी उपस्थित नव्हतें. "रूझवेल्ट यांच्या काळजीग्रस्त चेहऱ्यावर उदात्त आकांक्षेचें तेज आहे. संपत्तीची आणि सत्तेची हाव सुटलेल्या राष्ट्रांपासून जगाचें संरक्षण करण्याचा निर्धार त्यांत प्रतीत होतो."

अध्यक्षपदीं निवड झाल्यानंतर प्रेसिडेंट रूझवेल्ट यांनीं व्हाइट हाऊसमधून उद्‌घाटनाचें भाषण केले तो समारंभ हेलेननें 'पाहिला.' व्हाइट हाऊसच्या आवारांतील वर्फाच्छादित हिरवळीवर एका मॅग्नोलिया वृक्षाखालीं ती जो डेव्हिडसन यांच्या समवेत उभी होती. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण उत्साहानें जो डेव्हिडसन यांनीं पॉली आणि हेलेन यांची समारंभासाठीं आलेल्या सर्व लहान-मोठ्या व्यक्तींशीं ओळख करून दिली. ॲटर्नी जनरल फ्रॅन्सिस बिडल्, लॉर्ड हॅलिफॅक्स आणि अमेरिकेच्या प्रतिनिधिगृहाचे अनेक सदस्य त्यांत होते. मध्यंतरीं जो वेळ मिळे तेवढ्यांत ती जो डेव्हिडसन् यांच्याबरोबर उपस्थित व्यक्तींविषयीं चर्चा करी. "अनेक सुप्त हेतू व प्रभावी व्यक्तिविशेष यांच्या गुंतागुंतींतून राजकीय चळवळींचा उगम कसा होतो" हें या प्रसंगीं आपल्याला उमगलें, असा अभिप्राय हेलेननें व्यक्त केला.

"भरगच्च कार्यक्रमांच्या त्या दिवशीं" संध्याकाळीं हेलेनला जस्टिस ह्यूगो ब्लॅक, थर्मन आर्नॉल्ड यांच्या पंक्तीचा लाभ मिळाला. त्यांनीं अमेरिका आणि रशिया कोणत्या मार्गानें एकत्र येऊं शकतील, अर्थ-व्यवस्था आणि राज्यकारभाराचीं साधनें यांबाबत इतकी पराकोटीची मतभिन्नता असतांनाहि या दोन मोठ्या देशांत खरीखुरी लोकशाही कशी अस्तित्वांत येऊं शकेल यासंबंधीं हेलेनशीं चर्चा केली.

अनेक सरकारी रुग्णालयांना भेटी दिल्याचेंहि हेलेन लिहिते. "या रुग्णालयांचा व्याप व तेथें चाललेलें प्रचंड कार्य यांपुढें इलियडसारखीं महाकाव्येंसुद्धां फिकीं पडतील. (अमेरिकेंतील यादवी युद्धाच्या वेळचीं रुग्णालयें पाहून वॉल्ट व्हिटमननेंहि असेच उद्गार काढले होते.) अपंगांच्या पुनर्वसनासाठीं आजवर कधींहि एवढे कळकळीचे प्रयत्न झाले नसतील. माणसाचें कर्तृत्व, त्याची स्वतःच्या पायावर उभें राहण्याची शक्ति, त्याच्या मनांतला आनंद या साऱ्या गोष्टी त्याच्यापासून हिरावून घेणाऱ्या व्याधींच्या तडाख्यांत जे दुर्दैवानें सांपडले आहेत अशा हजारों

अपंगांना धीर देतांना आमच्या मनांवर किती ताण पडला असेल आणि डोळ्यांतले अश्रू कोणाला दिसूं नयेत म्हणून आम्हीं कसें मन घट्ट केलें असेल याची कल्पनाच केलेली बरी ! पण या अपंगांच्या मेळाव्यांत वावरतांना मनाला जो धीरोदात्त संदेश मिळतो तेवढ्यामुळें या सगळ्या यातना सुसह्य वाटतात."

या रुग्णालयांसंबंधींच्या पत्रांतच हेलेन पुढें लिहिते, "आज शस्त्र-क्रिया, औषधें, शिक्षणशास्त्र आणि विज्ञान यांच्या प्रगत सहकार्यामुळें अपंगांच्या जगात चमत्कार घडून आला आहे आणि त्यांना पुन्हां मागची प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. या क्षेत्रांत इतक्या नवनवीन कल्पना जन्माला येत आहेत कीं त्यामुळें अपंगांच्या सूक्ष्म सामर्थ्याचाहि विकास होईल आणि ते प्रत्येक क्षेत्रात अग्रभागीं चमकतील अशी मला खात्री वाटते."

जॉर्जियांतल्या थॉमसव्हिले गांवाहून हेलेनचें पत्र आलें आहे. चार्ल्स्टन येथें आरमारी दलासाठीं बांधलेल्या एका रुग्णालयाची पाहणी करीत असतां तिला प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या निधनाची बातमी समजली. "सर्व जगांत स्वातंत्र्य आणि सुसंस्कृतता यांचें पुनरुज्जीवन करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या या थोर व्यक्तीच्या मृत्यूची वार्ता ऐकून आम्ही सारे निःशब्द, बधिर झालो." असें लिहून हेलेन पुढें म्हणते, "किती तरी विधायक योजनांची आणि कार्यांची आज अपरिमित हानि झाली आहे. अपंगांसाठीं कार्य करणाऱ्यांना तर रूझवेल्ट यांचा मोठाच आधार वाटे. या बातमीनें रुग्णालयांना भेटी देण्यांतला माझा सगळा उत्साह लोप पावला आहे."

## ऑगस्ट १९४५

मीं हेलेनला बुकर टी. वॉशिंग्टनबद्दलचें तिचें मत विचारलें. कारण मीं त्याचें 'गुलामगिरींतून सुटका' (Up from Slavery) हें आत्म-चरित्र नुकतेंच वाचलें होतें. या निग्रो शिक्षणतज्ज्ञानें स्थापन केलेल्या

टस्केगी इन्स्टिट्यूटमध्यें हेलेनचें व्याख्यान झालें होतें व त्यांत तिनें संस्थापकाच्या दूरदर्शीपणाचा व चातुर्याचा योग्य गौरव केला होता. पण डॉ. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर या निग्रो वनस्पतिशास्त्रज्ञाची कामगिरी तिला अधिक आदरणीय वाटते. "ऐहिक सुखांबाबतच्या निरीच्छपणांत तर तो अगदीं येशू खिस्तासारखा होता," असें तिनें लिहिलें आहे. डॉ. कार्व्हरनें मोठ्या पगाराची नोकरी नाकारली आणि आपल्या प्रयोगांची व संशोधनांची माहिती एक पैहि न घेतां त्यानें सर्वांना सांगितली. (बाटाण्यापासून त्यानें निरनिराळ्या तीनशें प्रकारच्या नव्या रंगांचे वेल निर्माण केले आणि रताळ्यापासून त्या प्रकारचीं शंभर भिन्न भिन्न कंदफळें तयार केलीं !) कार्व्हर म्हणजे शास्त्रज्ञ आणि संत यांचा संगम होता असें हेलेन आदरपूर्वक म्हणते.

हेलेनच्या मनांत वर्णभेदाला थारा नव्हता. एकदां एका निग्रोद्वेषी माणसानें तिला 'आपण निग्रोच्या साहाय्यासाठीं आर्थिक मदत दिली आहे का,' असा प्रश्न विचारला असतां हेलेननें निर्भयपणें होकारार्थी उत्तर दिलें. त्यावर त्या माणसानें खवचटपणें विचारलें, "मग निग्रो आणि गोऱ्या लोकांत लग्नसंबंध जुळावेत असेंहि तुम्हांला वाटतें का?" पूर्वीच्याच खंबीरपणें हेलेन म्हणाली, "संबंधित व्यक्तींची संमति असेल तर अवश्य अशीं लग्नें व्हावींत." या माणसाशीं हस्तांदोलन करण्याचेंहि हेलेननें नाकारलें.

निग्रोविषयींच्या तिच्या या निकोप दृष्टिकोनाचें मूळ ॲन सुलिव्हाननें तिच्यावर घडविलेल्या संस्कारांतहि सांपडूं शकेल. कारण हेलेन अगदीं लहान असतांना तिला सांभाळण्यासाठीं एक निग्रो दाई ठेवलेली होती. ॲन सुलिव्हान, ही निग्रो दाई आणि हेलेन नेहमीं संध्याकाळीं फिरायला बाहेर पडत. अशा एका प्रसंगीं आपल्याबरोबरच्या निग्रो दाईला आइस्क्रीम दिलें जाणार नाहीं हें लक्षांत येतांच ॲननें पुढें आलेलें आइस्क्रीम खाण्याचें नाकारलें व त्या उपाहारगृहांतून ती बाहेर पडली.

लुइझियानामधील कारव्हिले या शहराबाहेर बांधण्यांत आलेल्या महारोग्यांच्या वसाहतीला हेलेननें भेट दिली. या भेटीची हकीकत पॉली थॉम्सननें मला सांगितली. भेटणाऱ्या माणसांशीं परिचय करून घेण्याचा स्पर्श हा एकच मार्ग हेलेनला खुला आहे. पण महारोग झालेल्यांनीं इतरांशीं हस्तांदोलन करणें धोक्याचें असल्यामुळें हेलेनशीं बोलतांना हात पुढें न करण्याची सूचना या सर्व रोग्यांना देण्यांत आली होती. पण त्यांतल्या एकानें जेव्हां हें बंधन न मानतां हेलेनशीं हस्तांदोलन केलें तेव्हां तिला अत्यानंद झाला.

## सप्टेंबर १९४५

हेलेनचे पूर्वज स्कॉटलंडमधले. या पूर्वजांच्या मूळ निवासस्थानावरूनच हेलेननें आपल्या नव्या घराला 'आर्कन रिज' असें नांव दिलें आहे. १९१४ पासून हेलेनबरोबर असलेली पॉली थॉम्सनहि अनेकदां अगदीं अस्सल स्कॉटिश उच्चार करते. आज संध्याकाळीं तर हेलेनच्या घरांत पूर्णपणें स्कॉटलंडमधलें वातावरण निर्माण झालें होतें. स्मिथ कॉलेजचे अध्यक्ष प्रा. विल्यम ॲलन नील्सन आज जेवायला आले होते. त्यांचे उच्चारहि स्कॉटिश धर्तीचे आहेत. हेलेन रॅडक्लिफ कॉलेजांत असतांना प्रा. नील्सन तिला शिकवायला होते व त्या काळांत ते हेलेनची स्पर्शखुणांची भाषा शिकले.

जेवण झाल्यावर स्कॉटिश लोकगीतांविषयीं बोलणें निघालें. हेलेन लगेच वरच्या मजल्यावरील आपल्या अभ्यासिकेंत गेली आणि ब्रेल लिपींत छापलेले दोन लठ्ठ ग्रंथ घेऊन खालीं आली. (या घरांत हेलेन कोठेहि न अडखळतां सर्वत्र हिंडूं शकते इतकी सगळ्या खोल्यांची व आंतील वस्तूंची रचना तिला पाठ झाली आहे.) स्कॉटिश लोकगीतांचे हे दोन ग्रंथ एडिंबरोहून प्रकाशकांनीं हेलेनला भेटीदाखल पाठविले आहेत. त्यांतील अनुक्रमणिकांवरून हेलेननें झरझर बोटें फिरवलीं.

आपल्याला हवें असलेलें गाणें कोणत्या पानावर आहे तें शोधलें आणि तें पान उघडून तिनें तें गाणें वाचून दाखवलें. तिचे उच्चार पॉली थॉम्सनलाच नीट उमगतात, तिनें आम्हांला गाण्याच्या ओळी सांगितल्या.

सुगीचा महोत्सव साजरा करण्यासाठीं हेलेन व पॉली न्यूयॉर्कला आल्या आहेत. ज्यू धर्मीयांतर्फे हा महोत्सव भरविण्यांत आला असून त्यासाठीं एक प्रशस्त चौकोनी तंबू उभारला आहे. हंगामांतलीं सर्व फळें तंबूच्या भिंतींवर टांगलीं आहेत. बायबलमध्यें ज्यांचा उल्लेख आहे अशीं फळें त्यांत प्रामुख्यानें दिसत आहेत. महोत्सव-संस्थेचे अध्यक्ष डॉ. लुई फ्रँकेल्स्टीन आणि हिब्रू भाषेचे जगप्रसिद्ध पंडित डॉ. सॅम्युअल लायबरमन यांच्या शेजारींच आम्ही बसलों होतों. बायबलवरील आपल्या प्रभुत्वानें हेलेननें या ज्यू विद्वानांना चकित केलें. "मी माझे ब्रेलमधील बायबल इतक्या वेळां वाचले आहे कीं बोटें फिरवून फिरवून त्यांतील कित्येक पानें गुळगुळीत होऊन गेलीं आहेत," या हेलेनच्या उद्गारांची मला आठवण झाली.

डॉ. फ्रँकेल्स्टीन यांच्या ओठांवर बोटें टेकून हेलेननें हिब्रू प्रार्थना ऐकली व ती म्हणाली, "ही प्रार्थना म्हणजे जीवनसंगीत आहे."

नंतर ती म्हणाली, "आजच्या जगाला मार्ग दाखवूं शकेल असा बायबल हा एकच ग्रंथ आहे. माणसामाणसांत वास्तविक कांहीच भेदभाव नाहींत. सूर्यप्रकाशामुळें निर्माण होणाऱ्या बदलत्या आकारांच्या सावल्यां-सारखे हे भेदभाव आभासमय आहेत."

आज दुपारीं आम्ही बसनें प्रवास करीत असतां हेलेन एकदम म्हणाली, "बसमध्यें नक्की कुणी तरी रंगारी आहे." आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे खरोखरच बसच्या दुसऱ्या टोकाला, आमच्यापासून वीस फूट दूर, घरें रंगविण्याचा व्यवसाय करणारा एक जण बसला होता.

परवां संध्याकाळीं जो डेव्हिडसन यांनीं आम्हां सर्वांना एका रेस्टॉरँ-मध्यें मेजवानी दिली. भोवतालच्या टेबलांवर कोण लोक बसले आहेत

इकडे आमचें कुणाचें लक्ष नव्हतें. पण हेलेननें मात्र दहा मिनिटांच्या आंत त्यांनीं कोणतें अत्तर लावलें आहे, कोणीं कोणते पदार्थ मागवले आहेत हें अचूक सांगून आम्हांला चकित केलें.

## जुलै १९४६

हेलेनने रात्रीं मला जेवायला बोलावलें होतें. उन्हाळ्यांत झोपेच्या तासांत थोडी कपात करून ती पहाटे पांचला उठते, त्याप्रमाणें आजहि सकाळीं ती उठली होती. उठल्याबरोबर ती आपल्या बिछान्यावरील चादरी व्यवस्थित घड्या करून ठेवते, पलंगपोसावरील सुरकुत्या साफ करते व मग अवखळपणें धडधड जिना उतरून खालीं येते आणि उत्साहानें फिरायला बाहेर पडते. एका हातानें कुंपणाचा मार्गदर्शक कठडा चाचपीत हेलेन निर्वेध चालत असते. खूप झाडी असलेल्या आवारांतून वळणें घेऊन हा कठडा पुन्हा हेलेनच्या घरापर्यंत येऊन पोंचला आहे.

मला अजूनहि हेलेनबरोबर सफाईनें संभाषण करतां येत नाहीं. तिचे अनेक उद्गार पॉली मला समजावून सांगते, आणि हें करतांना "हेलेन म्हणते" हे शब्द पॉली कितीदां तरी उच्चारते. हेलेनला मी प्रथमच भेटलों तो प्रसंग मला अजून आठवतो. हेलेनची स्थिति पाहून केवढा धक्का बसला होता मला तेव्हां! माझ्या मनांत विचार आला : 'संवेदना-विहीन हेलेन आणि बाह्य जग यांच्यांतलें अंतर सांधून तिच्याशीं संभाषण करणें कुणाला तरी शक्य होईल काय?' पण भेटीच्या पहिल्या क्षणांतच मला हेलेनच्या अपंगतेचा पूर्ण विसर पडला आणि आनंद व सुजाणता यांनीं उजळलेल्या तिच्या चैतन्यमय विश्वांत मीं प्रवेश केला.

तरुण मुलें अधिक शोधक वृत्तीचीं आणि धैर्यशाली असतात, त्यामुळें बेकनप्रमाणेंच हेलेनलाहि त्यांचा सहवास अधिक आवडतो.

कोणत्याहि नव्या साहसासाठीं हेलेन सदैव तयार असते. एकदां

आमचें भटक्या जिप्सी लोकांविषयीं बोलणें निघालें. जिप्सींची उन्नति व्हावी म्हणून प्रयत्न करणारे कॉनरॅड बरकोव्हिसी यांच्याबरोबर मी एकदां जिप्सी वस्तीमधून हिंडलों होतों त्याची हकीकत मीं हेलेनला सांगितली. जिप्सी लोक मुलखाचे भटके, पण आपल्या मुलांना शिक्षण मिळावें म्हणून अनेक जिप्सी कुटुंबांचे तांडे शहरांत येऊन राहिले. जुनीं रिकामीं गुदामें, पडकीं घरे यांचा त्यांनीं आश्रय घेतला. कित्येकांनीं 'ईस्ट साइड' रस्त्याच्या दुतर्फा आपले तंबू टोकले. रात्रीं ते उबेसाठीं शेकोट्या पेटवीत. अनेक जिप्सी बाया फुटपाथवर बसून भविष्य सांगण्याचा उद्योग करीत.

मी सांगत असलेली ही सगळी माहिती पॉलीच्या बोटांच्या माध्यमांतून ऐकतांना आश्चर्य आणि कुतूहल यांनीं हेलेन फुलून गेली होती. "मलाहि जिप्सींच्या वस्तींतून हिंडवण्याचें बरकोव्हिसींनीं एकदां कबूल केलें होतें त्याची त्यांना आठवण करा," अशी तिनें मला विनति केली!

## ऑक्टोबर १९३७

मी हेलेनच्या नव्या घरीं गेलों होतों. दहा दिवसांपूर्वीच पॉली आणि हेलेन या घरांत राहायला आल्या. जपानच्या राजाकडून भेटीदाखल मिळालेल्या इतक्या वस्तू या घरांत आहेत! पॉलीनें त्या नीट मांडून ठेवल्या आहेत म्हणून, नाहीं तर जपानी कलाकौशल्याचें आणि संस्कृतीचें एक वस्तुसंग्रहालयच होईल तें!

सुमारें एक वर्षापूर्वी, नोव्हेंबर १९४६ मध्यें, हेलेनच्या जुन्या घराला आग लागली आणि तें जळून खाक झालें. हेलेन या वेळीं रोममध्यें होती. हेलेनचीं ब्रेलमधलीं पुस्तकें, तिचीं पत्रें, तिनें जवळजवळ लिहून पूर्ण केलेलें ॲन सुलिव्हानचें चरित्र, अनेक विषयांवरचीं तिचीं टांचणें, लेख हें सारें भस्मसात् झालें! सबंध आयुष्यभर केलेल्या परिश्रमांची अशी एका क्षणांत राखरांगोळी होऊन गेलेली पाहून कितीहि

धीराचा मनुष्य खचला असता. पण हेलेनचें मन इतकें विशाल आणि आनंदमय बनलें होतें कीं तिला या बातमीनें धक्का बसला नाहीं. जगांत अनेकांना याहून किती तरी भीषण संकटांना तोंड द्यावें लागतें असा विचार तिच्या मनांत आला. घर जळल्याची बातमी ऐकल्याबरोबर मनांत स्फुरलेले विचार हेलेननें लिहून ठेवले आहेत: "माझ्या क्षुद्र वैयक्तिक आयुष्यापेक्षां जीवन किती तरी विशाल आहे आणि तें सदैव अजिंक्यच राहणार असें मला वाटलें. आपल्या लहानमहान गोष्टींसाठीं तें अडून राहत नाहीं. बाह्य जगांत माझ्यावर कितीहि आपत्ती आल्या तरी माझे अंतर्विश्व मात्र अधिकाधिक विशाल आणि सुरक्षित होत आहे याचा मला आश्चर्यजनक प्रत्यय आला."

## : ११ : जगप्रवास

आंधळयांची कार्यक्षमता इतरांपेक्षां लवकर उतरणीला लागते आणि त्यांचें आयुष्यहि सर्वसामान्य माणसापेक्षां कमी असतें. पण हेलेन या नियमाला अपवाद आहे. तिचा उत्साह आणि कामाचा व्याप सतत वाढत गेला आहे. जगातल्या आंधळयांची स्थिति किती करुणाजनक आहे याचें तिला यथार्थ ज्ञान होतें. तशांतच दुसऱ्या महायुद्धानें पेट घेतला. हेलेनला परमावधीचें दुःख झालें. अंधांसाठीं बांधलेल्या अनेक शाळा, आश्रम, उद्योगमंदिरे यांचा नाझींनीं विध्वंस केला. त्यांचीं ब्रेल लिपींतलीं पुस्तकें जळणासाठीं वापरलीं व हीं पुस्तकें पुन्हा छापतां यावीं म्हणून तयार केलेले ब्रेलमधले तांब्याचे टसे त्यांनीं बंदुका बनविण्यासाठीं वितळवून टाकले! इंग्लंड, फ्रान्स, इटली, ग्रीस या देशांत दौरा काढून हेलेननें तेथील अंध सैनिकांची, त्यांच्या कुटुंबियांची, बाँब-हल्ल्यांमुळें निराश्रित झालेल्यांची विचारपूस केली. युरोप खंडाबाहेरील आंधळयां-बद्दलसुद्धां हेलेनला आत्मीयता वाटे व म्हणून युद्ध संपल्याबरोबर तिनें आशिया, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अमेरिका या खंडांत दौरा काढला.

युद्धकाळांत तिनें अनेक आरमारी आणि लष्करी इस्पितळांना भेटी दिल्याचा उल्लेख पूर्वी आला आहेच. आर्कान्सासपासून ओरेगॉनपर्यंत सत्तराहून अधिक इस्पितळांना तिनें भेट दिली. सुरुवातीस या दौऱ्यावर जाण्यास ती जरा कचरत होती. आपले अस्फुट उच्चार म्हणजे आपला वेंधळेपणा आहे असें तिला वाटे. पण सतत प्रयत्न करून तिनें कांहीं कांहीं शब्दोच्चारांवर इतकें प्रभुत्व मिळविलें कीं इतर

कोणत्याहि काळांत तो एक अद्भुत दैवी चमत्कार मानला गेला असता. ही अंध आणि बहिरी अबला इस्पितळाच्या प्रत्येक खोलींत जाई, आंतील जायबंदी सैनिकांचे हात हातांत घेऊन त्यांच्या मनांतील भावनांचा कल्लोळ अनुभवी त्यांच्या अंतःकरणांत अद्यापहि उमदी विनोदवृत्ति आणि धैर्य जागृत आहे याचा तिला प्रत्यय येई. त्यांच्या हकीगती ऐकतांना ती इतकी समरस होई कीं मनानें ती त्यांच्या-बरोबर आफ्रिकेसारख्या उष्ण कटिबंधांतील देशांमधल्या निबिड जंगलांतून रस्ता हुडकण्यासाठीं धडपडे, पर्वतावर संचार करी, शेकडों मैल वाळवंट तुडवीत जाई आणि त्याबरोबरच प्रचंड स्फोट, धुळीचे व धुराचे लोट, कर्कश आवाजाचीं लढाऊ विमानें व त्यांनीं टाकलेले पृथ्वी गदगदा हलवून सोडणारे बॉंब—या साऱ्यांचा मनोमन अनुभव घेई. कित्येक कोवळ्या युवकांचे हात भाजल्यानें, गोळी लागल्यानें, बॉम्बचे तुकडे आंत घुसल्यानें किंवा लढाईतील अन्य अपघातांमुळें आकारहीन व छिन्नविच्छिन्न झालेले असत. त्यांच्याशीं हस्तांदोलन करतांना हेलेनच्या मनांत विचार येई, "हे हात व्हायोलिन वाजविण्यासाठीं देवानें निर्माण केले आहेत, बंदुकांसाठीं नव्हे." त्या सर्वांना आपापल्या घरीं परत जाण्याची अनिवार ओढ लागलेली असे. अशा वेळीं आपण देशभर प्रवास केल्याचें सार्थक झालें असें हेलेनला वाटे. कारण अमेरिकेंतील अनेक लहानमोठ्या शहरांचे, नद्यांचे, आसमंतांतील प्रदेशाचें, वातावरणाचें ती इतकें वेधक वर्णन करी कीं आपल्या प्रदेशांचें वर्णन ऐकताना ते अभागी सैनिक क्षणभर आपलें दुःख विसरून सद्गदित होत.

युद्धानंतरच्या दौऱ्यांत तिनें ईजिप्तलाहि भेट दिली. आंधळ्यांचें प्रमाण ईजिप्तमध्यें सगळ्यांत जास्त आहे. लाखों वर्षे अज्ञानांत घोरत पडलेल्या ईजिप्तमध्यें नवजागृति, उत्साह व सुधारणा यांची लाट उसळली होती. कैरो विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसमोर हेलेननें भाषण केलें. ईजिप्तच्या पंतप्रधानांशीं आणि शिक्षणमंत्र्यांशीं चर्चा करून तिनें त्यांना आंधळ्यां-

साठीं जास्त शाळा उघडण्याची जरुरी असल्याचें सांगितलें. अलेक्झांड्रिया व अबूकीर येथील कोरींव लेण्यांमधील अनेक शिल्पाकृति तिनें 'बोटं धुंद होईपर्यंत' पाहिल्या व ईजिप्तच्या महान् प्राचीन संस्कृतीची माहिती करून घेतली. रखरखीत वाळवंटांत आसुडांचे फटके खाऊन रक्तबंबाळ झालेले असंख्य गुलाम पिरॅमिड बांधतांना कसे राबत होते याचें भीषण चित्र तिच्या अंतश्चक्षूंसमोर उभें राहिलें. पण हजारो वर्षांपूर्वीच्या या साऱ्या प्रकारांना लाजवतील असे क्रूर अत्याचार या घटकेला जगांत घडत असतांना जगाच्या प्रगतीवर श्रद्धा ठेवणें ही एक अवघड गोष्ट आहे. तरीहि ईजिप्त, सिरिया, जॉर्डन, लेबानन या देशांत सुरू झालेले समाजसुधारणेचें प्रचंड कार्य पाहून हेलेनला आपली श्रद्धा अविचल राखणें शक्य झालें. इस्राएलमधल्या कालवे खोदण्याच्या मोहिमेची तिनें पाहणी केली. अजस्र खडक फोडून काढून जिथें दोन हजार वर्षांत गवताचें पातेंसुद्धां उगवलें नव्हतें तिथें पिकांनीं बहरलेलीं शेतें निर्माण करण्याचा ज्यूंचा दीर्घोद्योग पाहून मानवी प्रगतीवरचा हेलेनचा विश्वास दृढ झाला. तिनें ज्या गांवांना भेट दिली तेथील लोकांनीं तिच्यापासून स्फूर्ति घेऊन अंधशिक्षणाच्या शाळा बांधल्या. इस्राएलचे पंतप्रधान बेन गुरियन यांच्याबरोबर तिनें प्लेटोच्या तत्त्वज्ञानाविषयीं चर्चा केली. जगांतल्या सर्व लोकांत परस्परांबद्दल प्रेमाची व सहकार्याची भावना निर्माण व्हावी, सर्वत्र न्यायाचें आणि विवेकाचें राज्य व्हावें असें हेलेनचे स्वप्न होतें. अमेरिकेंतल्या राजकारणी मुत्सद्द्यांमुळें अमेरिकेविषयीं पुष्कळदां गैरसमज पसरतात. आकाशासारखें विशाल मन असणारा इमर्सन आणि वॉल्ट व्हिटमन यांच्या विचारांतूनच आशियांतील लोकांना अमेरिकेचें खरें दर्शन होईल असें तिला वाटतें. सहिष्णुता हा मानवाचा सर्वांत मोठा सद्‌गुण आहे असें तिचें मत आहे. त्यामुळें दक्षिण आफ्रिकेंतील व दक्षिण अमेरिकेच्या ब्राझील, चिली, पेरू या देशांतील क्षुद्र वर्णविद्वेषाचें भयानक स्वरूप पाहून ती व्यथित झाली.

आफ्रिका म्हणजे अमर्याद साहसांचा देश हें तिला प्रथमपासूनच ठाऊक होतें. पण तिला ॲन सुलिव्हाननें 'द स्टोरी ऑफ ॲन आफ्रिकन फार्म' हें गांधीजींचें पुस्तक वाचून दाखवलें आणि तेव्हांपासून तेथील जनतेच्या करुण स्थितीबद्दल हेलेनच्या मनांत अनुकंपा निर्माण झाली. गांधीजींइतकाच हेलेनचाहि माणसाच्या सत्प्रवृत्तीवर दृढ विश्वास आहे. लोकांमधील दोषांचें, त्यांच्या चुकांचें तिला आश्चर्य वाटत नाहीं. उलट अनेक युगें अधोगतीच्या गर्तेत पडून राहिलेले जनसमूहसुद्धां पुन्हा नव्या जोमानें प्रगतीचे प्रयत्न करतात हें पाहून तिचें हृदय आनंदानें भरून जातें. निग्रोंच्या छळणुकीवर विदारक प्रकाश टाकणारें 'क्राय द बिलव्हेड कंट्री' हें पुस्तक लिहिणारा ॲलेन पेटन याचीं मतेंहि हेलेन-सारखींच आहेत. दुर्दैवी हेलेननें सतत प्रयत्न करून अनेक क्षेत्रांत भरीव स्वरूपाचें कार्य कसें करून दाखवलें याची हकीकत पेटननें शाळेंत शिकत असतांनाच ऐकली होती व तेव्हांपासून त्याच्या मनांत हेलेन-बद्दल आदर निर्माण झाला होता. हेलेनच्या आफ्रिकेंतील प्रवासाचें 'हेलेन केलर अंडर द सदर्न क्रॉस' हें पुस्तक प्रसिद्ध झालें त्यास ॲलन पेटननें प्रस्तावना लिहिली.

आफ्रिकेंत जातांना तिनें गांधीजींचें चरित्र वाचलें. प्रत्येक माणूस मूलतः सत्प्रवृत्त असतो, या तत्त्वावर श्रद्धा ठेवून गांधीजींनीं दक्षिण आफ्रिकेंत केलेल्या महान् कार्याशीं हेलेन परिचित होती. जोहान्सबर्ग आणि दर्बान येथें हेलेनचें मोठें स्वागत झालें. कातडीं कमावणें, मातीचीं भांडीं तयार करणें, चटया-टोपल्या बनवणें, कापड विणणें हे आफ्रिकन खेड्यांतले हस्तव्यवसाय आंधळ्यांनाहि डोळसांइतक्याच कुशलतेनें करतां येतील हें हेलेननें स्थानिक अधिकाऱ्यांना पटवून दिलें. तिच्या दौऱ्यामुळें तिथल्या आंधळ्यांची उन्नति घडवून आणण्याच्या कार्याला स्फूर्ति आणि चालना मिळाली. ठिकठिकाणीं अंधांसाठीं हेलेन केलरच्या नांवाचीं रुग्णालयें, शाळा, आश्रम आणि उद्योगमंदिरें स्थापन झालीं.

१९४६ मध्यें हेलेन ग्रीसमध्यें जाऊन आली. तेथील अंध-संस्थांची तर तिनें पाहणी केलीच, पण आद्य मानवी संस्कृतीचें उगमस्थान असलेल्या या महान् देशांतील अनेक अजरामर स्थळांचें तिनें दर्शन घेतलें. ग्रीसच्या इतिहासाचा तिनें सखोल आणि सहृदयतेनें अभ्यास केला आहे. म्हणूनच पार्थेनॉन, मॅलेमीस, ॲगोरा येथील उध्वस्त राजवाड्यांचे आणि मंदिरांचे अवशेष चाचपताना तिच्या मनानें हजारो वर्षांचें अंतर कापून गतकाळांत भरारी घेतली. ग्रीक युवकांना नवें ज्ञान देणारे पेरिक्लीस व सॉक्रेटीस जेथें उभे राहून आपलें प्रबोधन-कार्य करीत त्या पावन जागांना हेलेननें स्पर्श केला. आपल्या अतुलनीय सौंदर्यानें साऱ्या जगाचे डोळे दिपवून टाकणाऱ्या 'हेलेन ऑफ ट्रॉय'-च्या ट्रॉय शहरात ही अंध 'हेलेन' खूप हिंडली! ॲन सुलिव्हाननें अगदीं बालपणीं सांगितलेली ट्रॉयच्या वेढ्याची गोष्ट हेलेनला आठवली आणि हर्षानें तिचा चेहरा फुलून गेला.

## : १२ : आणखी कांहीं टिपणें

### ऑक्टोबर १९४९

सद्‌गुण, दुर्गुण अशा भाववाचक कल्पनांचा बोध आपल्याला कसा होतो हें स्पष्ट करतांना हेलेन म्हणाली, "चांगलें सफरचंद गोड असतें आणि खराब झालेलें सफरचंद कडू असतें या अनुभवावरून मी माझ्या मनांत 'गोडपणा' आणि 'कडूपणा', 'चांगुलपणा' आणि 'वाईट-पणा' यांच्या कल्पना निश्चित करूं शकतें. आणि मग या विशेषणांचें ज्ञान होण्यासाठीं मला सफरचंदाची चव लक्षांत घ्यावी लागत नाहीं." तिचें हें स्पष्टीकरण ऐकून शेजारींच बसलेले सर आल्फ्रेड झिमर्न आश्चर्यानें थक्क झाले! ते म्हणाले, "प्लेटोची विचारपद्धति तंतोतंत अशीच होती." सर आल्फ्रेड यांचा ग्रीक इतिहास व तत्त्वज्ञान या विषयांवरील अधिकार फार मोठा आहे. चाळीस वर्षांपूर्वी त्यांनीं लिहिलेलें 'द ग्रीक कॉमनवेल्थ' हें अभ्यासपूर्ण पुस्तक अजूनहि फार महत्त्वाचें मानलें जातें.

### नाताळ १९५१

मनांत घोळत असलेले विचार अचानक कधीं तरी बोलून दाखवण्याची हेलेनची एक लकब आहे. आज सकाळीं ती ग्रीकांचा इतिहास वाचत होती. त्यांतील पेलोपॉनेशियन युद्धाबद्दल ती म्हणाली, "खरोखर युद्ध म्हणजे केवढा मूर्खपणा आहे. आणि पेलोपॉनेशियन युद्ध म्हणजे तर या मूर्खपणाची परिसीमा वाटते." या युद्धामुळें अथेन्समधील लोकशाही निकालांत निघाली. विषादानें मान हलवून हेलेननें जणुं कांहीं या घटनेचा तीव्र निषेध केला.

परवां ती अशीच एकदम ईव्हलिन चेसमन या इंग्लिश विदुषीबद्दल बोलूं लागली. चेसमन ही कीटकांबाबत संशोधन करणारी शास्त्रज्ञ आहे. इंग्लिश, फ्रेंच, अमेरिकन आणि जर्मन या भाषांतलीं (ब्रेलमध्यें छापलेलीं) अनेक मासिकें हेलेन वाचते, त्यांपैकीं कशांत तरी तिनें चेसमन-विषयीं वाचलें असावें.

पॉलीला तिची थट्टा करण्याची लहर आली म्हणून तिनें विचारलें, "हेलेन, आज ही कोण चेसमन काढली आहेस?" पण पॉली कांहीं हेलेनचे नेहमींच लाड करते असें नाहीं. हेलेननें टाईप केलेल्या पत्रांत किंवा इतर मजकुरांत लहानशी जरी चूक झाली तरी पॉली तिला तें पान पुन्हां टाईप करायला सांगते.

हेलेनचे उद्गार उथळ नसतात. त्यांत अनेकदां इतका खोल अर्थ असतो कीं आपण एखाद्या प्रेषिताचें किंवा प्राचीन भारतीय ऋषीचें बोलणें ऐकत आहोंत असें वाटतें. अनेक व्यापांत हेलेन सदैव गढून गेलेली असली तरी खूप वेळ ती अंतर्मुख होऊन विचार करण्यांत घालवते. जगांतील सर्व प्रमुख धर्मग्रंथ, बायबल आणि ग्रीक महाकाव्यें यांच्या अभ्यासपूर्ण वाचनानें तिच्या विचारांत प्रगल्भता आली आहे.

(या किमयेचें बरेंचसें श्रेय अर्थातच पॉलीला आहे. इतक्या निष्ठेनें, उत्साहानें आणि आपुलकीनें ती हेलेनच्या व्यक्तिविकासाची आपली कामगिरी बजावीत असते कीं त्याचें कोणालाहि कौतुक वाटल्याखेरीज राहणार नाहीं. प्रवासांत देखील पॉली विश्रांति घेत नाहीं. सकाळीं झाडांच्या फांद्यांवर पक्ष्यांनीं चिवचिव करावी तशा पॉली आणि हेलेन मध्यरात्रीं रेल्वेप्रवासांत बोलत बसलेल्या मीं अनेकदां पाहिल्या आहेत.)

"अमेरिकेंतील सर्वांत अविस्मरणीय व्यक्ति म्हणजे हेलेन केलर," असें एच्. जी. वेल्स यांनीं आपल्या अमेरिकेच्या प्रवासवर्णनांत लिहिलेलें मीं नुकतेंच वाचलें. मार्क ट्वेन आणि ऑलिव्हर वेंडेल होम्स यांनीं तर अगदीं हेंच मत अनेकदां व्यक्त केलें होतें. 'नायगारा धबधब्याप्रमाणेंच

हेलेन सुद्धां जगांतील एक आश्चर्य आहे,' असें कांहीं वर्षांपूर्वीं एका इंग्लिश प्रवाशानें लिहिलें आहे.

मौल्यवान हिऱ्याप्रमाणें हेलेनच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू आहेत. वर उल्लेख केलेल्या तिच्या चाहत्यांवर त्यांपैकीं कोणत्या गुणविशेषाचा अधिक प्रभाव पडला असेल? मला वाटतें तिचें धैर्य आणि प्रज्ञा यांचा. एकदां पश्चिम व्हर्जिनियांतील पर्वतांवरून तिचें विमान जात असतां हेलेननें पायलटला प्रश्न केला, "आपण आतां आठ हजार फुटांवरून जात आहोत ना?" पायलटनें उंची मोजणाऱ्या तबकडीकडे नजर टाकली आणि त्याला आढळून आलें की हेलेनचा अंदाज अचूक आहे. पण याहूनहि आश्चर्याची गोष्ट म्हणजे हेलेननें एकदां स्वतः विमान चालविलें आहे! त्या वेळीं ती रोमहून लंडनला येत होती. वाटेंत पायलट लँव यानें तिला कॉकपिटमध्यें आपल्या शेजारीं बसवलें व यंत्रांची माहिती करून दिली. विमान कॉर्सिकावरून जात असतांना कांहीं वेळ त्यानें सर्व सूत्रे हेलेनच्या हातीं दिलीं होतीं.

नाताळची भेट म्हणून जपानमधील हेलेनच्या एका अनामिक मित्रानें तिला एक सुंदर चिमुकला पक्षी पाठविला आहे., हा गाणार. पक्षी विमानानें पाठविण्यांत आला. हेलेननें यापूर्वींहि एकदोन पक्षी पाळले आहेत. तिची शिक्षिका ॲन सुलिव्हान हिनें तर हेलेन लहान असतांना कांहीं कबुतरें पाळलीं होतीं. त्यांना पकडण्यासाठीं हेलेन धाव घेई आणि मग त्यांच्या पंखांची फडफड, तीं पांखरें उडाल्यानंतर हवेंत निर्माण होणारे विशिष्ट लयबद्ध कंप यांमुळें हेलेनला पक्षी उडतात म्हणजे नेमकें काय होतें याचा बोध होई. त्यामुळें तिच्या जाणिवेच्या जगांत फुलें किंवा दगड यांच्याइतकेंच पक्ष्यांनाहि स्थान आहे.

## जून १९५२

ब्रेल लिपीचा संशोधक लुई ब्रेल याची शंभरावी पुण्यतिथि साजरी

करण्यासाठीं पॅरिसला झालेल्या मोठ्या समारंभांत हेलेननें भाषण केलें. आंधळ्यांचा उद्धार करणाऱ्या या थोर संशोधकाची रक्षा असलेला करंडक राष्ट्रीय सन्मानानें थोर कवि, तत्त्वज्ञ, मुत्सद्दी यांच्या थडग्यांशेजारीं पुरण्यांत आला. या प्रसंगीं ब्रेलच्या कुटुंबियांबरोबर हेलेनहि तेथें उपस्थित होती. त्या वेळच्या भाषणांत हेलेन म्हणाली, "मुद्रणकलेचा संशोधक गुटेनबर्ग याचें जगाच्या दृष्टीनें जें महत्त्व आहे तेंच आंधळ्यांच्या जगांत ब्रेलचें आहे." या भेटींतच हेलेनला 'फ्रेंच लीजन ऑफ ऑनर' हा बहुमानाचा किताब देण्यांत आला. हेलेननें उत्तराचे भाषण फ्रेंचमध्यें बऱ्याच सफाईनें केलें.

अनेकांना अद्याप हेलेनच्या थोरवीचें समग्र आकलन झालेलें नाहीं, असें पॉली थॉम्सनला नेहमीं वाटतें. म्हणूनच मीं सांगितलेली एक सत्य हकीगत ऐकून तिला फार आनंद झाला. आमच्या शेजारीं राहणारी एक बाई काहीं दिवसांपूर्वीं न्यूयॉर्कच्या पार्क ॲव्हेन्यू रस्त्यानें जात होती. रहदारीचा तांबडा दिवा लावल्यानें एक टॅक्सी तिच्याजवळच थांबली व त्या ड्रायव्हरनें खिडकीबाहेर डोकें काढून सांगितलें, "बाई तुम्हांला माहीत आहे? कांहीं वेळापूर्वी हेलेन केलर माझ्या टॅक्सींत बसल्या होत्या!"

प्रेसिडेंट आयझेनॉवर यांना भेटून हेलेन नुकतीच परत आली आहे. यापूर्वीच्या आठ अध्यक्षांना भेटण्याचा मान तिला लाभला आहे. व्हाईट हाऊसच्या आवारांतील झाडांना हात लावून त्यांचीं नांवें ओळखण्याचा आपला आवडता छंद आजच्या भेटींत वेळेअभावीं पुरवतां आला नाहीं याबद्दल तिला चुटपुट लागली आहे.

## : १३ : व्यक्ति आणि विचार

आमच्या घरीं येतांना आज हेलेननें एक काळ्या-तांबड्या रंगाचे जपानी कांचपात्र आणलें होतें. या गोल कांचपात्रावर हास्यदेवतेचें चित्र रेखलेलें आहे. हेलेन जर एकेश्वरवादी नसती तर हें तिचें आवडतें दैवत झालें असतें. कारण विनोदप्रियता हा तिचा सर्वांत आकर्षक गुणविशेष आहे. जीवनाचा व्यापक साक्षात्कार होऊं लागला तसतसे गांधीजी अधिकाधिक आनंदी व प्रफुल्ल वृत्तीचे होत गेले, असें त्यांच्या एका चरित्रकारानें म्हटलें आहे. तो पुढें म्हणतो, "वरवर भासणाऱ्या विसंगतींतून गांधीजींना पुढें सुसंगति गवसली, ते अधिक आनंदी, निश्चिंत आणि जीवनोत्सुक बनले." हेलेनच्या बाबतींतहि नेमकें हेंच म्हणतां येईल.

वृद्धत्वाचा हेलेनच्या प्रसन्न मनोवृत्तीवर किंवा हालचालींवर परिणाम झालेला नाहीं. 'देवता', 'अलौकिक विभूति' अशी आपली अवास्तव स्तुति केलेली हेलेनला आवडत नाहीं. पण सामान्य लोकच तिला वंदनीय मानतात असें नाहीं. थोर तत्त्वज्ञ विल्यम जेम्स तिला एकदां म्हणाले, "थोडक्यांत सांगायचे झाले तर तूं म्हणजे जगाला मिळालेले एक वरदान आहेस."

मनाची प्रसन्नता हा हेलेनचा सर्वांत अविस्मरणीय विशेष आहे. नेहमीं दुःखी, चिंताग्रस्त चेहऱ्यानें वावरण्यांत कांहीं तरी उदात्त आहे असें कांहीं लोकांना वाटतें. या प्रवृत्तीला उद्देशून हेलेननें लिहिलें आहे, "स्वतःची प्रगति आणि विकास घडवून आणायचा असला तरी आनंदी वृत्तीनेंच राहिलें पाहिजे. अन्नाच्या चवीचें जें सुख असतें त्यामुळें अन्नपचनाला

केवढी तरी मदत होते. आणि प्रत्येकाचें मनहि नेहमीं आपल्या आवडत्या कल्पनांतच रंगून जात नाहीं काय? आनंदी वृत्ति हें जीवनाचें सार आहे. आनंद ही आपल्या आयुष्यांतील बऱ्यावाईट घटनांना एकात्मता आणि अर्थ प्राप्त करून देणारी शक्ति आहे. अखेर सत्पक्षाचाच विजय होईल यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांना नवचैतन्य लाभतें, आणि अशी सुजाण आनंदी वृत्ति असलेला मनुष्य निर्भय बनतो, विधायक कार्य करूं शकतो!"

● ● ●

# वि श्व सा हि त्य

| | रु. न. पै. |
|---|---|
| धुमसतें कालीन | २-२५ |
| आरोपी | २-५० |
| एकटा | २-५० |
| अमेरिकन संस्कृति | २ |
| असा आहे रशिया | २ |
| अणुचा अस्त्र | ५ |
| मी विजयी आहें | २ |
| अखेरचा रामराम | २-५० |
| आशियांतील धर्म संग्राम | १-५० |
| बेन फ्रँकलिन | १-५० |
| जॉर्ज वॉशिंग्टन | १-५० |
| अखेरचें पान | २-५० |
| अब्राहम लिंकन | १-५० |
| स्वातंत्र्याचीं नवीं क्षितिजें | २ |
| हेलेन केलर : एक व्यक्तिरेखा | १-५० |
| बालपणीचा काळ सुखाचा | २-५० |
| प्रेमळ घर | २-५० |
| स्वातंत्र्यवीर | २-५० |
| पांच भावांची गोष्ट | १-५० |
| स्वातंत्र्य आणि संस्कृति | २-५० |
| रॉकफेलर | २-५० |

ग. पां. परचुरे प्रकाशन मन्दिर